सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, २४ जुलै २०२५। वर्ष ३ रे अंक २५५ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघ म्हणजे एक शाळा आहे, जी माणूस घडवते. येथे राष्ट्रभक्ती शिकवली जाते आणि व्यक्तिमत्त्व घडते. संघशिस्त ही संघाची आत्मा आहे. नियमित शाखा आणि स्वयंस्फूर्त सहभागानेच जीवनात परिवर्तन घडते.

**हस्तीमल**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. संपर्क प्रमुख

# कोणाचेही नुकसान न होणारा कॉरिडॉर करायचाय

- **मुख्यमंत्री फडणवीस**
- **सर्वांना सहभागी करुनच पंढरपूरचा विकास**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ जुलै -**

कोणाचाही विनाश करुन विकास करावयाचा नाही तर सर्वांना सोबत घेऊन, सर्वांना समाविष्ठ करुन पंढरपूरचा विकास करायचा आहे. कॉरिडॉरमुळे ज्यांच्या दुकानांवर, घरांवर काही कारवाई करावी लागली तर त्यांना अतिशय चांगल्या पध्दतीने या प्रक्रियेमध्ये समाविष्ट करुन घेण्यात येईल. कोणाचेही नुकसान होणार नाही अशा प्रकारचा कॉंरिडोर तयार करण्यात येणार आहे. पण दुसरीकडे कोट्यावधी भाविक येथे येतात त्यांची अव्यवस्था होत राहते हे मात्र योग्य नाही. त्यामुळे सर्वांना सोबत घेऊन पंढरपूर विकास आराखडा म्हणजे सर्व लोकांना सोबत घेऊन आपल्या श्री विठ्ठलाचे जे मंदिर आहे त्या मंदिराचा आणि संपूर्ण मंदिर परिसराचा विकास करणे हेच आमचे ध्येय आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



संत नामदेव महाराजांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री फडणवीस हे बुधवारी येथे आले होते. यावेळी त्यांनी विठ्ठल मंदिरात जाऊन विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले. विठ्ठल मंदिराच्या नामदेव पायरी येथे नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी जावून त्यांनी आरती केली. त्यानंतर विठ्ठल मंदिरात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी कॉंरिडोरला पंढरपूरकरांचा मोठा विरोध होतो आहे या प्रश्नावर ते म्हणाले की, आपल्याला विश्वास आहे की ज्यावेळी आम्ही जनतेमध्ये जाऊ त्यांचाही मोठा पाठिंबा आम्हाला मिळेल. कॉरिडॉरबद्दल शासनस्तरावर किंवा आधिकाऱ्यांकडून नेमकी कोणतीही माहिती दिली जात नाही या प्रश्नाचे उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की,कॉरिडॉरचा आराखडा एकदाचा पुर्ण झाला की सर्वांना विश्वासात घेतले जाईल. आपण आत्तापर्यंत पाहिले असेल की कॉरिडॉरसंदर्भात शासनाकडून, प्रशासनाकडून काहीही लपविण्यात आलेले नाही. कॉरिडॉरमध्ये संभाव्य बाधित मंडळींशी सरकारच्या आधिकाऱ्यांनी यापूर्वीच चर्चा केलेली आहे. सर्वांना प्रश्नावली दिलेली आहे. सर्वांची माहिती देखील घेतलेली आहे. त्यामुळे कुठेही लपुनछपुन काम चालले नाही. जे काम चालले आहे ते उघडपणे चालले आहे आणि होणार आहे. कारण पंढरपूर विकास आराखडा म्हणजे चोरी नाही आहे. पंढरपूर विकास आराखडा म्हणजे सर्व लोकांना सोबत घेऊन आपल्या श्री विठ्ठलाचे जे मंदिर आहे त्या मंदिराचा आणि संपुर्ण मंदिर परिसराचा विकास करणे हेच आमचे ध्येय आहे. या बरोबरच जी मंडळी यामध्ये बाधित होत आहे त्यांना निश्चित आपण भेटू त्याबरोबरच कॉरिडॉर बचाव समितीच्या पुढाऱ्यांना देखील भेटण्याची आपली तयारी असल्याचे ते म्हणाले.

### राज्यपालांना कोणत्याही राजकीय वादात ओढणे योग्य नाही

भाषीक वाद झाले तर महाराष्ट्रात गुंतवणूक कशी येईल? या राज्यपालांच्या वक्तव्या संदर्भात मुख्यमंत्र्यांना विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यपाल जे आहे ते आणि योग्य तेच बोलतात. त्यामुळे राज्यपालांना कोणत्याही राजकीय वादात ओढणे योग्य नाही, असेही त्यांनी सांगितले.

### राजकीय प्रश्नांवर आपण आज बोलणार नाही : मुख्यमंत्री

श्री संत नामदेव महाराजांच्या ६७५ व्या समाधी सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी येथे आपण आज आलेलो आहोत. त्यामुळे श्री विठ्ठलावर, संत नामदेव महाराजांवर, आई जनाबाईंवर बोलण्यासाठी एकत्रित आलेलो आहोत. हा मंदिराचा परिसर आहे. त्यामुळे कोणत्याही राजकीय प्रश्नावर किंवा विषयावर आपण आज प्रतिक्रिया देणार नाही किंवा बोलणार नाही असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले.

## महत्त्वाचे

### निर्देशांक ५४० अंकांनी उसळला

**मुंबई** : जपान आणि अमेरिकेतील व्यापार कराराचा सौदा झाल्याचे वृत्त आल्यानंतर आशियाई शेअर बाजारातील तेजीचा फायदा मिळाल्याने बुधवारच्या सत्रात मुंबई शेअर बाजाराचा



निर्देशांक ५३९ अंकांनी उसळून ८२,७२६ पातळीवर बंद झाला. दिवसभराच्या सत्रात निर्देशांकाने ५९९ अंकांपर्यंतची उसळी घेतली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १५९ अंकांनी उसळून २५,२१९ या पातळीवर बंद झाला. आजच्या सत्रात टाटा मोटर्स, भारती एअरटेल, बजाज फायनान्स, मारुती, बजाज फिनसर्व्ह, आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक आणि रिलायन्स एनर्जीला सर्वाधिक फायदा झाला. ■

### न्या. वर्मांच्या याचिकेवरील सुनावणीसाठी विशेष न्यायासन

**नवी दिल्ली** : न्यायमूर्ती वर्मा यांच्या याचिकेसाठी आता विशेष न्यायासन स्थापन करण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी या संदर्भातील निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. सरन्यायाधीशांनी बुधवारी सांगितले की, न्यायमूर्ती वर्मा यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करण्यासाठी एक विशेष न्यायासन स्थापन करण्यात येईल. दरम्यान, त्यांच्या अधिकृत निवासस्थानातून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जप्त झाल्यानंतर त्यांच्यावर आरोप निश्चित करणाऱ्या तीन न्यायाधीशांच्या अंतर्गत समितीच्या निष्कर्षांना आव्हान देणारी ही याचिका आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाबाबतच्या याआधी झालेल्या चर्चांमध्ये ते आधी सहभागी असल्यामुळे आता या चर्चांमधून ते स्वतःला दूर राहणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती यशवंत वर्मा हे मागील काही महिन्यांपासून चर्चेत आहेत. त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी आग लागल्याच्या घटनेनंतर मोठ्या प्रमाणात बेहिशेबी रोख रक्कम आढळून आली होती. त्यामुळे संपूर्ण देशभरात एकच खळबळ उडाली होती. मात्र, या प्रकरणात त्यांच्यावर झालेले आरोप न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी फेटाळून लावले होते. ■

### सरन्यायाधीश भूषण गवई आजपासून अमरावतीत

**अमरावती** : सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई हे २४ जुलैपासून तीन दिवस अमरावतीच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात ते दारापूर, दर्यापूर, अमरावती येथील विविध कार्यक्रमाला उपस्थित राहतील. गुरुवार, २४ जुलै दुपारी ३.४५ वाजता बेलोरा विमानतळ, अमरावती येथे त्यांचे आगमन होईल. त्यानंतरचा वेळ राखीव आहे. शुक्रवार, २५ जुलै रोजी सकाळी १०.४५ वाजता दारापूर येथील विविध कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. तेथे त्यांचा भव्य सत्कार ग्रामस्थांच्या वतीने होणार आहे. दारापूर हे न्या. गवई यांचे मूळ गाव आहे. त्यानंतर दुपारी ३ वाजल्यापासून दर्यापूर येथील विविध कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर सायंकाळी ५.30 वाजता दर्यापूर येथील नवीन न्यायालय इमारतीचे ते उद्घाटन करणार आहे. यावेळी अनेक मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहे. शनिवार, २६ जुलै रोजी सकाळी १०.३५ वाजता सिपना कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग येथे अमरावती जिल्हा व सत्र न्यायालय येथील ई-लायब्ररीचे उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहून सोयीनुसार ते बेलोरा विमानतळावरून श्रीनगरकडे प्रयाण करतील.

# नवीन कामगार मॉडेलची गरज

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

### भामसंच्या ७० व्या स्थापना दिन समारंभाची दिल्लीत थाटात सांगता

◆ **नवी दिल्ली, २३ जुलै**

बदलत्या परिस्थितीत जगाला नवीन कामगार मॉडेल देण्याची गरज आहे आणि हे आव्हान भारतीय मजदूर संघाला पेलायचे आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी बुधवारी येथे केले.




स्मरणिकेचे विमोचन करताना महामंत्री रवींद्र हिंमते, हिरेनमय पंड्या, सरसंघचालक मोहनजी भागवत व मान्यवर.

भामसंला ७० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त देशभरात वर्षभर आयोजित विविध कार्यक्रमांचा सांगता समारंभ राजधानी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित एका कार्यक्रमात झाला. यावेळी डॉ. मोहनजी भागवत देशभरातून आलेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत होते. यावेळी विशेष अतिथी म्हणून श्रम आणि रोजगार मंत्री मनसुख मंडाविया उपस्थित होते.

भामसंला आज जी प्रतिष्ठा मिळाली, त्यामागे पहिल्या पिढीचे समर्पण, दुसऱ्या पिढीने केलेला संघटनेचा विस्तार तसेच तिसऱ्या आणि चौथ्या पिढीच्या उत्साहावर आणि कार्यक्षमतेवर अवलंबून आहे, याकडे लक्ष वेधत डॉ. भागवत म्हणाले की, ही भावना यापुढेही कायम राहिली पाहिजे. कामगारांचे दु:ख आमच्यासाठी समाजाचे दु:ख आहे. एखादा आमच्याजवळ लाभार्थी म्हणून आला असेल तरी पुढे तो ध्येयार्थी म्हणून चालायला लागतो, ही संघटनेची मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे, असे ते म्हणाले. आजचा प्रसंग हा निव्वळ उत्सवाचा नाही तर आपल्या सगळ्यांसाठी आत्मपरीक्षणाची संधी देणारा आहे, असे स्पष्ट करत डॉ. भागवत म्हणाले की, यानिमित्ताने आम्ही आतापर्यंत काय केले तसेच आम्हाला पुढे काय करायचे आहे, याचा विचार झाला पाहिजे.

भामसंचा ७० वर्षांचा प्रवास हा आमच्यासाठी एक मैलाचा टप्पा आहे, शेवट नाही, असे स्पष्ट करत भामसंचे राष्ट्रीय अध्यक्ष हिरण्मय पंड्या म्हणाले की, भामसं जेव्हा आपल्या शताब्दी पदार्पण करेल तेव्हा ती जगातील कामगारविषयक घडमोडीत योगदान देणारी सर्वांत मोठी संस्था झालेली असेल.

भामसंचे राष्ट्रीय महामंत्री रवींद्र हिंमते यांनी भामसंने ७० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त वर्षभर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचा आढावा सादर केला. भामसंने आपल्या ७० वर्षांच्या प्रवासात कामगारहितांचे रक्षण करताना संघटनेचा देशव्यापी विस्तार केला तसेच आपली वैचारिक स्पष्टताही कायम ठेवली, असे ते म्हणाले.

रा. स्व. संघाचे अ. भा. कार्यकारिणी सदस्य वीर भगाये याचेही यावेळी भाषण झाले. भामसंच्या दिल्ली प्रदेश अध्यक्ष इंदू जामवाल यांनी स्वागतपर भाषण केले.

कार्यक्रमाला दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यासह त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते. भामसंचे राष्ट्रीय पदाधिकारी, विविध राज्यांतील भामसंचे अध्यक्ष आणि महामंत्री तसेच भामसंशी संलग्न देशभरातील कामगार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी सभागृह खचाखच भरले होते. ◂(तभा वृत्तसेवा)

### भामसं कार्यशैली प्रेरणा देणारी : मंडाविया

भामसंची कार्यशैली आपल्याला सगळ्यांना शिकवणारी आणि प्रेरणा देणारी आहे. त्यामुळेच भामसं आज देशातील सर्वांत मोठी आणि जगातील महत्त्वाची अशी कामगार संघटना झाली, असे गौरवोद्गार केंद्रीय मंत्री मनसुख मंडाविया यांनी यावेळी काढले. ■

# खेळांमध्ये पारदर्शकता; बीसीसीआयवर नियंत्रण

## राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक लोकसभेत सादर

◆ **नवी दिल्ली, २३ जुलै**

भारतीय खेळांमध्ये पारदर्शकता, जबाबदारी निश्चित करणे, खेळाडूंशी संबंधित सर्व प्रकारचे वाद सोडविणे आणि प्रशासनात समन्वय साधता यावा अशी तरतूद असलेले राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक -२०२५ केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी बुधवारी लोकसभेत सादर केले. यावर गुरुवारी सभागृहात चर्चा होणार आहे.



मांडवीय यांनी लोकसभेत विधेयकासंदर्भात माहिती देताना सांगितले की, देशात प्रमुख आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याचा भारताचा प्रयत्न आहे आणि त्यासाठी तयारी सुरू आहे. २०३६ मध्ये ऑलिम्पिक स्पर्धेचे आयोजन करण्याचा भाग म्हणून क्रीडा प्रशासनात समन्वय साधणे या विधेयकाचा उद्देश आहे.

विधेयकाचा कायदा झाल्यानंतर बीसीसीआयसह सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय क्रीडा संस्था माहिती अधिकार कायदा-२००५ च्या कक्षेत येईल. राष्ट्रीय क्रीडा प्रशासकीय संस्थांची स्थापना आणि राष्ट्रीय क्रीडा संस्थांच्या कार्यकारी समित्या तसेच खेळाडू समित्यांच्या निष्पक्ष निवडणुकीचे आयोजन करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोग किंवा राज्य निवडणूक आयोगाच्या माजी सदस्यांचा समावेश असलेले राष्ट्रीय निवडणूक पॅनल स्थापन करणे विधेयकातील प्रमुख तरतुदी आहे. याशिवाय मांडवीय यांनी यावेळी राष्ट्रीय डोपिंग विरोधी सुधारणा विधेयक -२०२५ सादर केले.

**निधीसाठी मंडळाची मान्यता अनिवार्य**

खेळांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी एक राष्ट्रीय क्रीडा मंडळ तयार केले जाईल. या मंडळाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात् बीसीसीआय आणि राष्ट्रीय क्रीडा महासंघाकरिता नियम बनवण्याचे आणि त्यांच्यावर देखरेख ठेवण्याचे अधिकार असतील. एनएसबीमध्ये एक अध्यक्ष आणि सदस्य असतील, त्यांची नियुक्ती क्रीडा सचिव, भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे महासंचालक, द्रोणाचार्य, खेलरत्न किंवा अर्जुन पुरस्कार विजेते यांच्या शिफारसीवरून करण्यात येईल. ◂(वृत्तसंस्था)

## बुलेट ट्रेन प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण

◆ **नवी दिल्ली, २३ जुलै**

जपानच्या मदतीने मुंबई-अहमदाबाद हा ५०८ किमीचा बुलेट ट्रेन प्रकल्प सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असून याचे काम २०२९ पर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बुधवारी संसदेत दिली.

लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात माहिती देताना अश्विनी वैष्णव म्हणाले, वापी आणि साबरमतीदरम्यान बुलेट ट्रेन कॉरिडॉरच्या गुजरात भागाचे काम डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे, तर महाराष्ट्र ते साबरमतीपर्यंतचे काम डिसेंबर २०२९ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. बुलेट ट्रेन गुजरात, महाराष्ट्र आणि दादर आणि नगर हवेलीमधून जाईल. ही ट्रेन मुंबई, ठाणे, विरार, बोईसर, वापी, बिलीमोरा, सुरत, भरूच, वडोदरा, आणंद, अहमदाबाद आणि साबरमती येथील १२ स्थानकांवर थांबणार आहे. प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे १.०८ लाख कोटी रुपये आहे. ◂(वृत्तसंस्था)

# नितीन गडकरी यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

### १ ऑगस्टला पुरस्कार वितरण ● मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार

◆ **पुणे, २३ जुलै**

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (हिंद स्वराज्य संघ) वतीने देण्यात येणारा अत्यंत प्रतिष्ठेचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार यंदा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना जाहीर झाला आहे. शुक्रवार १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक यांची १०५ वी पुण्यतिथी आहे. त्या दिवशी सकाळी १०.३० वाजता टिळक स्मारक मंदिरात होणाऱ्या सोहळ्यात ना. गडकरी यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल

टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पुरस्कार वितरण सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे उपस्थित राहणार आहेत. लोकमान्य टिळक राष्ट्रीय सन्मान देऊन गौरविलेल्या आजवरच्या पुरस्कारार्थींच्या जीवनकार्याचा



आढावा घेणारा इंग्रजी ग्रंथ तयार करण्यात आला आहे. या ग्रंथाचे प्रकाशन पुरस्कार वितरण सोहळ्यात होईल.

रस्ते हे विकासाचे साधन आहे, हे ओळखून नितीन गडकरी यांनी देशभर महामार्गांचे जाळे उभारले. सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या प्रारूपातून त्यांनी देशातील पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. नमामी गंगा प्रकल्पाला त्यांच्याच प्रयत्नाने लोकचळवळीचे स्वरूप आले, असे डॉ. रोहित टिळक यांनी नमूद केले.

स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र आणि एक लाख रुपये असे लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराचे स्वरूप आहे.

**आतापर्यंत कोणाकोणाला मिळाला पुरस्कार?**

एस. एम. जोशी, पंतप्रधान नरेंद्र मोदी, कॉम्रेड डांगे, इंदिरा गांधी, डॉ. मनमोहन सिंग, अटलबिहारी वाजपेयी, प्रणव मुखर्जी, शरद पवार, राहुलकुमार बजाज, जी. माधवन नायर, एन. आर. नारायण मूर्ती, डॉ. शिवथाणू पिल्ले, मॉंटेकसिंग अहलुवालिया, डॉ. कोटा हरिनारायण, डॉ. के. सिवन, बाबा कल्याणी, डॉ. सायरस पुनावाला, सुधा मूर्ती यांना या पुरस्काराने गौरविले. ◂(वृत्तसंस्था)

# ‘ऑपरेशन सिंदूर’वर २८ रोजी होणार चर्चा

### १६ तास निश्चित ● पंतप्रधानांच्या उपस्थितीत राजनाथसिंह देणार उत्तर

### ● विरोधी पक्षाने केंद्र सरकारकडे केली होती चर्चेची मागणी

◆ **नवी दिल्ली, २३ जुलै**

राज्यसभेच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत बुधवारी विरोधी पक्षाने पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरवर चर्चेची मागणी केली. या मुद्यावर राज्यसभेत पुढील आठवड्यात दोन दिवस १६ तास चर्चा व्हावी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यासाठी उपस्थित राहतील याची काळजी घेण्यात यावी, अशी मागणी विरोधकांनी केली. या बैठकीला विविध पक्षांचे नेते, राज्यसभेतील नेते जे. पी. नड्डा आणि संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू उपस्थित होते. उपाध्यक्ष हरिवंश बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.




ही बैठक सोमवारी होणार होती. मात्र, उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांच्या राजीनाम्यामुळे ती बारगळली. पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरवर पुढील आठवड्यात चर्चा करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेत्यांनी एकमताने केली. लोकसभेत यावर चर्चा सुरू झाल्यावर दुसऱ्या दिवशी राज्यसभेत व्हायला पाहिजे, अशी मागणी विरोधकांनी केल्याचे कॉंग्रेसचे राज्यसभेतील उपनेते प्रमोद तिवारी यांनी सांगितले.

ऑपरेशन सिंदूरवर २८ जुलैपासून लोकसभेत चर्चा होणार आहे. ही चर्चा १६ तास होईल, अशी माहिती समोर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी चर्चेदरम्यान सभागृहात उपस्थित राहतील. यावर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उत्तर देणार आहेत. ही एक सामान्य चर्चा असेल. कोणताही प्रस्ताव आणला जाणार नाही. चर्चेवेळी पंतप्रधान सभागृहात उपस्थित राहतील, असे आश्वासन दिले असल्याचे प्रमोद तिवारी यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)

**‘सर’ वरून संसदेत विरोधकांचा गोंधळ**
(वृत्त शेवटच्या पानावर) ▸

# उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीची तयारी सुरू

◆ **नवी दिल्ली, २३ जुलै**

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीची तयारी निवडणूक आयोगाने सुरु केली आहे. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीची तयारी आम्ही सुरु केली असून निवडणुकीचा कार्यक्रम लवकरच जाहीर केला जाईल, असे आयोगाने आज एका प्रसिध्दीपत्रकातून म्हटले आहे.



जगदीप धनकड यांनी सोमवारी रात्री अचानक प्रकृतीच्या कारणावरुन उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला होता. धनकड यांचा राजीनामा राष्ट्रपती द्रौपदी मुर्म यांनी स्वीकारला असून राजीनाम मंजूर झाल्याबाबतची अधिसूचना गृहमंत्रालयाने जारीही केली आहे. धनकड यांनी राष्ट्रपती मुर्मू यांची प्रत्यक्ष भेट घेऊन राजीनामा सादर केला होता. उपराष्ट्रपतिदाच्या निवडणुकीची तयारी म्हणून आयोगाला आधी या निवडणुकीची मतदारयादी तयार करावी लागणार आह. या निवडणुकीसाठी लोकसभा आणि राज्यसभेचे सदस्यच मतदान करु शकतात. त्यानंतर आयोगाला या निवडणुकीसाठी निवडणूक अधिकारी आणि सहायक निवडणूक अधिकाऱ्याची घोषणा करावी लागणार आहे. त्यासोबत आतापर्यंत झालेल्या उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीबाबतची सर्व माहिती एकत्र करावी लागणार आहे. यासंदर्भातील परिपत्रक आयोगाने आज काढले.

घटनेतील ३२४ अनुच्छेदांर्तगंत निवडणूक आयोगाला उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचा अधिकार मिळाला आहे. राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणूक कायदा १९५२ तसेच १९७४ च्या दुरुस्तीनुसार या दोन्ही निवडणुका निवडणूक आयोगाला घ्याव्या लागतात. ◂(वृत्तसंस्था)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे...

### महापालिका आयुक्तांनी केली 'त्या' सार्वजनिक स्वच्छतागृहाची पाहणी

**सोलापूर, दि.२३ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचं लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगरामधील सार्वजनिक स्वच्छतागृहाची पाहणी केली. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी याबाबत तक्रार केली होती. सोलापूर शहरातील बुधवार पेठ परिसरातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, जय मल्हार चौक प्लॉट नंबर १७ प्लॉट नंबर १८ यामधील सार्वजनिक स्वच्छतागृह बाबत गेल्या अनेक वर्षापासून नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबतच्या तक्रारी त्या परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद दादा चंदनशिवे व सर्व सामाजिक संघटना सर्व नागरिकांनी केली होती. तिथे सार्वजनिक स्वच्छतागृह नव्याने बांधण्याबाबत अनेकदा पाठपुरावा केला. आज सकाळी अकरा वाजता सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या सार्वजनिक स्वच्छतागृहाची पाहणी केली. येथील नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. योग्य ती कार्यवाही करावी अशा सूचना यावेळी दिल्या. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, झोन एकचे अधिकारी अविनाश अंत्रोळीकर, सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक चराटे, घनकचरा नागेश मेंडगुळे, उपअभियंता कन्ना , आरोग्य निरीक्षक बसवराज जमादार आदी उपस्थित होते.






### लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात 'एक पेड माँ के' नाम उपक्रम

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालय, वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजना एकका अंतर्गत 'एक पेड माँ के नाम' उपक्रम महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करून राबविण्यात आला. लोकमंगल समूहाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष देशमुख यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाच्या अंतर्गत महाविद्यालयाच्या प्रांगणात पेरू व जांभळाची रोपे लावण्यात आली. पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकानी प्रत्येकी एक रोप लावून उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमांतर्गत एकूण ६० रोपांचे वृक्षारोपण महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.आशिष सरकाळे, प्रा. वर्षा मानेदेशमुख, प्रा. सायली बडेकर, प्रा. अंकिता पवार व स्वयंसेवक उपस्थित होते.

# बांधकाम परवानगीसाठी पैशाची मागणी झाल्याच्या तक्रारी आयुक्तांना प्राप्त

- लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्याची प्रक्रिया सुरू
- अतिरिक्त आर्थिक मागणी केल्यास व्यवहार करू नका आयुक्त : डॉ. ओम्बासे





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**



सोलापूर महानगरपालिकेकडून दिला जाणाऱ्या बांधकाम परवानगीबाबत विहित शुल्काशिवाय अधिकाऱ्यांचे नावे ज्यादा पैशांची अर्थात लाचेची मागणी काही लोकांकडून झाल्याच्या तक्रारी महापालिका आयुक्तांकडे प्राप्त झाल्या आहेत.

यासंदर्भात महापालिका प्रशासनाकडून लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे लाच मागणारे आयुक्तांच्या रडारवर आले आहेत. महापालिकेकडून यासंदर्भात खास प्रसिद्धीपत्रक काढून सर्व नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात आले आहे की, महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या परवानग्यासाठी निश्चित शासकीय शुल्क शिवाय वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाने आगाऊ वा अवैध पद्धतीने आर्थिक मागणी काही लोकांकडून होत आहेत.

याबाबत तक्रारी महानगरपालिकेला प्राप्त झाल्या आहे. याबाबत महानगरपालिकेकडून लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया सुरु आहे. जर अशाप्रकारे कोणी अतिरिक्त आर्थिक मागणी करीत असेल तर तो व्यवहार करण्यात येऊ नये. महानगरपालिकेकडून निर्धारित प्रक्रिया नियम याशिवाय कोणतीही परवानगी दिल्या जात नाही किंवा दिली जाणार नाही. त्यामुळे कोणत्याही प्रलोभनापासून नागरिकांनी सजग राहावे तसेच अशा प्रकरणांची तक्रार/माहिती .. या ई-मेल वर कळवावी. कोणत्याही नागरिकाची फसवणूक झाल्यास त्याला महानगरपालिका जबाबदार राहणार नाही, असे या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.



# अशोक लांबतुरे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी (ता.उत्तर सोलापूर) या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, दलित मित्र, सिद्धेश्वर सहकारी बँकेचे संचालक, अश्विनी सहकारी रुग्णालय सोलापूरचे संचालक अशोक लांबतुरे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसा निमित्त यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी येथील इ.१ली ते ७ वी पर्यंतच्या १७६ विद्यार्थ्यांची व ९ शिक्षक कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी अश्विनी रुग्णालयच्या वतीने करण्यात आली.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा लांबतुरे, सचिव मधुकर गवळी, संचालक शंकर जाधव, मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे-गवळी, डॉ. कविता सोनकांबळे, डॉ. श्रीकांत फुलारी, पत्रकार उज्वलकुमार माने, उपकर्मचारी कार्यकारी अधिकारी स्वप्नील लांबतुरे, शरद बनसोडे, शहाजी भोसले, संगीता व्हनकोळे-जाधव, विद्या हराळे-लांबतुरे उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांची सर्दी, खोकला, ताप, डोकेदुखी, दाढ दुखी, पोटदुखी, जखम, मळमळ, उलटी आदी आजाराचे निदान करुन मोफत तपासणी केली. सर्व आजारावरील औषध दिले. सूत्रसंचालन विनोद कोळेकर यांनी केले तर मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे यांनी आभार मानले.

# संस्कार भारती आयोजित 'अभ्यासोनी प्रकटावे'

### दिग्दर्शक राजदत्त आणि चित्रकार वासुदेव कामत यांच्याशी सुसंवाद

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२३ जुलै-**

संस्कार भारतीच्या वतीने येत्या ३ ऑगस्ट रोजी 'अभ्यासोनी प्रकटावे' या विशेष वार्तालाप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांना पद्मभूषण तर ज्येष्ठ चित्रकार वासुदेव कामत यांना पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सन्मानार्थ अभ्यासोनी प्रकटावे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सुप्रसिद्ध गायिका उषा मंगेशकर यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती असणार आहे.

प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिर येथे ३ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता संस्कार भारती कोकण प्रांताच्या वतीने हा सन्मानसोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात दिग्दर्शक दत्तात्रेय मायाळू उपाख्य राजदत्त आणि चित्रकार वासुदेव कामत यांच्याशी चतुरंग प्रतिष्ठानचे विद्याधर निमकर हे सुसंवाद साधणार आहेत. मराठी चित्रपटसृष्टीत तसेच मालिकाविश्वात दिग्दर्शकीय कर्तृत्वाने स्वतःचा वेगळा ठसा उमटवणारे राजदत्त यांना पद्मभूषण(२०२४) पुरस्काराने गौरवण्यात आले. वासुदेव कामत यांनी चित्रकला क्षेत्रात आपली वेगळी शैली निर्माण केली असून त्यांनाही उल्लेखनीय कामगिरीबद्दल पद्मश्रीने(२०२५) गौरवण्यात आले. हे दोघेही मान्यवर संस्कार भारतीचे अखिल भारतीय अध्यक्ष राहिले आहेत. या कार्यक्रमात दोन्ही सन्मानित मान्यवरांचे अनुभव, कार्य आणि विचार यावर आधारित विशेष संवाद होणार असून, त्यांच्या कलेतील प्रवासाची प्रेरणादायी झलक प्रेक्षकांना ऐकायला मिळणार आहे. चित्रपट व चित्रकलेतील अनेक दिग्गज या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. चित्रकला क्षेत्राशी तसेच चित्रपट क्षेत्राशी संबंधित असणाऱ्यांनी त्याचप्रमाणे सर्वसामान्य रसिकांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन संस्कार भारती कोकण प्रांत अध्यक्ष, अभिनेते सुनील बर्वे यांनी केले आहे. कार्यक्रमात उपस्थित राहण्यासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून https://forms.gle/XLmFn3iCs4j6Lmvz7 या लिंकच्या आधारे नोंदणी करावी असेही संस्कार भारतीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. नावनोंदणीसाठी श्रीहरी कुलकर्णी(९६१९१ ९१९८३) यांना संपर्क करावा.

# पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात १४२ उमेदवारांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूरच्या वतीने दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयात पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात १४२ उमेदवारांची निवड करण्यात आली.

संस्थेचे स्थानिक सचिव डॉ. महेशजी चोप्रा, प्रशासकीय अधिकारी डॉ. व्ही. पी. उबाळे, प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी, उद्योजकता केंद्राचे अधिकारी हनुमंत नलावडे यांचे उमेदवारांना मार्गदर्शन लाभले. वेगवेगळ्या १३ कंपन्या त्यांना लागणाऱ्या मानवी संसाधनांची भरती केली. एकूण ९४२ जागांसाठी ३४४ उमेदवारांनी सहभाग नोंदवला. हा मेळावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य राखून आयोजित करण्यात आला होता.



युवकांना नोकऱ्या देण्याकरिता आलेल्या कंपन्यांचे डॉ. चोप्रा यांनी आभार मानले. या मेळाव्यात चैतन्य इंडिया फिनक्रिडीट प्रा. लि. , कायझन होंडा, स्मृती ऑर्गेनिक प्रा. लि., सृजन फूडस प्रा. लि., मुथूट मायक्रो फा. प्रा. लि., श्रीविज्ञा इंफोटेक, आर. के. एंटरप्रायझेस, एशियन मॅन पावर, किरण इन्फोटेक प्रा. लि., स्पिनी व्हॅल्यू ड्राईव्हटेक प्रा. लि., इक्विटास बँक, वर्कफोर्स सेंटर, व्ही ट्रान्स प्रा. लि., या कंपन्यांनी मुलाखती घेतल्या. या आयोजनात डॉ. शामकुमार देशमुख, डॉ.जी.डी.बिराजदार, डॉ. आर. व्ही. शिंदे, प्रा. जी. एस. घनाते,डॉ.ए.एस.बिराजदार यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपातर्फे रक्तदानाच्या महायज्ञाची विक्रमी नोंद

### एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सतर्फे सन्मान

**मुंबई, दि.२३ जुलै**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे मंगळवारी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरांनी दोन विश्व विक्रम प्रस्थापित केले. या उपक्रमाची नोंद एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये झाली असून त्यांच्या एशिया प्रतिनिधींनी बुधवारी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना सन्मानित केले.

एका दिवसात पक्षाच्या संघटनात्मक रचनेतील सर्व १२२१ मंडलांमध्ये सर्वाधिक १०८८ रक्तदान शिबिरांचे आयोजन आणि सर्वाधिक ७८ हजार ३१३ युनिट्स रक्ताचे संकलन, असे दोन विश्वविक्रम नोंदविले गेले. प्रदेश भाजपा आणि डॉ. मुखर्जी न्यासाच्यावतीने मंगळवारी या उपक्रमाचे आयोजन केले होते. एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स चे वरिष्ठ परीक्षक संजय भोला, वरिष्ठ परिक्षक सीमा मन्नीकोट यांच्या हस्ते चव्हाण यांना प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली. प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माधवी नाईक, राजेश पांडे, विजय चौधरी, मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, कार्यालय सह-सचिव भरत राऊत आदी उपस्थित होते. यावेळी चव्हाण म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अव्याहतपणे कार्य करत आहेत त्यांच्याप्रति आदर व्यक्त करण्याची संधी या शिबिरांमुळे सर्वांना मिळाली.



# मागास भागातील समृद्धी साधण्यास प्राधान्य : मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२३ जुलै-**

शासनाच्या पुढाकाराने गडचिरोली जिल्ह्यात कॉर्पोरेट फाउंडेशनच्या आर्थिक मदतीने बाएफद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या माध्यमातून या स्थानिक रोजगार संधी विस्तारण्यास पूरक वातावरण निर्माण होत आहे. याद्वारे येथील नागरिकांचे जीवनमान उंचावून समुदायाचे कल्याण आणि समृद्धी साधणे ही उद्दिष्टे साध्य होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केले.

कॉर्पोरेट फाउंडेशनच्या सहकार्याने बाएफ संस्थेमार्फत गडचिरोली जिल्ह्यात विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत.



त्यात स्थानिक नागरिकांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील मागास असलेल्या एटापल्ली या आकांक्षित तालुक्यात समन्वित उपजिविका विकास कार्यक्रम एटापल्ली तालुक्यातील २० गावात राबविण्यात येत आहे. याची प्रायोजक संस्था एसबीआय फाउंडेशन आहे. १ एप्रिल २०२५ पासून पुढील ३ वर्षेपर्यंत हा उपक्रम राबविला जाणार आहे. यासाठी एकूण खर्च: ४.९५ कोटी अपेक्षित असून यामध्ये १५०० लाभार्थी कुटुंबे समाविष्ट आहेत.

# मुंबईकराची तहान भागविणारा तानसा तलाव ओव्हरफ्लो!



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२३ जुलै-**

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणा-या ७ तलावांपैकी तानसा तलाव बुधवारी भरुन ओसंडून वाहू लागला. सायंकाळी ५ वाजून ४० मिनिटांनी हा तलाव ओसंडून वाहू लागला आहे. महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणा-या ७ तलावांपैकी 'हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशयाचे' ३ दरवाजे ७ जुलैला तर ९ जुलैला मोडक सागर तलाव ओसंडून वाहू लागला होता.

त्यापाठोपाठ आज तानसा तलाव देखील ओसंडून वाहू लागला आहे. आज सकाळी ६ वाजता करण्यात आलेल्या मोजणीनुसार सर्व सातही तलावांमध्ये त्यांच्या एकूण क्षमतेच्या ८६.८८ टक्के इतका जलसाठा आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात तानसा धरण असून हे सर्वात जुन्या दगडी बांधांपैकी एक मानले जाते. तानसा तलावाची कमाल जलधारण क्षमता ही १४,५०८ कोटी लीटर (१४५,०८० दशलक्ष लीटर) एवढी आहे. गतवर्षी हा तलाव २४ जुलैला पहाटे ४.१६ वाजता भरला होता.

# फेस ॲपवर नोंदणी केलेल्यांनाच वेतन

### महसूलमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई दि २३ जुलै -**

केंद्र सरकारने महसूल विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी फेस ॲप आणि जिओ-फेन्सिंग प्रणाली अनिवार्य केली असल्याने कर्मचाऱ्यांची उपस्थिती आता कार्यालयातूनच नोंदवली जाणार आहे. त्यामुळे, ऑगस्ट महिन्याचा पगार केवळ फेस ॲपवर नोंदणी केलेल्या कर्मचाऱ्यांनाच मिळेल, असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

याबाबतचा स्पष्ट शासन निर्णय लवकरच काढण्यात येणार असल्याचे स्पष्ट करून ते म्हणाले, प्रशासनात गतिमानता, पारदर्शकता आणि लोकाभिमुखता आणण्यासाठी विविध विभागांचा आढावा घेणे सुरु केले आहे. त्यातून अनेक विषय पुढे येत आहे. आज, रायगड जिल्ह्यातील महसूलच्या कामकाजा आढावा घेण्यात आला. महसूली अधिकाऱ्यांकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांवर मंत्री बावनकुळे यांनी चिंता व्यक्त केली. गेल्या चार महिन्यांत महसूलमंत्री म्हणून सर्व जबाबदाऱ्या सांभाळत ८०० प्रकरणे निकाली काढली आहेत.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मोठ्या मुर्तींचे विसर्जन समुद्रात

### सरकारचे उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२३ जुलै**

पर्यावरणाचा समतोल राखत घरगुती गणेश मुर्ती कृत्रिम तलावात तर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मोठ्या मुर्ती या परंपरागत समुद्रात विसर्जन करण्यात येतील व पर्यावरणाबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे प्रतिज्ञापत्र राज्य सरकारने बुधवारी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केले. त्याबाबत पुन्हा उद्या सुनावणी होणार असून न्यायालय कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

पिओपीवरील बंदीमुळे लाखो मुर्तीकारांच्या रोजगार बुडणार व या एका मोठ्या उद्योगाचे अर्थकारण अडचणीत येणार असल्याने राज्याच्या राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान आयोगाला अभ्यास करण्याची विनंती मंत्री केली होती. या आयोगाने डॉ अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट स्थापन करुन पिओपी व त्यामुळे पर्यावरणावर होणारे परिणामाचा अभ्यास करुन सादर केलेल्या शिफारशी व सूचना केंद्रीय पर्यावरण विभागाने न्यायालयात मांडल्यानंतर न्यायालयाने पिओपी वापरावरील घालण्यात आलेली बंदी उठवत मोठ्या गणेशमूर्ती कुठे



विसर्जनाबाबत शासनाला प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले होते. शासनाने डॉ. काकोडकर यांच्या समितीचा आधार घेत मोठ्या मुर्ती विसर्जनासाठीचा अभ्यास करुन आज न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे व न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर आज ही सुनावणी झाली. राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी राज्य सरकारचे धोरण सादर केले.

दरम्यान, विशेषतः मुंबईतील मानाचे आणि मोठ्या गणेश मूर्तींच्या समुद्रात विसर्जनाबाबत परंपरेचा सन्मान राखत विसर्जन होईल अशी भूमिका शासनाने मांडली आहे. पर्यावरणीय समतोल लक्षात घेऊन मर्यादित उंचीच्या सर्वात जास्त संख्या असलेल्या घरगुती व लहान मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची व्यवस्था पूर्वीप्रमाणेच राहणार आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने जागृत राहून काही उपाययोजना ही केल्या जातील अशी भूमिका शासनाने घेतली आहे.

# राजीनाम्यापूर्वी धनकड यांची राष्ट्रपती भवनाला अचानक भेट

**नवी दिल्ली, २३ जुलै**

राजीनामा देण्यापूर्वी माजी उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी सोमवारी सायंकाळी राष्ट्रपती भवनाला अचानक भेट दिली होती, असे अधिकृत सूत्रांनी सांगितले. धनकड यांनी सोमवारी रात्री नऊ वाजता राष्ट्रपती मुर्मू यांची भेट घेतली आणि त्यांचा राजीनामा सोपवला. त्यांनी 'एक्स'वर आपला राजीनामा सार्वजनिक केला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी आणि वैद्यकीय सल्ल्याचे पालन करण्यासाठी मी संविधानाच्या कलम ६७ (अ) नुसार तत्काळ प्रभावाने भारताच्या उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा देत आहे, असे धनकड यांनी पत्रात म्हटले आहे. धनकड यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये उपराष्ट्रपती पदाची सूत्रे स्वीकारली आणि त्यांचा कार्यकाळ ऑगस्ट २०२७ पर्यंत होता. त्यांनी पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी पदाचा राजीनामा दिला आहे.

# विविध संताच्या स्मारकांसाठी भूसंपादनाचा विषय लवकरच मार्गी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै**

जिल्ह्यातील विविध तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वेगवेगळ्या संताच्या स्मारकासाठी आवश्यक असणाऱ्या जमीनीचे भूसंपादन करण्याचा विषय आता अजेंड्यावर घेण्यात आला आहे.

त्यामुळे मंगळवेढ्यात होणाऱ्या संत बसवेश्वर महाराज स्मारक, पंढरपूरात होणारे श्री संत नामदेव महाराज आणि अरण येथे होणाऱ्या श्री संत सावता माळी स्मारकासाठी लागणाऱ्या जमीनीचा विषय आता लवकरच मार्गी लागणार आहे. त्यासाठी प्रशासनाने तो विषय प्राधान्याने घेतला आहे. त्यामुळे लवकरच या स्मारकांना जमीन उपलब्ध करुन दिली जाणार असल्याची माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.मंगळवेढा येथे श्री संत बसवेश्वर महाराज यांचे स्मारक प्रस्तावित आहे.

त्यासाठी शासनाच्या नावे असलेल्या कृष्णा तलावाची जवळपास २५ एकर जमीन स्मारकासाठी देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.



तर पंढरपूर येथे होणाऱ्या श्री संत नामदेव महाराज स्मारकासाठी रेल्वे विभागाची १५ एकर जागा मिळालेली असून, त्या ठिकाणी स्मारकाचा आराखडा तयार करुन लवकरच कामाला सुरुवात केली जाणार आहे. तर अरण, ता. माढा येथील श्री संत सावता माळी संजीवन समाधी या तीर्थक्षेत्राला नुकताच अ दर्जा मिळाला आहे. त्या ठिकाणी शासनाच्या वतीने १५० कोटी रुपयांच्या कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी नव्याने काही गोष्टी निर्माण करण्यासाठी किमान १२ एकर जमीनीचे भू संपादन करण्यात येणार आहे. त्यासाठी लवकरच अधिकाऱ्यांची नेमणूक करुन त्या स्मारकासाठी लागणारी जमीन अधिग्रहीत केली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली आहे. या प्रस्तावित स्मारकांच्या समित्या अनेक ठिकाणी गठीत झालेल्या नाहीत, त्या झाल्यानंतर या स्मारकांच्या कामांना गती मिळेल असा विश्वास जिल्हा प्रशासनाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### एक्सप्रेस फिडरप्रकरणी महावितरणला ग्राहक मंचची जप्तीची नोटीस

**बार्शी, दि २३ जुलै -**

या घटनेबाबतची माहिती अशी की, महावितरणला धडा शिकवण्यासाठी बार्शी नगरपालिकेने सोलापूर ग्राहक मंचामध्ये केस केली होती. बार्शी नगरपरिषदेकडून १००% रक्कम भरुनही शहरातील जनतेची कामे वेळेवर महावितरणकडून केली जात नव्हती. बार्शी शहराला पाणीपुरवठा करणारी चांदणी जलशुद्धीकरण केंद्र येथे नगरपरिषदेने एक्सप्रेस फिडरची मागणी करुनही नगरपरिषदेला फसवून लिंकलाईन दिली व त्यामुळे वारंवार पाणीपुरवठ्यामध्ये व्यत्यय निर्माण झाला. ॲड. शिवाजी क्षीरसागर व श्रीमती यु. डी. फरताडे यांनी बार्शी नगरपरिषदच्यावतीने वीज वितरण कंपनी विरोधात सोलापूर, मुंबई व दिल्लीत कायदेशीर लढाई जिंकली. त्यानंतर आता ग्राहक मंचाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता महावितरण कंपनीच्या विरुद्ध अर्ज दाखल केला आहे. सोलापूर जिल्हा तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्षा गोस्वामी मॅडम व सदस्य बहिरट मॅडम यांनी महावितरण कंपनीच्या विरुद्ध अद्याप आदेशाचे पालन न केल्यामुळे आपली स्थावर व जंगम मालमत्ता विक्री करुन देणे वसूल का करण्यात येऊ नये? अशा प्रकारची नोटीस पोलीस अधीक्षक (ग्रामीण) कार्यालय सोलापूर यांचेमार्फत काढलेली आहे. पुढील सुनावणी दि. ३ सप्टेंबर रोजी ठेवण्यात आलेली आहे.

### सोलापूर-तिरुपती साप्ताहिक विशेष गाड्यांचा मार्ग धर्मवरम पर्यंत वाढवला

**सोलापूर दि. २३ जुलै -**

प्रवाशांच्या मागणीनुसार, रेल्वेने सोलापूर - तिरुपती साप्ताहिक विशेष गाड्यांचा मार्ग धर्मवरम पर्यंत वाढवीला असून सोलापूर ते धर्मवरम दरम्यान अतिरिक्त २० साप्ताहिक विशेष गाड्या चालवल्या जातील. यामध्ये सोलापूर धर्मवरम साप्ताहिक विशेष साड्यांच्या फेऱ्या या वीस असणार आहेत. ०१४३७ साप्ताहिक विशेष गाडी दि. २४ जुलै ते २५ सप्टेंबरपर्यंत दर गुरुवारी २३:२० वाजता सोलापूरहून निघेल आणि तिसऱ्या दिवशी ०३:३० वाजता धर्मवरम येथे पोहोचेल. ०१४३८ साप्ताहिक विशेष २६ जुलै ते २७ सप्टेंबरपर्यंत दर शनिवारी धर्मवरम येथून ०५:३० वाजता निघेल आणि तिसऱ्या दिवशी १०:३० वाजता सोलापूरला पोहोचेल. या रेल्वे गाड्यांचे थांबे कुर्डुवाडी, बार्शी टाउन, धाराशिव, लातूर, लातूर रोड, बीदर, कलबुरगि, वाडी, यादगिर, कृष्णा, रायचूर, मंत्रालयम रोड, अदोनी, गुंतकल, गुत्ती, ताडिपत्रि, यरागुंटला, कडपा, राजमपेटा, रेणिगुंटा, तिरुपती, पाकाला, पीलेर, मदलपल्ली रोड, मुलकला चेरुवू आणि कदिरी असे असतील तर १ - टियर, १ - टियर, ११ स्लीपर क्लास, ४ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ लगेज कम ब्रेक व्हॅन अशी रचना या रेल्वे गाड्यांचे असणार आहे. विशेष गाड्यांच्या ०१४३७/०१४३८ च्या सततच्या फेऱ्यांसाठी विशेष शुल्कासह आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि ... या वेबसाइटवर खुले आहे. अनारक्षित डब्यांसाठी आरक्षण स्थानकांवरील बुकिंग काउंटर आणि ॲपद्वारे देखील करता येते. या विशेष गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया भेट द्या किंवा ॲप डाउनलोड करावे असे आवाहन रेल्वे विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



### खुनाच्या प्रयत्नातील आरोपी सूरज गायकवाड दुसऱ्यांदा स्थानबद्ध

**सोलापूर, दि. २३ जुलै -**

शहरातील जोडभावी पेठ पोलिस ठाणे हद्दीतील सराईत गुन्हेगार सूरज राम गायकवाड (वय ३९, रा. धाकटा राजवाडा, कौतम चौक) याला दुसऱ्यांदा एमपीडीए कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करत त्याची पुण्यात रवानगी करण्यात आली आहे. सूरज गायकवाड याच्यावर मागील, काही वर्षांपासून जीवघेण्या घातक शस्त्रासह फिरणे, घातक शस्त्राने इच्छापूर्वक जबर दुखापत करणे, खुनाचा प्रयत्न करणे, गैरकायद्याची मंडळी जमवून मारामारी करणे, जबरी चोरी, खंडणी मागणे असे विविध गंभीर पाच गुन्हे शहरात दाखल आहेत. यामुळे त्यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे. त्याच्या या गुन्हेगारी कृत्यामुळे सोलापूर शहरातील नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊन, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झाली आहे. शिवाय त्याच्याविरुद्ध सामान्य नागरिक उघडपणे पोलिसांना माहिती देत नव्हते. दरम्यान, सूरज गायकवाड याला त्याच्या गुन्हेगारी कारवायांपासून परावृत्त करण्यासाठी त्याच्यावर स्थानबद्धतेची प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतरही, सूरज याच्या गायकवाड वर्तनात कोणताच बदल झाला नाही आणि त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा होईल, असे वरीलप्रमाणे गुन्हेगारी कृत्य चालू ठेवले. त्यामुळे त्याच्या गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध घालण्यासाठी पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी स्थानबद्धतेचे आदेश काढले. त्यानुसार त्याची रवानगी येरवडा कारागृह येथे करण्यात आली.

### पुणे येथील मुलाची सोलापुरात आत्महत्या

**सोलापूर, दि. २३ जुलै -**

पुणे येथील ससाणे कॉलनीत राहणा-या १६ वर्षाच्या मुलाने सोलापुरातील जुळे सोलापुरातील म्हाडा कॉलनीतील घरात साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार बुधवारी दुपारी १२.३० वाजता उघडकीस आला. शिवशरण भुताळी तळकोटी (वय १६, रा. ससाणे कॉलनी पुणे- सध्या म्हाडा कॉलनी जुळे सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव आहे. बुधवारी दुपारच्या सुमारास शिवशरण हा म्हाडा कॉलनीतील घरातील हॉलमधील पंख्याला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यास नातेवाईकांच्या मदतीने खाली उतरवून पोलीस हवालदार बर्हिजे यांनी बेशुध्दावस्थेत त्यास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कुसमोड येथे अर्जुन लेंगरे यांच्या बैलाचा लंपीमुळे मृत्यू

**पिलीव, दि २३ जुलै-**

कुसमोड (ता. माळशिरस) येथील अर्जुन लेंगरे यांच्या रेसच्या बैलाला लंपीमुळे मृत्यू झाला. लेंगरे कुटुंबीयांच्या आवडत्या बैलाने सोमवारी दुपारी शेवटचा श्वास घेतला. परिसरातील सर्वच नागरिकांच्या डोळ्यातुन अक्षरशः आपोआपच अश्रू वाहु लागले. यामुळे खरेतर माणसापेक्षाही जास्त प्रेम करणारे लेंगरे कुटुंबीय निशब्द झाले. तब्बल सात लाख रुपयाला सदरच्या बैलाची मागणी होऊनही रेससाठी प्रचंड चांगला असणाऱ्या बैलाची विक्री करणे लेंगरे कुटुंबायला मान्य नव्हते पण नियतीने सदरच्या बैलाचा मृत्यू झाला तेव्हा खरेतर संपूर्ण लेंगरे कुटुंबीय याच्या मृत्यूमुळे निशब्द झाले.

# हिंदी-मराठी वादात राज्यपालांची उडी

## म्हणाले मारहाण झाल्यास मराठी कसे बोलेन?

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४ जुलै-**

राज्यात हिंदी भाषा पहिलीपासून लागू करण्याच्या राज्य सरकारच्या प्रयत्नामुळे हिंदी-मराठी वादामुळे राजकारण तापले असताना आता त्यामध्ये राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी उडी घेतली आहे. मराठी न बोलण्याच्या मुद्द्यावरुन झालेल्या गैरवर्तनाच्या घटनांबद्दल चिंता व्यक्त करतजर तुम्ही मला मारहाण केली तर मी लगेच मराठी बोलू लागेन का? असा सवाल राजभवनात झालेल्या एका कार्यक्रमात उपस्थित केला. त्यासाठी त्यांनी तामिळनाडूमधील घटनेची आठवणही सांगितली.



ते म्हणाले, ''आजकाल मी वर्तमानपत्रांमध्ये पाहतो की लोक म्हणत आहेत,जर तुम्ही मराठी बोलला नाही तर तुम्हाला मारहाण होईल.तमिळनाडूमध्येही असेच घडले होते,, ''मी खासदार असताना एकदा मी महामार्गावर जात असताना दोन गटांमध्ये भांडण झाले. मी हे प्रकरण काय आहे?, ते पाहण्यासाठी खाली उतरलो असता मला पाहून काही लोक पळून गेले. मग मी मारहाण झालेल्या गटाला विचारले की काय समस्या आहे. ते माझ्याशी हिंदीत बोलू लागले. मला हिंदी नीट येत नाही, म्हणून मी जवळच्या एका हॉटेल मालकाला विचारले की हे लोक काय बोलत आहेत. हॉटेल मालकाने सांगितले की त्यांना मारहाण केली जात आहे कारण ते हिंदीत बोलत होते आणि दुसरा गट त्यांना तमिळ बोलण्याचा आग्रह करत होता,

हा संदर्भ देत राज्यपाल पुढे, ''आजही परिस्थिती तशीच आहे. जर तुम्ही मला मारहाण केली तर मी लगेच मराठी बोलू लागेन का? मी त्यावेळी मारहाण झालेल्याची माफी मागितली, त्यांच्या जेवणाची व्यवस्था केली आणि ते बरे होईपर्यंत जागा सोडली नाही, असंही म्हणाले.

राज्यपालांनी अशाप्रकारे भाषिक द्वेष केल्यास गुंतवणूकदार राज्याकडे पाठ फिरवतील अशी भीतीही व्यक्त केली. ''जर आपण द्वेष पसरवला तर कोणता गुंतवणूकदार आपल्या राज्यात येईल? या साऱ्यामधून आपण दीर्घकाळालीन विचार केल्यास फक्त महाराष्ट्राचे नुकसान करत आहोत. आपण हे असले प्रकार क्षुल्लक राजकीय फायद्यासाठी करू नयेत,'' असंही राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले.

### सर्वाधिक गरीब हे हिंदी भाषिक

''आपण शक्य तितक्या भाषा शिकल्या पाहिजेत,'' अशी अपेक्षाही राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले. ''दारिद्र्यरेषेखाली राहणारे लोक ३० टक्के ते ५-७ टक्क्यापर्यंत आहेत आणि त्यापैकी बहुतेक हिंदी भाषिक आहेत. जर आपल्याला गरिबांच्या समस्या समजून घ्यायच्या असतील तर आपल्याला त्यांची भाषा देखील समजून घ्यावी लागेल,'' असे सांगून ते म्हणाले, आपण शक्य तितक्या भाषा शिकल्या पाहिजेत, मातृभाषेचा अभिमान बाळगला पाहिजे यात कोणतीही तडजोड नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की आपण दुसऱ्याच्या मातृभाषेचा द्वेष करावा. आपण एकमेकांशी सहिष्णु असले पाहिजे,'' असेही त्यांनी सांगितले.

## गुलाब पुष्पवृष्टीने कासेगावात संत सावता माळी समाधी सोहळा

### आज दहिहंडीचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२३ जुलै-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील संत शिरोमणी सावता माळी मंदीरात हभप श्याम महाराज जोशी यांचे समाधी सोहळ्याचे कीर्तन झाले. यावेळी पुंडलीक वरदे हरी विठ्ठल च्या गजरात गुलाब पुष्पवृष्टी करण्यात आली.

येथील गावातील व चंद्रा माळीण मळ्यात असलेल्या मंदीरात रात्रौ हरिजागर झाला. सकाळी मंदिरातील संत सावता महराजांच्या मूर्तीची अभिषेक पूजा करण्यात आली. यावेळी गावातील सर्व वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मळ्यात कीर्तनानंतर महारती होऊन पांडूरंग माळी यांच्यावतीने पंगत देण्यात आली.

गावातील विठ्ठल मंदीरात गुरूवारी दि.२४ जुलै रोजी सकाळी दहा वाजता हभप श्याम महाराज जोशी यांचे काल्याचे कीर्तन होऊन दहिहंडी होणार आहे. राम मोरे यांच्यावतीने भाविकांना पंगत देण्यात येणार आहे. त्यानंतर गावातून संत सावता महाराज प्रतिमेची दिंडी मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी गावातील मुख्य चौकात विवध गावाहून आलेल्या भारूडकारांचा भारूडाचा कार्यक्रम होणार आहे. या दिंडी मिरवणूकीची सायंकाळी सहा वाजता विठ्ठल मंदीरात महाप्रसादाने सांगता होणार आहे.

## अवैध गावठी देशी दारूच्या हातभट्ट्या उद्ध्वस्त

### १ लाख १९ हजार लिटर गुळमिश्रीत रसायन नष्ट

**१० हजार लिटर हातभट्टी दारू हस्तगत**

**४७ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जुलै -**

सोलापूर तालुका पोलिसांनी ऑपरेशन परिवर्तन या मोहीमे अंतर्गत राबविलेल्या विशेष मोहिमेत पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रात चोरून अवैधरित्या चालणाऱ्या गावंठी दारूच्या हातभट्ट्या व चोरून अवैधरित्या दारूची विक्री करणाऱ्या विरूध्द विशेष मोहीम राबवून ४७ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये चोरून अवैधरित्या गावठी हातभट्टी दारू तयार करणारे, हातभट्टी दारूची विक्री करणारे व अवैधरित्या देशी/विदेशी दारूच्या बाटल्या जवळ बाळगणारे अशा एकूण ७ जणांविरूध्द कारवाई करून त्यामध्ये १००० लिटर गुळमिश्रीत रसायन जागेवरच नाश /नष्ट केला आहे. अवैधरित्या दारूची विक्री करणारे इसमा विरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले.



जून अखेरपर्यंत सोलापूर तालुका पोलीस ठाणेच्या हद्दीतील देशी दारूच्या हातभट्ट्यावर ४९ केसेस करून त्यामध्ये १ लाख १८ हजार ९०० लिटर गुळमिश्रीत रसायन हातभट्टी दारू, प्लॅस्टीक बॅरेल मध्ये भरून ठेवलेली गावंठी हातभट्टी दारू, हातभट्टी दारू तयार करणे करीता लागणारे साहित्य, अवैधरित्या दारूच्या हातभट्टया उध्दवस्त करून प्लॅस्टीक बॅरेल जागीच फोडुन त्यातील गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट केल्या आहेत.

दारू विक्री करणारे एकूण ५० केसेस करून त्यामध्ये ९७१० लिटर हातभटटी व ४३४ देशी विदेशी बाटल्या हस्तगत करून दोन्ही कारवाई मिळुन एकूण ४७ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. चोरून अवैधरित्या गावंठी दारूच्या हातभट्टयाचा व्यवसाय करणाऱ्या या एकूण ५ इसमा विरूध्द एम.पी.डी.ए. प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाईचे प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत.

## अक्कलकोटच्या भीमनगरमध्ये शौचालयासह रस्त्याची मागणी

### वंचित आघाडीचा तीव्र आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि .२३ जुलै-**

अक्कलकोट येथील भीमनगरमध्ये महिला व पुरुष शौचालयाची मोठी दुरावस्था झाली असून ड्रेनेज पाईपच्या नावाखाली भीमनगर खड्डेमय झाले आहे. सर्वत्र चिखल झालेला असून याचा नाहक त्रास नागरिकांना होत आहे. नगरपरिषदेने भीमनगरमध्ये महिला व पुरुषांसाठी नविन शौचालय बांधावे. तसेच भीमनगर मधील रस्त्याचें सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात यावे अशी मागणी वंचित बहुजन आघाडीकडून करण्यात आली असून तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.




भीमनगरमध्ये ड्रेनेज पाईपसाठी सर्वत्र खड्डे खोदून दोन महिने उलटले तरीही तिथले कॉंक्रिटीकरण रस्त्याचे काम अजून झालेले नाही. याठिकाणी खड्डे आणि चिखल मोठ्या प्रमाणात झाला आहे. यामुळे अबालवृद्धांना त्रास होत आहे. भीमनगरच्या पाठीमागच्या बाजूला मोठी पाण्याची टाकी आहे. त्याच्याच बाजूला सार्वजनिक शौचालय आहे. पुरुषांसाठी आणि महिलांसाठी भीमनगर मध्ये इतक्या मोठ्या वस्तीमध्ये दोन शौचालय आहेत. एक मैंदर्गी रोडला दुसऱ्या पाण्याच्या टाकीच्या बाजूला शौचालय आहे. या दोन्ही शौचालयाला दरवाजे नाहीत. ,स्वच्छता नाही, फरशा फुटलेले आहेत. सगळीकडे झाडे-झुडपे वाढलेले आहेत. अत्यंत घाणेरडी अवस्था या शौचालयाची झालेली असून या शौचालयाची दुरुस्ती स्वच्छता तसेच रस्त्याचे कॉंक्रिटीकरण व भीमनगर मधील समाज मंदिराची दुरुस्ती जर आठ दिवसात झाली नाही तर वंचित बहुजन आघाडीकडून तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. याबाबतचे निवेदन अक्कलकोट नगर परिषद प्रशासनास देण्यात आले. वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट शहर व तालुक्याच्या वतीने बेमुदत अर्धनग्न आंदोलन आणि सोबत आपल्याला जागृत करण्यासाठी हलगी नाद आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, युवक तालुका अध्यक्ष शिलामणी बनसोडे, शहराध्यक्ष विशाल ठोंबरे, युवक जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश शिंदे, किरण बनसोडे, ज्ञानेश्वर दसाडे सुनील शिंगे, शहर उपाध्यक्ष संतोष घाडगे, सिद्धार्थ बनसोडे, सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रवी पोटे, माणिक गायकवाड, संदीप गजदाने, सचिन गजदाणे, मल्लिनाथ पाटील, शौकत मुजावर, तालुका महासचिव नागेश हरवाळकर, हनुमंत गोसावीसह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## तरूणीवर अत्याचार करून फोटो केले व्हायरल

### एका विरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२३ जुलै**

व्हॉटसॲप व इन्स्ट्राग्रामवर आय लव्ह यू, तु मला खूप आवडतेस असा मेसेज पाठवून जवळीक साधून एका २२ वर्षीय तरूणीला लॉजवर नेवून वेळोवेळी शारिरिक संबंध ठेवून अश्लिल फोटो काढून ते व्हायलर केल्याप्रकरणी विजय शिवाजी बाबर (रा.भालेवाडी) याच्याविरूध्द मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील पिडीत २२ वर्षीय तरूणीला सदर आरोपीने व्हॉटसॲप व इन्स्ट्राग्रामवर आय लव्ह यू,तु मला खूप आवडतेस असा मेसेज पाठवून फिर्यादीशी जवळीक करून तीचे सोबत वारंवार तीच्या इच्छेविरूध्द शरीरसंबंध केला. तसेच आरोपीने त्याच्या मोबाईलमध्ये अश्लिल फोटो काढून ते मोबाईलमध्ये घेवून तु कोणास हे प्रकरण सांगितल्यास सदरचे फोटो सोशल मिडीयावर व्हायरल करण्याची धमकी देवून



ते व्हॉटसॲप व इन्स्ट्राग्रामवर व्हायरल केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान ही घटना सोलापूर येथे ऑगस्ट २०२४ ते १६ मार्च २०२५ च्या सकाळी १० पर्यंत लॉज व जुळे सोलापूर येथे भाडयाने रहात असलेल्या खोलीत घडल्याचे तक्रारीत नमुद आहे. अधिक तपास सोलापूर शहर पोलिस करीत आहेत.

## वैराग येथे श्रीसंत शिरोमणी नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २३ जुलै-**

वैरागमध्ये श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा षष्ठीशतकोर अमृत महोत्सवी संजीवन समाधी सोहळा (६७५) साजरा करण्यात आला. हा सोहळा हभप प्रभाकर बोधले महाराज व ॲड. डॉ. जयवंत महाराज बोधले यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.

त्यामध्ये हभप सदगुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांचे चक्रीभजन, तसेच संतश्रेष्ठ नामदेव महाराजांचे वंशज हभप गुरुवर्य केशव महाराज नामदास तसेच श्री संत तुकाराम महाराजांचे वंशज हभप गुरुवर्य बापूसाहेब महाराज देहुकर, संत एकनाथ महाराजांचे वंशज हभप योगीराज महाराज गोसावी, त्याचबरोबर हभप गहीनाथ महाराज औसेकर यांची किर्तने आयोजित करण्यात आली होती. त्याचबरोबर डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी या सोहळ्यामध्ये संत शिरोमणी नामदेव महाराज यांचे जीवन चरित्र श्रोत्यांसमोर आपल्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासातून आठ दिवस मांडले. प्रभाकर दादा बोधले महाराज यांनी संत शिरोमणी नामदेव महाराजांचे जीवनातील



वेगवेगळ्या घटना व श्रीकृष्ण संदर्भात काल्याचे किर्तन केले. हा कार्यक्रम आठ दिवस अतिशय रंगतदार करण्याच्या दृष्टिकोनातून गायक ह भ प भैरवनाथ महाराज जाधव, हभप कृष्णा महाराज वैद्य यांनी अतिशय उत्कृष्ट असे अभंग या माध्यमातून सर्व भक्तांना मंत्रमुग्ध केले मृदुंग वादक ह भ प नामदेव महाराज घावटे उत्कृष्ट मृदंगाचे सादरीकरण केले .

हा समाधी सोहळा यशस्वी करण्यासाठी संत शिरोमणी नामदेव महाराज ट्रस्टचे धनंजय जामदार, शशिकांत माळवतकर, नागनाथ धोकटे, गुरुदत्त उंडाळे, अरविंद माळवतकर, दत्तात्रेय जामदार, विनोद जामदार, संतोष जामदार, नामदेव पतंगे, अमरनाथ बोधे, प्रमोद दुबे, शशिकांत मनकुसकर, राजेंद्र भस्मे, पुजारी नंदकुमार पतंगे यांनी परिश्रम घेतले.

## वखारिया विद्यालयात लोकमान्य टिळकांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २३ जुलै -**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात बुधवार दि.२३ जुलै रोजी लोकमान्य टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रारंभी मुख्याध्यापक श्री. दयानंद रेवडकर सर आणि जेष्ठ शिक्षक शंकर शिंदे यांचे हस्ते कर्मवीर मामासाहेब जगदाळे, लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापक यांच्या अध्यक्षतेखालील संपन्न झालेल्या कार्यक्रमात जेष्ठ शिक्षक शंकर शिंदे यांनी आपले विचार मांडताना लोकमान्याच्या कार्यातून आपल्याला त्यांचे धैर्य, देशभक्ती आणि समाजासाठी त्यांची समर्पित भावना दिसून येत असल्याचे सांगितले तसेच लोकमान्यांनी लोकामध्ये एकजुट निर्माण करण्यासाठी केसरी आणि मराठा वृत्तपत्रातून ब्रिटीशांविरुद्ध आवाज उठविल्याचे स्पष्ट केले तर मुख्याध्यापक दयानंद रेवडकर सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून बोलताना महापुरुषांची चरित्रे अभ्यासण्याचे आणि त्यांनी पेरलेले चांगले विचार आत्मसात करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.



याप्रसंगी विद्यार्थ्यांनीही लोकमान्य टिळकांविषयी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती तवले मॅडम, उपप्रमुख आर. आर. लंकेश्वर यांनी केले होते. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन लंकेश्वर सर यांनी केले तर उपस्थितांचे आभार तवले यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# शहरी माओवादाचा खरा चेहरा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. २२ जुलै) झालेल्या कार्यक्रमात गडचिरोलीला विकासापासून दूर ठेवण्यासाठी शहरी माओवाद्यांना विदेशातून निधी मिळत असल्याचा गौप्यस्फोट केला. शहरी नक्षलवाद नावाचा कोणताही प्रकार अस्तित्वात नाही, अशी आवई काही संघटना, राजकीय पक्ष आणि इतर काही जणांकडून उठवली जाते आणि मुख्यमंत्री अशी गंभीर माहिती देतात. त्यामुळे या मुद्याकडे डोळसपणे पाहणे गरजेचे आहे. या पृष्ठभूमीवर एक वास्तव समजून घेतले पाहिजे आणि ते असे की, शहरी नक्षलवाद अस्तित्वात आहे आणि त्यात सहभागी असलेले लोकच या गौप्यस्फोटाच्या निमित्ताने वेगळेच काही तरी 'नॅरेटिव्ह' समोर आणू शकतात. वंचितांच्या लढ्याची पृष्ठभूमी असलेली एकेकाळची चळवळ म्हणजे नक्षलवाद. त्याच शब्दाच्या आड माओवाद्यांनी देशात अनेक ठिकाणी कल्पनेच्या पलीकडे हातपाय पसरले असल्याचे सत्य कुणीही नाकारू शकत नाही. भारतात चीनविरुद्धची भावना अतिशय टोकदार आहे. त्यामुळे माओ त्से तुंग किंवा माओवाद भारतात स्वीकारला जाणार नाही, याची पूर्ण कल्पना नक्षलवादाच्या नावाखाली काम करणाऱ्या माओवाद्यांना होती. या गोष्टीचा विचार करून त्यांनी 'नक्षलवाद' या शब्दाच्या आड माओवादाचेच जाळे देशात विणले. चारू मुजूमदार यांनीही माओवादी विचारसरणीची तळी उचलली होती. नक्षलवादी हे माओवादीच आहेत आणि ते देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि संस्कृतीला मोठा धोका ठरत आहेत. मुळात माओवाद किंवा साम्यवाद ही विचारसरणी भारतातील नाही. त्यामुळे आपल्या देशातील संस्कृती, परंपरा, मूल्ये तसेच समाज रचना आणि सामाजिक मानसिकतेसोबत माओवादाची सांगड कोणत्याही पद्धतीने घालणे शक्य नाही. 'वसुधैव कुटुम्बकम्' किंवा 'सर्वे भवन्तु सुखिन:' हा विचार माओवादी विचारसरणी मानणाऱ्यांच्या आकलनापलीकडचा आहे. माओवाद्यांनी आज जे बुरखे घातले आहेत, त्याच्याआड असलेला त्यांचा खरा चेहरा अतिशय भेसूर आहे. भारतातील अतिशय श्रीमंत, समृद्ध सामाजिक संस्कृती व लोकजीवनातील सौहार्दाच्या परंपरा त्यांना उद्ध्वस्त करायच्या आहेत. त्यामागेही त्यांचा अतिशय कपटी विचार आहे.

भारतातील परंपरा समाजातून नष्ट करायच्या, सांस्कृतिक खाणाखुणा मिटवायच्या तसेच समाजाला त्यापासून दूर न्यायचे आणि त्यांची श्रद्धास्थाने उद्ध्वस्त करायची असा त्यांचा डाव आहे. खुल्या विचारांच्या नावाखाली एकदा का श्रद्धास्थाने उद्ध्वस्त झाली की भारतीयांच्या डोक्यावर डाव्या विचारांच्या गुलामगिरीचे जोखड टप्प्याटप्प्याने टाकता येईल, असे त्यांना वाटते. तसेही ज्यांच्या आस्थाच भारताबाहेर आहेत, ते देशाबद्दल, येथील नागरिक आणि त्यांच्या संस्कृतीबद्दल सकारात्मक विचार कसा करू शकतील, हा एक मोठा प्रश्न या निमित्ताने उद्भवतोच. सामाजिक परंपरा उद्ध्वस्त कशा केल्या जातात, याचे उदाहरण गडचिरोलीतच आहे. माओवाद्यांनी येथील गोटूल ही आदिवासी परंपरा बंद पाडली. त्यामुळे वनवासींचे अतोनात नुकसान झाले आहे. ही परंपरा आदिवासींच्या उदार लोकरीतीचा भाग होती. माओवाद्यांकडून कथित प्रगतिशील तत्त्वज्ञानाच्या आधारे लोकांमध्ये, समूहांमध्ये विषमतेच्या आणि शोषणाच्या विरोधात आपली बाजू प्रकर्षाने मांडण्याचा प्रयत्न केला जातो. मग, सामान्य विवेकाचे भान न ठेवता आचरण केले जाईल, असे वातावरण निर्माण केले जाते. हाच मानसिक खेळ माओवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात खेळला जात आहे. त्यामुळे मूलभूत प्रश्न सोडवणे कठीण होऊन जाते. नेमके तेच या शहरी माओवाद्यांना आणि जंगलात असलेल्या त्यांच्या हस्तकांना देखील हवे असते. भारतासारख्या बहुढंगी, बहुरंगी देशात समस्याही बहुपदरी असतात. अनेक शतकांपासून विवंचनेच्या खाईमध्ये लोटल्या गेलेल्या समाजात आत्मविश्वास निर्माण करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांवर असते. दुर्दैवाने मागील काही काळात ही जबाबदारी योग्यरीत्या पार पाडली गेली नाही. त्याचा फायदा घेऊन माओवाद्यांनी जंगल आणि शहरांमध्ये हातपाय पसरले. खरे तर राज्यकर्त्यांनी या समस्यांकडे सत्ताकारणाच्या अंगाने पाहू नये. परंतु, घडत होते ते तसेच. खरा बदल झाला तो गेल्या दशकभरात. आता कुठे नक्षलवाद हा माओवाद आहे आणि शहरी नक्षलवाद अस्तित्वात आहे, असे जाहीरपणे म्हटले जाऊ लागले आहे. शहरी किंवा जंगली नक्षलवादाचे आव्हान भारताच्या सार्वभौमत्वाच्या दृष्टिकोनातून अतिशय गंभीर आहे. प्रजासत्ताकाच्या इतक्या दशकांच्या वाटचालीत अनेक राज्यांमध्ये वेगवेगळ्या प्रश्नांच्या माध्यमातून माओवाद्यांनी शहरी भागांमध्ये जातीय, धार्मिक, सामाजिक चळवळींच्या नावाखाली वेगवेगळ्या संघटना उभारल्या आहेत. वरकरणी त्यांचे खरे रूप लक्षात येत नाही. वंचित-शोषितांसाठी लढणाऱ्या संघटनेचा मुखवटा अशा अनेक संघटना वापरतात. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) या प्रतिबंधित संघटनेचे 'स्ट्रॅटेजी अॅण्ट टॅक्टिस ऑफ इंडियन रिव्हॉल्युशन' हे पुस्तक अनेकदा चकमकींच्या नंतर पोलिसांनी जप्त केले. ते डिजिटल स्वरूपातही उपलब्ध आहे. माओवाद्यांच्या कार्यपद्धतीवर आधारित असलेल्या या पुस्तकाच्या भाग-२ व प्रकरण क्रमांक १३ मध्ये या माओवाद्यांची शहरी भागातील कार्याची दिशा स्पष्ट करण्यात आली आहे. यात माओवाद्यांनी काही अस्त्रांना जादुई असे संबोधले आहे. ती अस्त्रे म्हणजे संयुक्त मोर्चा आणि सैन्य. यातील संयुक्त मोर्चा हे सर्वाधिक प्रभावी आणि क्रांतिकारी अस्त्र असल्याचे माओवाद्यांना वाटते. याचा मूळ उद्देश देशातील प्रस्थापित संवैधानिक व्यवस्थांविरुद्ध लढण्यासाठी जनसमुदायाचा सहभाग वाढवण्याचा आहे. तो हेतू साध्य झाल्यानंतरच सशस्त्र क्रांतीचा मार्ग प्रशस्त होतो. यातील संयुक्त मोर्चा म्हणजेच शहरी माओवादी होत! प्रामुख्याने विद्यार्थी, युवा, परिपूर्ण विकास न झालेले लोक, महिला, वनवासी, भूमिहीन, गरीब शेतकरी आणि शोषित कामगारांदी वर्गांना मोहिनी घालून शहरी माओवादाच्या जाळ्यात खेचण्याचा प्रयत्न केला जातो. समाजातील घटकांमध्ये कोणत्या ना कोणत्या मुद्यावर विद्यमान सरकारच्या विरोधात राग असतोच. त्याचा वापर करून समाजात अशांतता निर्माण करणे, त्यांच्या डोक्यातील आगीची धग कायम ठेवण्यासाठी चिथावणी देत राहणे, त्यासाठी अपप्रचार करण्यासोबतच अफवा पसरवणे हे सारे धंदे केले जातात आणि वेळप्रसंगी त्यांचा वापर हिंसाचार भडकावण्यासाठीही केला जातो. गतवर्षी निवडणुकीच्या काळात शहरी माओवाद्यांच्या जवळपास २०० संघटना विशिष्ट हेतूने एका आंदोलनात सहभागी झाल्याचा गुप्तचर अहवाल होता. शहरी माओवादी विषय निवडून कृती समिती, संप समिती, संघर्ष समिती स्थापन करतात आणि आंदोलनाची आखणी करतात. आपल्या समस्या सशस्त्र क्रांतीशिवाय सुटूच शकत नाहीत, अशी चिथावणी दिली जाते. माओवाद्यांच्या या फ्रन्टल संघटनांची कार्यपद्धती अतिशय गुंतागुंतीची असते. अनेक श्रेणींमध्ये त्याची विभागणी करण्यात आली आहे. कोणत्या श्रेणीतील संघटना कोणते काम करेल, हे देखील निश्चित असते. प्रत्येक जण आपली जबाबदारी अत्यंत चोख पार पाडतो, असा सुरक्षा यंत्रणांचा आजवरचा अनुभव आहे.

कम्युनिस्टांची पावले कोणत्या दिशेला जाणार आहेत, हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फार पूर्वीच ओळखले होते. कम्युनिस्ट आणि सोशालिस्ट हे दोन गट संविधानाचा निषेध करीत आहेत. संविधान वाईट आहे, हे त्यांच्या निषेधाचे कारण नाही. कम्युनिस्टांना हुकूमशाही हवी आहे. आपले संविधान लोकशाहीवर अवलंबून आहे म्हणून कम्युनिस्ट त्याचा धिक्कार करीत आहेत, असे खुद्द डॉ. आंबेडकर यांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजीच्या भाषणात म्हटले होते. डॉ. आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या मजबूत राज्यघटनेवर देश आज उभा आहे. तो प्रगतिपथावर आहे. माओवाद्यांना ही राज्यघटना नष्ट करून स्वातंत्र्याची गळचेपी करायची आहे. देशाच्या प्रगतीत बाधा आणायची आहे, हे लक्षात घेऊन शहरी माओवाद्यांवर अंकुश ठेवण्याची व त्यांना चिरडण्याची गरज आहे. त्यांना विदेशातून पैसा मिळत असल्याचा मुख्यमंत्र्यांनी केलेला गौप्यस्फोट हा एक गंभीर इशारा आहे प्रत्येक भारतीयासाठी!

## तंत्रवेध

# एआय आणि साहित्य-प्रकाशन व्यवसाय

**डॉ. दीपक शिकारपूर**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हा सध्याचा परवलीचा शब्द आहे. आयटी क्षेत्रात अनेक लाटा येतात. उदा. क्वाऊड, वायटूके वगैरे. बदलत्या तंत्रज्ञानामुळे येत्या काळात अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी परिवर्तन होणार आहे. आपल्या आसपासच्या डिजिटल विश्वाची सतत उत्क्रांती होत राहणार आहे. व्यक्तिगत तर आहेच, परंतु औद्योगिक, सामाजिक आणि सार्वजनिक पातळीवरही संगणकाच्या या विविध अवतारांचे अत्यंत क्रांतिकारी आणि दूरगामी परिणाम होतील. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाने साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. संगणक, इंटरनेट आणि इतर तंत्रज्ञानाने लेखकांना नवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे या तंत्राला शत्रू न मानता मित्र मानायला हवे. यामुळे अनेक पर्याय उपलब्ध होतील. पूर्वी लेखक हस्तलिखित मजकूर वापरत. त्यात काही चुका आढळल्यास सर्व मजकूर पुन्हा लिहावा लागे. २००० नंतर डेस्क टॉप पब्लिशिंग (संगणकीय डेटा एंट्री)मुळे या प्रक्रियेत क्रांती झाली आणि सर्व घटकांना फायदा झाला (लेखक, प्रकाशक, टंकलेखक). आता यापुढील पायरी २०२७ नंतर येईल. चॅट बॉट्सशी संवाद साधून आपण मजकूर त्वरित संगणकीय फॉरमॅटमध्ये आपोआप तयार करू शकू. ना हाताने लिहिणे ना संगणकावर टाईप करणे. इंटरनेटमुळे लेखकांना आपल्या साहित्यनिर्मितीचा प्रचार आणि प्रसार करणे सोपे झाले आहे. ते आता आपली साहित्यनिर्मिती जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचवू शकतात. इतर तंत्रज्ञानांनीही साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात मोठा बदल घडवून आणला आहे. उदाहरणार्थ, थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानाचा वापर करून लेखक आता आपल्या साहित्यनिर्मितीची भौतिक प्रतिकृती तयार करू शकतात.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग ही अलिकडच्या वर्षांमध्ये साहित्यनिर्मितीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम करणारी दोन महत्त्वाची तंत्रज्ञाने आहेत. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर साहित्यनिर्मितीच्या विविध पैलूंमध्ये केला जात आहे, जसे की लेखन, भाषांतर, संपादन आणि प्रकाशन. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या पारंपरिक पद्धतींना आव्हान देत आहे आणि साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणत आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून लेखन प्रक्रिया स्वयंचलित केली जाऊ शकते. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करून, लेखकांना साहित्यनिर्मितीसाठी आवश्यक असलेली माहिती आणि संसाधने उपलब्ध करून दिली जाऊ शकतात. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर करून लेखकांना साहित्यनिर्मितीमध्ये अधिक सर्जनशील होण्यास मदत केली जाऊ शकते. काही लोकांचा विश्वास आहे की एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणणार आहे आणि साहित्यनिर्मितीच्या पारंपरिक पद्धतींना आव्हान देणार आहे. काही लोकांचा विश्वास आहे की एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रावर नकारात्मक परिणाम करेल आणि साहित्यनिर्मितीच्या गुणवत्तेवर परिणाम करेल. एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रावर होणारा परिणाम हा एक चर्चेचा विषय आहे, परंतु हे निश्चित आहे की एआय आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञान साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रावर मोठा प्रभाव पाडणार आहे.



एआयमुळे होणारे सकारात्मक परिणाम लक्षात घेण्याजोगे आहेत. पहिला लक्षवेधी परिणाम म्हणजे लेखन प्रक्रिया सुलभ होणे. एआय आधारित लेखन सहायक ठरणारी एआय टूल्स लेखकांना कल्पना सुचवणे, कथा विस्तारणे आणि लेखनशैली सुधारण्यासाठी मदत करतात. हे टूल स्वयंचलित मसुदा लेखन, एआय संक्षेप, सुधारणा आणि पुनर्लेखन करू शकते. यामुळे लेखकांचा वेळ वाचतो. संपादन आणि भाषांतर अधिक जलद आणि अचूक होऊ शकते. एआय समर्थित संपादन साधने मजकुरातील व्याकरण, शैली आणि स्पष्टता सुधारतात. बहुभाषीय प्रकाशन एआय-आधारित भाषांतर तंत्रज्ञानामुळे पुस्तके आणि लेख वेगवेगळ्या भाषांमध्ये झटपट आणि कमी खर्चात अनुवादित करता येतात. परिणामी, प्रकाशन प्रक्रिया सोपी होते. शिवाय एआय आणि प्रिंट फॉरमॅटमध्ये सामग्री सहज रूपांतरित होते. एआय-आधारित कव्हर डिझाईन टूल्स पुस्तक कव्हर आकर्षक पद्धतीने डिझाईन करण्यासाठी मदत करतात. यामुळे स्वयंप्रकाशन सोपे होते तसेच अन्य प्लॅटफॉर्मवर एआयच्या मदतीने पुस्तक प्रकाशन अधिक जलद होते. एआय-आधारित शिफारशींची सोय वाढल्यामुळे विविध प्लॅटफॉर्मवर एआय वाचकांच्या पसंतीनुसार पुस्तके सुचवते. एआय माध्यम सोशल मीडिया प्रचार, सोशल मीडिया पोस्ट, जाहिराती आणि ईमेल मार्केटिंगसाठी उत्तम सामग्री तयार करू शकते. एआय ग्राहक सेवा आणि चॅटबॉट्स वाचकांसाठी वैयक्तिक सल्ला आणि मदत करणारे बॉट्स निर्माण करू शकते.

एआय लेखकांना सहायक म्हणून वापरणे जमायला हवे. संपूर्ण लेखन एआयकडे सोपवण्याऐवजी कल्पनांसाठी आणि सुधारण्यासाठी वापर करणे अधिक महत्त्वाचे ठरते. म्हणजेच एआय संपादन आणि प्रकाशन प्रक्रिया सुलभ करेल, पण लेखनाच्या तसेच प्रकाशनाच्या प्रत्येक टप्प्यामध्ये अंतिम निर्णय माणसानेच घ्यावा. एआय निर्मित साहित्यावर स्पष्ट टॅगिंग असावे. यापुढील काळात आपण कुठलेही तंत्रज्ञान थांबवू शकणार नाही. यामध्ये कटपेस्ट पेरणारे भोंदू नक्कीच बळी पडतील. विषय, साहित्यप्रकार आणि शैली सांगितली की चॅट जीपीटीची यंत्रणा आपोआप कविता करते.

पहिला मुद्दा म्हणजे या प्रक्रियेमध्ये मानवी भावनांचा अभाव असेल. एआयद्वारे तयार केलेले साहित्य मानवी भावना आणि अनुभव पूर्णपणे व्यक्त करू शकत नाही. मानवी अनुभव, भावना आणि सूक्ष्म विचार एआयच्या लेखनात सहसा दिसत नाहीत. यामुळे लेखनात मानवी स्पर्श आणि सहानुभूतीचा अभाव जाणवू शकतो. येथे नैतिक आणि कॉपीराईटचे प्रश्नही उपस्थित होतील. एआयने तयार केलेला मजकूर कोणाच्या मालकीचा आहे, यावरून कॉपीराईटचा प्रश्न उद्भवू शकतो. तसेच एआयने योग्य परवानग्या घेऊन उपलब्ध डाटा न वापरल्यास अनेक नैतिक समस्या निर्माण होतील. एआयच्या वापरामुळे प्रकाशन व्यवसायातील काही कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या जाऊ शकतात. कंटेंट रायटिंग, प्रूफरीडिंग आणि भाषांतर यासारख्या क्षेत्रांमधील काही नोकऱ्या एआयमुळे प्रभावित होऊ शकतात, कारण एआय बरीच कामे स्वत: पटकन करून देऊ शकतो. त्याचप्रमाणे एआयचा वापर करून चुकीची माहिती आणि अफवा पसरवल्या जाऊ शकतात. साहित्य व प्रकाशन व्यवसायावर एआयचा सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही प्रकारे परिणाम होऊ शकतो. त्यामुळे एआयचा वापर कसा करायचा याबाबत विचार करणे आवश्यक आहे. एआय हे लेखनासाठी एक शक्तिशाली साधन आहे. ते लेखकांना अधिक कार्यक्षम बनवू शकते आणि त्यांची उत्पादकता वाढवू शकते. मात्र एआयवर पूर्णपणे अवलंबून न राहता एक सहायक म्हणून त्याचा वापर करणे महत्त्वाचे आहे. मानवी सर्जनशीलता, गंभीर विचार आणि नैतिक विचार एआयच्या मर्यादेपलीकडचे आहेत. लेखनामध्ये त्यांची भूमिका नेहमीच महत्त्वाची राहील. एआयचा योग्य आणि जबाबदार वापर केल्यास लेखनक्षेत्रात क्रांती घडून येईल, पण मानवी लेखकाचे महत्त्व कधीही कमी होणार नाही.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# गोवंश हत्या अन् चोराच्या उलट्या बोंबा

मानवाची दिवसेंदिवस कमी होत असलेली प्रतिकारशक्ती, बळावत असलेले नवनवीन आजार यासंदर्भात अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांनी विषमुक्त अन्नाची गरज वारंवार अधोरेखित केली आहे. याबाबत केवळ राज्यातच नव्हे तर जगभरात चिंतन सुरू आहे. अन्न घटकांसाठी प्रामुख्याने शेतीच्या उत्पादनावर अवलंबून असणाऱ्या मानवाला शेतीतून मिळणारे उत्पादन विषमुक्त कसे मिळेल, त्याकरिता काय उपाययोजना कराव्या लागतील याचा विचार देखील अग्रक्रमाने सुरू आहे. त्यात अभ्यास, चिंतनातून समोर आलेल्या निरीक्षणानुसार पारंपरिक सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून मिळणारे उत्पादन हे अधिक सकस, आरोग्यदायी आणि विषमुक्त आहे. म्हणूनच मोठ्या प्रमाणावर पारंपरिक अर्थात सेंद्रिय शेतीचा प्रचार-प्रसार सर्वच स्तरावरून केला जातो आहे. पूर्वीपासूनच आपले 'कृषी आधारित ग्राम व्यवस्था आणि गोवंश आधारित कृषी व्यवस्था' हे वैशिष्ट्य आहे. मात्र दुर्दैवाने रासायनिक खते आणि कीटकनाशकाच्या अतिरेकी वापराने मानवी जीवनच दूषित झाले. त्यातही गोवंशाची सर्रास होणारी कत्तल गोवंश आधारित कृषी व्यवस्थेला मारक ठरली. म्हणूनच महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस सरकारने गोवंश हत्याबंदी कायदा निर्माण करून गोवंश हत्येवर कायद्याने बंदी आणली. तरी देखील गोवंशाची कत्तल होत असल्याचे दिसून येते. मात्र गत कालावधीत विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्यासह समाजातील सामाजिक संघटनांनी पोलिस प्रशासनाला मदत करण्याचे धोरण राबवून प्रशासनाच्या माध्यमातून गोवंशाची अवैध वाहतूक, गोवंश हत्या याला काही अंशी आळा घातला. त्यामुळेच अस्वस्थ होऊन गोवंश हत्या करणाऱ्यांनी समाजाची ढाल पुढे करून, साळसूद असल्याचा आव आणत राज्यभर आंदोलनाला सुरुवात केली आहे. पण मुळात त्यांना असे आंदोलन करण्याचा नैतिक अधिकार आहे का हा खरा प्रश्न आहे.



समाजहिताच्या व्यापक दृष्टिकोनातून देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू केला. जेव्हापासून हा कायदा अस्तित्वात आला तेव्हापासूनच जिभेच्या चोचल्यांपुढे समाजहित गौण मानणाऱ्यांनी या कायद्याविरोधात रान उठवले. कायद्याच्या चौकटीत आपले म्हणणे सिद्ध करू न शकल्याने ही सर्व मंडळी हताश झाली आहे. न्यायालयात त्यांची कुठलीच बाजू तग धरू शकली नाही आणि म्हणूनच आता झुंडशाहीने दबाब आणण्याचा त्यांचा नेहमीचाच खेळ त्यांनी सुरू केला. गोवंशाशिवाय अन्य जनावर खरेदी, विक्री, वाहतूक आणि कत्तल करण्याआड गोवंश हत्या प्रतिबंधक कायदा येतो, या कायद्याआड मारहाण केली जात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यातूनच राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितींमध्ये जनावरांची खरेदी-विक्री बंदचे आवाहन त्यांनी केले. या आंदोलनाला प्रतिसाद न दिल्यास १ ऑगस्टपासून लाक्षणिक आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देखील कुरेशी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. खरं म्हणजे एकीकडे गोवंशाच्या कत्तलीसाठी निर्माण झालेली कायदेशीर अडसर आणि दुसरीकडे समाजात जनजागृती होऊन विविध संस्था, संघटनांचा विरोध ही खरी समस्या आंदोलनकर्त्यांची आहे. कारण गोवंशाची कत्तल आम्ही करीत नाही असे म्हणणारेच या आंदोलनात ठिकठिकाणी दिसून येतात. गोवंशाची कत्तल, अत्यंत निर्दयपणे गोवंशाला कोंबून केली जाणारी अवैध वाहतूक जर तथाकथित कसाई नाकारत असतील तर राज्यात होणाऱ्या शेकडो कारवाई नेमक्या कुणावर होत आहेत हा प्रश्नच आहे. जेव्हा मोठ्या प्रमाणावर निर्दयतेने कोंबून भरलेल्या गोवंशाचे कंटेनर पकडले जातात, गोवंशाच्या कातडीचे ढीग जेव्हा या आंदोलनकर्त्यांच्या भाऊबंदांकडे आढळतात, गोवंशाची हाडे आणि शिंगे शेकडोंच्या संख्येने जेव्हा पोलिस जप्त करतात आणि एवढेच नव्हे तर अकोल्याच्या तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी अवैध कत्तल होत असल्याच्या माहितीवरून जेव्हा विशिष्ट वस्तीत पहाटे पाहणी केली त्यावेळी त्यांच्यासमोर देखील गोवंशाचे चामडे, नुकतीच हत्या केलेला गोवंश आणि हत्येसाठी बांधलेला गोवंश आढळून आला. तेव्हा आम्ही गोवंशाची कत्तल करीत नाही असे म्हणणारे आंदोलनकर्ते त्या त्या वेळी कायदा मोडणाऱ्या व्यक्तींच्या विरोधात सामोरे आले की समर्थनार्थ. वरील सर्व प्रश्नांची उत्तरे या आंदोलनकर्त्यांनी आधी द्यावीत अन्यथा हे आंदोलन म्हणजे केवळ 'चोराच्या उलट्या बोंबा' असेच म्हणावे लागेल.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# कोण होणार नवा उपराष्ट्रपती?

**श्यामकांत जहागीरदार**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी जगदीप धनकड यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा देत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली. प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणावरून राजीनामा देत असल्याचे त्यांनी आपल्या राजीनामापत्रात म्हटले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला असून तशी अधिसूचनाही गृहमंत्रालयाने जारी केली आहे. उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. त्यामुळे धनकड यांच्या राजीनाम्याने राज्यसभेचे अध्यक्षपदही रिक्त झाले आहे.

धनकड यांनी तडकाफडकी दिलेल्या राजीनाम्यामुळे काही प्रश्न निर्माण झाले, त्याची चर्चा येत्या काळात होणार आहे. पहिला आणि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे धनकड यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा का दिला आणि दुसरा तेवढाच महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आता देशाचा उपराष्ट्रपती म्हणून कोणाची निवड होणार आहे. यातील पहिल्या प्रश्नाचे म्हणजे राजीनामा का दिला, याचे उत्तर फक्त धनकडच देऊ शकतील. मात्र राजीनामा दिल्यानंतर त्यांनी जे मौन धरले, त्यामुळे देशाला या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याकडून मिळण्याची शक्यता वाटत नाही. धनकड यांची प्रकृती ठीक नव्हती, हे गेल्या काही महिन्यातील घटनाक्रमावरून दिसून आले. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात धनकड यांना राजधानी दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत (एम्स) दाखल करण्यात आले होते. तेथे त्यांच्यावर अॅन्जिओप्लास्टीही झाली होती. मध्यंतरी काही दिवसांपूर्वी दिल्लीतील एका कार्यक्रमात ते अस्वस्थही झाले होते. ११ ऑगस्ट २०२२ ला धनकड यांची देशाचे चौदावे उपराष्ट्रपती म्हणून निवड झाली होती. त्यामुळे उपराष्ट्रपती म्हणून त्यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ यावर्षी १० ऑगस्टला पूर्ण होणार होता. दोन वर्षांचा कार्यकाळ शिल्लक असताना धनकड यांनी राजीनामा दिल्यामुळे त्याची चर्चा होणे स्वाभाविक आहे. विशेष म्हणजे राजीनामा देण्याच्या दहा-बारा दिवसांपूर्वी धनकड यांनी एका कार्यक्रमात बोलताना २०२७ मध्ये योग्यवेळी मी निवृत्तीचा निर्णय घेईल, असे म्हटले होते. त्यामुळे त्यांच्या तडकाफडकी राजीनाम्याच्या निर्णयाची चर्चा होणे स्वाभाविक आहे. राजधानी दिल्लीतील राजकीय वर्तुळाला त्यांच्या राजीनाम्याबाबत वेगवेगळी कारणे दिली जात आहेत. त्यांच्या राजीनाम्याचा संदर्भ दिल्ली उच्च न्यायालयातील न्या. यशवंत वर्मा यांच्याविरुद्धच्या महाभियोग प्रस्तावाशीही जोडला जात आहे.

उपराष्ट्रपती होण्याआधी जगदीप धनकड पश्चिम बंगालचे राज्यपाल होते. धनकड हे मूळ भाजपाचे नाहीत. जनता दलातून त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीला प्रारंभ केला. माजी उपपंतप्रधान चौधरी देवीलाल यांचे समर्थक म्हणून धनकड यांची सुरुवातीची ओळख होती. १९८९ मध्ये राजस्थानच्या झुंझुन लोकसभा मतदारसंघातून जनता दलाचे उमेदवार म्हणून त्यांनी निवडणूक लढवली आणि जिंकली. विश्वनाथ प्रतापसिंह यांच्या मंत्रिमंडळात त्यांचा राज्यमंत्री म्हणून समावेश झाला. नंतर राजकीय घडामोडीत व्ही. पी. सिंग यांचे सरकार पडले आणि चंद्रशेखर देशाचे पंतप्रधान झाले. चंद्रशेखर यांच्या मंत्रिमंडळातही धनकड यांना बोलवण्यात आले. पण काही राजकीय कारणांनी त्यांनी शपथ घेण्यास नकार दिला. धनकड यांनी १९९३ मध्ये राजस्थान विधानसभेची निवडणूक जिंकत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मात्र नंतर काँग्रेसमध्ये अशोक गहलोत यांच्याशी त्यांचे जमले नाही. गहलोत यांनी धनकड यांना विधानसभेची उमेदवारी नाकारली. त्यामुळे त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पण राकाँतही ते फार काळ स्थिरावले नाहीत. २००३ च्या राजस्थान विधानसभा निवडणुकीच्या वेळी धनकड यांनी भाजपात प्रवेश केला. त्यामुळे धनकड हे मूळ भाजपाचे नाहीत.

धनकड यांना राष्ट्रीय राजकारणात प्रवेश करायचा होता. पण वसुंधरा राजे यांनी त्यांना राज्यसभेत जाण्यापासून रोखले. मात्र धनकड यांनी भाजपातच राहण्याचा निर्णय घेतला. मोदी पंतप्रधान झाल्यानंतर अचानक २०१९ मध्ये धनकड यांची पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून निवड झाली. नंतर मात्र त्यांनी मागे वळून पाहिले नाही. २०२२ मध्ये उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत भाजपाचे उमेदवार म्हणून त्यांनी काँग्रेसच्या मागरिट अल्वा यांचा पराभव केला.

उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा देणारे धनकड हे पहिले नाहीत. याआधी व्ही. व्ही. गिरी (१९६९), आर. व्यंकटरमण् (१९८७) आणि शंकरदयाल शर्मा (१९९२) यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला होता. मात्र या तिघांनी कोणत्याही राजकीय कारणाने नाही तर राष्ट्रपतिपदाची निवडणूक लढवण्यासाठी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला होता. विशेष म्हणजे हे तिघेही राष्ट्रपतिपदी निवडून आले. कृष्णकांत पण उपराष्ट्रपती म्हणून आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नाहीत. २१ ऑगस्ट १९९७ ला कृष्णकांत उपराष्ट्रपती झाले, पण कार्यकाळ संपायला काही दिवस असतानाच २७ जुलै २००२ मध्ये त्यांचे आकस्मिक निधन झाले. ३ मे १९६९ ला राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांचे निधन झाले. त्यामुळे राष्ट्रपतिपदाची निवडणूक लढवण्यासाठी व्ही. व्ही. गिरी यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला, त्यामुळे देशात अभूतपूर्व घटनात्मक पेचप्रसंगाची स्थिती उद्भवली. देशात राष्ट्रपती नाही आणि उपराष्ट्रपतीही नाही, अशीही परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्या. मोहम्मद हिदायतुल्लाह यांची कार्यवाहक राष्ट्रपती म्हणून नियुक्ती करण्यात आली. देशात राष्ट्रपतिपदानंतर उपराष्ट्रपती हे दुसऱ्या क्रमांकाचे घटनात्मक पद आहे. राष्ट्रपतीच्या अनुपस्थितीत उपराष्ट्रपती राष्ट्रपतिपदाच्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळू शकतो. जगदीप धनकड यांच्या राजीनाम्यामुळे आता उपराष्ट्रपतिपदासाठी निवडणूक घ्यावी लागणार आहे. विशेष म्हणजे ही पोटनिवडणूक नाही तर नियमित निवडणूक राहणार आहे. निवडून येणारा नवा उपराष्ट्रपती दोन वर्षांसाठी नाही तर पाच वर्षांसाठी राहणार आहे. सामान्यपणे आपल्या देशात आधी राष्ट्रपतिपदाची आणि नंतर उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक होत असते. पण यावेळी आधी उपराष्ट्रपतिपदाची आणि नंतर राष्ट्रपतिपदाची निवडणूक होणार आहे. लोकसभा आणि राज्यसभा मिळून सध्या ७८६ सदस्य आहेत. यापैकी ६ जागा रिक्त आहे, म्हणजे ७८० जणांना मतदानाचा अधिकार आहे. निवडणूक जिंकण्यासाठी ३९४ मतांची आवश्यकता आहे. त्यामुळे भाजपाजवळ आपल्या रालोआतील मित्रपक्षाच्या मदतीने ही निवडणूक जिंकण्याएवढे निर्विवाद बहुमत आहे, यात शंका नाही. उपराष्ट्रपतिपदासाठी संरक्षण मंत्री राजनाथसिंह, बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांच्यासह अनेकांच्या नावांची चर्चा आहे. यात कोण बाजी मारणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे. भाजपाचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार याची चर्चा गेल्या दिवसांपासून माध्यमांत रंगत असताना त्यात आता देशाचा नवा उपराष्ट्रपती कोण या चर्चेचीही भर पडणार आहे, हे मात्र निश्चित.

९८८१७१७८१७

## स्वच्छ सर्वेक्षणात नागपूरला भोपळा

स्वच्छ भारत मिशन द्वारा आयोजित 'कचरामुक्त शहर' या श्रेणीत नागपूरला शून्य गुण मिळाल्याचे कळताच धक्का बसला. यासाठी केवळ प्रशासकीय यंत्रणा दोषी नाही. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. घरचा ओला आणि सुका कचरा वेगवेगळा जमा करून तो कचरा गाडीवाल्याला द्यायला हवा. रस्त्यावर, खुल्या भूखंडावर, नाल्यात किंवा नालीत कचरा फेकू नये. स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ च्या शहरी श्रेणीत मध्य प्रदेशातील इंदूर शहराने लागोपाठ आठव्यांदा प्रथम क्रमांक मिळवला आहे. तेथील नागरिकांना प्रशासनाने समजावून, दाटून आणि दंडित करून स्वच्छतेचे वळण लावले. कचरा गाड्यांवरील ध्वनिक्षेपकांवर उद्घोषणा आणि हिंदी लोकजागृतीपर गाण्यांची व्यवस्था केली. नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून त्यांना या कार्यात सहभागी करण्याचे कठीण काम प्रशासनाने पोलिस विभागाच्या सहकार्याने करून दाखवले. जे इंदूरकरांना जमले ते आम्हा नागपूरकरांना जमणार नाही का? प्रशासन आणि नागरिकांनी एकमेकांना सहकार्य करावयास हवे. स्वच्छ सर्वेक्षणात यावर्षी मिळालेल्या सत्ताविसाव्या क्रमांकाने खचून न जाता अधिक जोमाने प्रयत्न व्हायला हवेत. आपले घर स्वच्छ ठेवण्याबरोबरच आपले शहर आपल्याकडून अस्वच्छ होणार नाही याची दक्षता प्रत्येक व्यक्तीने घ्यावयास हवी.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

## सभागृहाची अवहेलना थांबवा

'विधानभवनाच्या लॉबीमध्ये हाणामारी' ही बातमी वाचून मन विषण्ण झाले. विधिमंडळाच्या ठिकाणी अशी घटना म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा बोजवाराच उडालेला आहे. जिथे आमदारच सुरक्षित नसतील तिथे जनतेचे हाल होणारच. विधिमंडळाच्या सभागृहात जनतेच्या भल्यासाठी चर्चा करून तसेच नवीन योजना, कायदा निर्माण करण्यासाठी जनतेने लोकप्रतिनिधींना निवडून दिले आहे. अशा पवित्र वास्तूमध्ये दोन पक्षांच्या कार्यकर्त्यांची हाणामारी, शिवराळ भाषा, शिवीगाळ होत असेल तर महाराष्ट्राची वाटचाल कुठे चालली आहे, असा प्रश्न सर्वसामान्य जनतेत पडला आहे.

लोकप्रतिनिधींना यासाठीच निवडून दिले आहे काय? मुख्यमंत्र्यांनी आता आपल्या प्रेमळ आणि पोपटपंची करणाऱ्या सर्व आमदारांना योग्य ती समज द्यावी. सरकार टिकवण्यासाठी सभागृहात असला लांच्छनास्पद प्रकार घडविण्यासाठी जे जे पुढे होते त्या सगळ्यांवर कठोर कारवाई करावी. सभागृहाची शिस्त कोणीच पाळत नाही हे शोभनीय नाही. ज्या ठिकाणी चर्चा, विविध विषयावर मंथन, आरोप-प्रत्यारोप व्हावेत अशा ठिकाणी हाणामारी, शिवीगाळ हे योग्य नाही. ज्या ज्या पक्षाचे समर्थक आहेत त्यांच्या प्रमुखांना ही धडा शिकवा आणि सभागृहाची अवहेलना थांबवा.

**संतोष राऊत**/९९६०१०४३४५

## वाचक पत्रे

## जीवनात पुस्तकांचे महत्त्व

पुस्तकांचे जीवनात फार मोठे स्थान आहे. पुस्तके म्हणजे ज्ञानाचे भांडार. ती आपल्याला नवे विचार, नवीन जग आणि अनेक अनुभवांची दारे उघडून देतात. पुस्तकांच्या माध्यमातून आपल्याला वेगवेगळ्या विषयांचे ज्ञान मिळते. इतिहास, भूगोल, विज्ञान, साहित्य, तत्त्वज्ञान, गणित अशा अनेक क्षेत्रांतील माहिती पुस्तके आपल्याला उपलब्ध करून देतात. एक चांगले पुस्तक वाचल्याने माणसाचा विचार करण्याचा दृष्टिकोन बदलतो, मन अधिक संवेदनशील व प्रगल्भ होते. विद्यार्थ्यांच्या आयुष्यात पुस्तके अत्यंत आवश्यक असतात. कारण त्यांच्याच माध्यमातून ते शिक्षण घेतात आणि परीक्षेत यश मिळवतात. पुस्तके केवळ माहिती देत नाहीत, तर विचार करण्याची क्षमता विकसित करतात. चांगली पुस्तके आपल्याला योग्य आणि अयोग्य यामधील फरक समजावतात. आत्मविकासासाठी, प्रेरणा मिळवण्यासाठी आणि जीवनात सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्यासाठी पुस्तके उपयुक्त ठरतात. याशिवाय, पुस्तके आपल्या भावनांना वाट मोकळी करून देतात. चांगली पुस्तके आपल्याला चांगले विचार, जीवनमूल्ये आणि आदर्श शिकवतात. त्यामुळे पुस्तके केवळ शिक्षणाचे साधन नसून, ती आयुष्यभरासाठी असणारे खरे, नि:स्वार्थी मित्र आहेत. पुस्तके ही माणसाचे खरे मित्र मानले जातात. छापील पुस्तकांचा स्पर्श, त्यातील शब्दांचा गंध आणि त्यातून येणारा अनुभव हा वेगळाच असतो. शेवटी एवढेच म्हणता येईल की, पुस्तके वाचा, जीवन समृद्ध करा. पुस्तके म्हणजे आपल्या आयुष्यातील खरे मित्र आहेत. ती कधीच धोका देत नाहीत, नेहमी मार्गदर्शन करतात. त्यामुळे नियमित वाचनाची सवय लावून आपले जीवन समृद्ध करूया.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## बडनेरा-नाशिक रोड मेमू ट्रेन नियमित करा

०१२११/०१२१२ बडनेरा नाशिक रोड मेमू ट्रेन नियमित करावी. ही ट्रेन गेल्या दोन वर्षांपासून विशेष ट्रेन म्हणून धावत आहे. आता प्रतीक्षा यादीतील लोकांना एक्सप्रेस आणि सुपरफास्ट ट्रेनमध्ये चढण्याची परवानगी नाही. त्यामुळे प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. जर बडनेरा नाशिक रोड मेमू नियमित केली तर प्रवाशांसाठी ते खूप सोयीचे होईल. ही ट्रेन इगतपुरीपर्यंत वाढवावी, ही अपेक्षा.

**राजेश पी. कारिया**/अकोला

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सहकारी महिलेचे सव्वा दोन लाखांचे दागिने लंपास

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२३ जुलै-

सहकारी महिलेचे सव्वा दोन लाखांचे दागिने चोरून नेल्याप्रकरणी महिलेविरुद्ध विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अनिता सुनिल जत्ती (वय २६, रा. बोळकोटा, पो. बरूर, ता. दक्षिण सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरून संगीता वारे (रा. कल्याण नगर, सोलापूर) या महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिता आणि संगीता या एकमेकांच्या ओळखीच्या असून या दोघी मिळून मंगल कार्यालयात काम करतात. १७ डिसेंबर २०२४ रोजी बॉम्बे पार्क येथे मंगल कार्यालयात काम करताना अनिता जत्ती हिने घातलेले सोन्याचे दागिने हे मंगल कार्यालयात गादी ठेवतात त्या रूममध्ये पिशवीमध्ये ठेवलेले होते. सोन्याचे दागिने ठेऊन अनिता या कामासाठी गेल्या असता संगीता वारे



या महिलेने अनिताची नजर चुकवून तिच्या पिशवीतील २ लाख २३ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. यामध्ये २५ ग्रॅमचे सोन्याचे गंठण, ५ ग्रॅमचे सोन्याचे कानातील फुले असे दागिने चोरल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याबाबत सुमारे एक वर्षानंतर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार हार पुढील तपास करीत आहेत.



### महत्वाचे...

#### सीए परीक्षेत अनुप कुलकर्णीचे यश

सोलापूर, दि. २३ जुलै-

नुकत्याच झालेल्या चार्टर्ड अकाउंटंटच्या परीक्षेत सोलापूर येथील अनुप अनिल कुलकर्णी हा फायनल परीक्षेत उत्तीर्ण झाला. त्याने ही परीक्षा पुणे केंद्रावरून दिली होती. त्यात त्याला घवघवीत यश मिळाले. त्याचे शालेय शिक्षण सोलापूर येथील हरिभाई देवकरण शाळेत झाले असून महाविद्यालय शिक्षण संगमेश्वर कॉलेज येथे झाले. नोकरी करत करत त्याने हे यश प्राप्त केल्याबद्दल त्याचे कौतुक होत आहे. येथील आयडीबीआय बँकेतील अनिल कुलकर्णी यांचे ते चिरंजीव आहेत.



#### कन्ना चौकातून दुचाकी लंपास

सोलापूर, दि. २३ जुलै-

शहरातील कन्ना चौकातून चोरट्याने ४५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत सिध्दाराम रेवणसिध्दप्पा तंबाके (वय ४८, रा. उत्तर कसबा, गवळी गल्ली, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ मार्च २०२५ रोजी सिध्दाराम तंबाके यांनी त्यांची एमएच १३ एवाय ६७८९ क्रमांकाची दुचाकी ही कन्ना चौकात हँडल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार शेख पुढील तपास करीत आहेत.

#### रेल्वे कॉलनीतून ३५ हजारांची दुचाकी चोरीस

सोलापूर, दि. २३ जुलै-

रेल्वे कॉलनीतून चोरट्याने ३५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली.याबाबत प्रेमकुमार रामजी पटेल (रा. ५/११०, रेल्वे कॉलनी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रेमकुमार पटेल यांनी १६ जुलै रोजी सायंकाळी त्यांची युपी ६५ सीबी ९४४२ क्रमांकाची दुचाकी ही हँडल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार सरतापे पुढील तपास करीत आहेत.

#### चारचाकी वाहनातून ६५ हजारांचा मोबाईल चोरीस

सोलापूर, दि. २३ जुलै-

शहरातील रूपा भवानी मंदीर परिसरात लावलेल्या चारचाकी वाहनातून चोरट्याने ६५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. याबाबत मल्लिकार्जुन रामचंद्र झळके (वय २५, रा. नटराज सोसायटी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ जुलै रोजी रात्री साडेआठच्या सुमारास मल्लिकार्जुन झळके हे रुपाभवानी मंदीर येथे त्यांच्या एमएच ०१ एई ९५६७ क्रमांकाच्या चारचाकी वाहनात झळके यांनी त्यांचा ६५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल ठेवला होता. तो मोबाईल चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार आरेनवरू पुढील तपास करीत आहेत.



#### कर्ज फेडण्यासाठी पैसे आण म्हणून विवाहितेचा छळ

सोलापूर, दि. २३ जुलै-

कर्ज फेडण्यासाठी पैसे आण म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत निकिता रमेश बोळमेकर (वय ३०, रा. ममदापूर, ता. बबलेश्वर, जि. विजयपूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरून अनिल रमेश बोमळेकर (वय ३०, रा. मौलाली चौक, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निकिता बोळमेकर या १० सप्टेंबर २०२१ ते ५ जून २०२५ या कालावधीत पतीसोबत सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती अनिल याने निकिता यांना तुझ्या आई वडीलांनी लग्नात मानपान केला नाही, झालेले कर्ज फेडण्यासाठी माहेरून एक लाख रूपये आण, तसेच तू दिसायला चांगली नाही, बुटकी आहे असे म्हणून निकिता यांना मानसिक व शारीरीक त्रास देऊन मारहाण करून माहेरी हाकलून दिले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार इनामदार तपास करीत आहेत.

# संत नामदेव समाधीस्थळ वैश्विक स्मारक होणार : मुख्यमंत्री

## ● संत नामदेव मंदिराचा जिर्णोद्धारासही निधीची कमतरता भासणार नाही; पंढरपुरातील समाधी सोहळ्यात दिली ग्वाही

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२३ जुलै-

समाजातल्या शेवटच्या व्यक्तीला समाजाच्या मुख्यधारेत आणणाऱ्या आणि भागवत धर्माचा विचार आपल्या लेखणी व वाणीने देशभर पोहोचविणाऱ्या संत नामदेव महाराज यांच्या पंढरपूर येथील मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात येईल. संत नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी वैश्विक दर्जाचे स्मारक उभारतांना निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. त्यांचे विचार हे त्यांचे खरे स्मारक असून हे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पंढरपूर येथे आयोजित श्री संत शिरोमणी नामदेव महाराज, परिवार व संत जनाबाई यांच्या ६७५ व्या (षष्ठशतकोत्तर अमृतमहोत्सवी) संजीवन समाधी सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, श्री नामदेव क्षत्रिय एकसंघाचे अध्यक्ष महेश ढवळे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गुरु गोविंदसिंग, संत कबीर यांनी संत नामदेवांचा उल्लेख अत्यंत आदराने केला आहे. मीराबाई, नरसिंह मेहता यांच्या काव्यातदेखील नामदेव महाराजांचे विचार पहायला मिळतात. भारताच्या सर्व दिशांना जोडण्याचे आणि खऱ्या अर्थाने भागवत धर्मातील विचार वैश्विक करण्याचे कार्य त्यांनी केले. आपला पारंपरिक व्यवसाय जरी त्यांनी केला नसला सामाजिक समरसतेचे वस्त्र विणण्याचे, संपूर्ण व्यवस्था बदलण्याचे आणि सम ाजाला एकतेचे मूल्य देण्याचे कार्य नामदेव महाराजांनी केले. संत कबीर, दादू, गरीबदास यांनी विचारांची प्रेरणा संत नामदेवांकडून घेतली.

आपल्या संतभूमीत अभंगांच्या माध्यमातून संतांचा हा विचार आपल्यापर्यंत पोहोचला आहे. यावेळी हरिभक्त पारायण ज्ञानेश्वर महाराज नामदास व आचार्य तुषार भोसले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सरसंघचालक मोहन भागवत यांनी या कार्यक्रमासाठी दिलेला शुभेच्छा संदेश दाखवण्यात आला. कार्यक्रमाच्या



### भक्तीचा ओघ संपूर्ण भारतात नेण्याचे संत नामदेवांचे महान कार्य

संत नामदेव महाराजानी देशातील २२ राज्यात भ्रमण करून भागवत धर्माचा विचार पोहोचविला. परकीय आक्रमणाच्यावेळी समाजात श्रद्धा निर्माण करण्याचे आणि समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. संत ज्ञानेश्वर महाराजांनी भगवद्गीतेची गंगा मराठीत आणली, त्याला नामदेव महाराजांच्या तत्वज्ञानाचे अधिष्ठान लाभले. या दोघा संतांची भेट वारकरी संप्रदायात अमूल्य विचारांचा संगम म्हणून पाहिले जाते. संत नामदेव केवळ वारकरी नव्हते, तर भारतीय संस्कृतीच्या एकात्मतेचे पाईक होते. त्यांनी भाषेचे बंधन झुगारले, सीमांची कुंपणे तोडली आणि भक्तीचा ओघ संपूर्ण भारतात नेण्याचे कार्य केले. आपल्या ऐतिहासिक यात्रेचा समारोप पंढरपूरला करतांना स्नेहभोजनात सर्वांना एकत्र करून संपूर्ण समाजाला एक करण्याचे कार्य केले. विठ्ठल मंदिरात चोखोबांची समाधी उभी करून विखंडीत समाजाला जन्माने नव्हे तर कर्माने व्यक्ती मोठा होतो हा संदेश दिला.

### हिंदी साहित्याला नवे भान देण्याचे महान कार्य

संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीचे हृदयद्रावक दृष्य घटनेचे वर्णन केले. त्यांनी पुंडलीकांपासून जनाबाईपर्यंत भक्तांचे चरित्रदेखील लिहिले. आपल्या इतिहासातले पहिले चरित्रलेखक संत नामदेव महाराज होते. त्यांच्या साहित्यात संवाद आहे, नाट्य आहे, अखिल मानवतेचा विचार करून निर्माण केलेले हे साहित्य आहे. श्रीकृष्णाच्या लीला मराठीत सांगतांना त्यांनी बालकविताही लिहिल्या आहेत. मराठीच्या गजलांचे मूळही संत नामदेवांपर्यंत पोहोचते. सर्व साहित्याची निर्मिती करतांना हिंदी साहित्याला नवे भान देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांनी हिंदी आणि पंजाबीत अभंग लिहिले. ब्रज भाषा आणि शौरसेनी भाषा त्यांना अवगत होत्या. भाषा हे संवादाचे साधन आहे, विवादाचे साधन नाही, हे त्यांनी दाखवून दिले. भाषा ही मैत्री आणि बंधुत्वाचा धागा आहे हे त्यांनी जाणून घेतले होते. म्हणून शीख धर्मात सर्वोच्च स्थानी असलेल्या गुरु ग्रंथसाहिबमध्ये ६१ पदे संत नामदेवांची आहेत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या परिवारातील त्यांचे वंशज ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज नामदास व अन्य संतांचे पूजन केले. त्यानंतर श्री संत नामदेव महाराज यांच्या संपूर्ण कार्याची माहिती व महिमा लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष संकेतस्थळांचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. तसेच या संजीवन सोहळ्यानिमित्त तयार करण्यात आलेल्या चांदीच्या विशेष नाण्याचे विमोचनही करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री नामदेव क्षत्रिय एकसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष महेश ढवळे यांनी केले. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार राजेंद्र राऊत, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, आचार्य तुषार भोसले, अभिनेता गोविंदजी नामदेव, ह.भ.प. केशव महाराज नामदास, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, एकसंघाचे सचिव रुपेश खांडके व मान्यवर उपस्थित होते.

### नामदेव पायरीचे दर्शन हा भाग्याचा क्षण

संत नामदेव महाराजांच्या ६७५ व्या संजीवन समाधीच्या निमित्ताने नामदेव पायरीचे दर्शन घेणे आणि तिथली ऊर्जा प्राप्त करून घेणे हा भाग्याचा दिवस असल्याचे नमूद करून फडणवीस म्हणाले, या पायरीच्या दर्शनाने प्रत्यक्ष पांडुरंगाचे दर्शन घेतल्याचे पुण्य मिळते. नामदेव महाराजांच्या अभंगात 'पायरीचे चिरे' असा उल्लेख आहे, भागवत धर्माचा विचार हा वैश्विक विचार आहे, तो देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याचे कार्य नामदेव महाराजांनी केले. मराठ्यांनी हिंदवी स्वराज्य अटकेपार नेले, परंतु त्यापूर्वी नामदेव महाराजांनी भागवत धर्माचा विचार तिथपर्यंत पोहोचविला. त्यांच्या कुटुंबानेदेखील विठुमाऊलीचे कार्य सर्वापर्यंत पोहोचविले. एकाच परिवारातल्या सदस्यांनी एकाचवेळी संजीवन समाधी घेण्याची घटना केवळ भागवत धर्मात आणि विठ्ठलाच्या भक्तीतच शक्य आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### संत नामदेव परिसर विकासाचा प्रयत्न : पालकमंत्री गोरे


पालकमंत्री गोरे म्हणाले, देशाची संस्कृती जपणे, वृद्धींगत करणे, संतांच्या विचाराचा प्रसार होणे, आपली प्रेरणास्थळे बळकट करण्यासाठी शासन कार्य करीत आहे. पंढरपूरचा विकास होऊन कॉरीडॉरची निर्मिती करण्यासाठी नागरिकांना विश्वासात घेण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रयत्न आहे. नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी भव्य स्मारक पंढरपूर येथे उभे रहावे आणि संत नामदेव महाराज मंदिर परिसराचा विकास व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संत शिरोमणी सावता महाराजांच्या स्मारकासाठी १५० कोटींचा निधी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील लोकांनी परस्परांमधील लहान– मोठे मतभेद बाजूला ठेवून संत नामदेव महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी एकत्रित यावे असे आवाहन गोरेंनी केले.

## बांधकाम मजुराचा खून; तरुणास जन्मठेप

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २३ जुलै-

बांधकाम मजुराचा खून केल्याप्रकरणी छत्तीसगडमधील तरुणास जिल्हा न्यायाधीश आर जे कटारिया यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. पुकराम सिताराम निषाद (वय ३८, रा. पोता, ता. मालखरोदी, जि. जांजगीर चांपा, छत्तीसगड) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. कृष्णा जगदीश निषाद (रा. वार्ड क. ०८, टिकरी पारा, ससहा, जि. जांजगिर चांपा, छत्तीसगड) असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत विरसेन देशमुख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पाटकूल येथील विश्वजीत विरसेन देशमुख यांच्या नवीन घराचे बांधकामावर



पुकराम निषाद व मयत कृष्णा निषाद हे दोघे मजूर म्हणून काम करीत होते. २९ मे २०२३ रोजी सकाळी साडेपाचच्या सुमारास पुकराम याने कृष्णा हा त्यास जेवन देत नव्हता व जेवण बनविण्यासाठी भांडी देत नव्हता या कारणावरून चिडून कृष्णा यास झोपलेल्या अवस्थेत बांधकामावरील सेंट्रींगच्या लाकडी फळीने कृष्णाच्या तोंडावर जोरात प्रहार करून त्याचा खून केला. याबाबत मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिस उपनिरीक्षक धनाजी खापरे, सुधीर खारगे यांनी आरोपीस अटक करून तपास केला व न्यायालयात दोषारोपपत्र पाठवून दिले.

याची सुनावणी जिल्हा न्यायाधीश कटारिया यांच्या समोर झाली. याप्रकरणात सरकारच्यावतीने ९ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये फिर्यादी, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी यांच्या साक्षी पुराव्यावरून तसेच सरकारी वकिलांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायाधीश कटारिया यांनी आरोपी पुकराम यास जन्मठेप व १ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

याप्रकरणी सरकारच्यावतीने ॲड. प्रकाश जन्नू यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. मनोज सोलनकर यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलिस शिपाई आर एम पवा यांनी काम पाहिले.



## 'हरिभाई'मध्ये लोकमान्य टिळक जयंती साजरी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२३ जुलै-

हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमासाठी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य श्रीमती दीपा फाटक पर्यवेक्षक भानुदास बनसोडे पर्यवेक्षक आप्पासाहेब राऊत पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड पर्यवेक्षक मारुती शहाणे उपस्थित होते. त्या प्रसंगी प्रशालेच्या मुख्याध्यापिका यांनी आपले मत व्यक्त करताना टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे पहिले नेते होते. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना भारतीय असंतोषाचे जनक म्हणले. त्यांना लोकमान्य ही पदवी देखील बहाल करण्यात आली, याचा अर्थ लोकांनी त्यांना (नेता म्हणून) स्वीकार केला असा होतो. महात्मा गांधींनी त्यांना आधुनिक भारताचा निर्माता टिळक हे स्वराज्याचे पहिले आणि प्रबळ पुरस्कर्ते होते. तसेच ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक मजबूत जहालवादी नेते होते. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच! या त्यांच्या घोषणेसाठी ते ओळखले जातात असे मत मांडले. आभार अनुराधा देशमुख यांनी मांडले.

## राज्याच्या शासकीय गोदामातील हमालांना 'घामाचा' दाम द्या

### ठेकेदार अन् कामगारांची शासनाकडे आर्त हाक

### सोलापुरातील १५० कर्मचाऱ्यांवर उपसमारीची वेळ

तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड
सोलापूर, दि. २३ जुलै-

राज्यातील शासकीय धान्य गोदामात हमालीचे कंत्राट खासगी गुत्तेदारांना देण्यात आले असून, हमाल मापाडी महामंडळाकडून नेमून दिलेल्या हमाल कामगारांना कामावर ठेवले गेले आहे. गुत्तेदार त्यांच्याकडून अहोरात्र कामे करून घेतात आणि त्यांच्या पोटासाठी आणि कुटुंबियांसाठी लागणार पगारच शासनाकडून गेल्या ६ महिन्यापासून थकल्याने हे कर्मचारी कमालीचे आर्थिक अडचणीत आले आहेत. जानेवारीपासून आजतागायत या कामगारांचा पगार थकल्याने त्यांची उपासमार सुरू असल्याची माहिती सोलापूर येथील एका गोदाम ठेकेदारांनी दिली. इतकेच कायतर या ठेकेदारांचीही बिले अशीच अडकल्याने शासनाने गोदाम कामगार अन् ठेकेदारांची आर्थिक समस्या दूर करावी, अशी आर्त मागणी संदीप गायकवाड या ठेकेदारांनी माध्यमांकडे व्यक्त केली.

सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील सर्व शासकीय धान्य गोदामातील हमालीचे कंत्राट विविध गुत्तेदारांना देण्यात आले असून, या गुत्तेदारांनाही शासनाकडून पैसे मिळाले नाहीत. जानेवारी २०२५ ते आजतागायत



या ठेकेदार अन् शासकीय गोदामातील हमाल काम गारांना त्यांचा पगार दिला गेला नाही. यामुळे हे काम गार पर्यायी मार्ग शोधत असून, हे कामगार सोडून गेले तर गोडावूनमध्ये हमल कर्मचारी आम्हाला कोठून मिळणार, अशीही भीती या गोडावून ठेकेदारांकडून व्यक्त होत आहे. आम्ही गाळलेल्या घामाचा दाम मिळावा, यासाठी काही जिल्ह्यातील कामगारांनी महाराष्ट्र हमाल मापाडी महामंडळामार्फत विविध ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. याबाबत वेळोवेळी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करूनही काही उपयोग झाला नसल्याने काही भागातील हमाल कामगारांनी कामबंद आंदोलन केले होते. जिल्ह्यातील शासकीय धान्य गोदामातील हमाल काम गारांना चार महिन्यांपासून कामाचा मोबदला दिला गेला नाही. त्यामुळे त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. वरिष्ठ पातळीवर अनेकवेळा पाठपुरावा करूनही वेतन दिले जात नाही. हे कामगार काम सोडून गेले तर याचा परिणाम धान्य वितरणावर होणार असून, गोदामातील धान्य रेशन दुकानदारांना पोचवायचे कसा? असा प्रश्न प्रशासनाला पडला आहे.

### वारंवार पाठपुरावा सुरु

शासनाकडून आलेल्या धान्याची साठवणूक करून संबंधित रेशन दुकानदाराला धान्य पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात १८ शासकीय धान्य गोदाम कार्यान्वित केले आहेत. यात १५० हमाल कामगार असून, त्यांचे वेतनाचे जवळपास ४ कोटी रुपये थकीत आहेत. शासनाकडून आलेले धान्य उतरवून घेणे, त्याचा वजनकाटा करून संबंधित रेशन दुकानदारांच्या वाहनात भरून देण्याचे काम या हमाल कामगारांकडून करून घेतले जाते. धान्य वितरण प्रणालीत हमाल कामगार महत्त्वाचा दुवा आहे. यामुळे शासनाच्या संबंधित विभागाकडे हमालांच्या पगाराबाबत मी वेळोवेळी पाठपुरावा केला आहे आणि करीत आहे.

\- संतोष सरडे,
जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर

## वृध्द आजीला मारहाण; नातू व सुनेविरुध्द गुन्हा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २३ जुलै-

वृध्द आजीला मारहाण केल्याप्रकरणी नातू व सुनेविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रुक्मीणी हरिभाऊ नरखेडकर (वय ७६, रा. भांडे गल्ली, शुक्रवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सून अनुपमा महेश नरखेडकर, नातू श्रीकांत महेश नरखेडकर (रा. भांडे गल्ली, शुक्रवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२१ जुलै रोजी दुपारी रुक्मीणी नरखेडकर या त्यांच्या घरी असताना मुलगा उमेश हा मिठाई बनविण्याच्या गोडाऊनमध्ये जात होता. त्यावेळी श्रीकांत नरखेडकर याने वाटेतच उमेशला आडवून दरवाजामध्ये उभे राहून तु गोडाऊनमध्ये जायचे नाही असे म्हणून शिवीगाळ करू लागला. त्यावेळी रुक्मीणीबाई या समजविण्यासाठी गेल्या असता त्यांनाही शिवीगाळ करून ढकलून दिले. त्यावेळी श्रीकांत



याने त्याची आई अनुपमा हिस हाक मारून बोलावून घेतले. त्यानंतर श्रीकांत व अनुपमा यांनी रुक्मीणी व उमेश यांना मारहाण करीत असताना अनुपमा यांच्या गळ्यातील मंगळसूत्र तुटून खाली पडले. त्यामुळे श्रीकांत याने चिडेच्या तुकड्याने रुक्मीणी यांना मारहाण केली. तसेच मंगळसूत्र तुटले म्हणून श्रीकांत याने उमेश यांच्या खिशातील ५०० रुपये काढून घेतले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात सून अनुपमा महेश नरखेडकर, नातू श्रीकांत महेश नरखेडकर (रा. भांडे गल्ली, शुक्रवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार कसबे पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी ११८७

**देखा बालकाचिया धणी धाईजे ।**
**कां शिष्याचेनि जाहलेपणें होईजे ।**
**हें सदगुरुचि एकलेनि जाणिजे ।**
**का प्रसवतिया ।।**

अर्जुनाला, भगवान श्रीकृष्ण अवघड पण महत्वपुर्ण असे विषय समजावून सांगत आहेत. अर्जुन एकाग्र मनाने ऐकत असल्याने त्याला हे अवघड विषय समजत आहेत. अर्जुनाला सर्व विषय समजत असल्याचे भगवंतांच्या लक्षात आल्याने भगवंतांना आनंद वाटत आहे. आपण एखादा विषय जीव तोडून समोरच्याला पुन्हा-पुन्हा सांगीतला आणि त्याला जर तो विषय ध्यान न दिल्यामुळे समजत नसेल तर आपणाला वाईट वाटते.



पण आपण सांगत असलेला विषय जर समोरच्याला समजत असल्याचे आपल्या लक्षात आले तर आपणाला आनंद होतो. हा आनंद केवळ वक्ताच समजू शकतो. श्रीकृष्णाचे अवघड विषय अर्जुनाला समजत आहेत. त्यामुळे श्रीकृष्णांना कसा आंनद वाटत आहे, हे सांगतांना माऊली म्हणतात, देखा बालकाचिया धणी धाईजे । कां शिष्याचेनि जाहलेपणें होईजे । हें सदगुरुचि एकलेनि जाणिजे । का प्रसवतिया ।। अर्थात लहान बालकाच्या संतोषाने आईला आनंद वाटतो किंवा शिष्य कृतार्थ झाल्याने आपण किती कृतार्थ झालो याचा आनंद फक्त सदगुरुच जाणू शकतात. प्रेमाचा, आनंदाचा, विश्वासाचा विषय समजून सांगायचा झाला की, माऊली स्त्रीचे म्हणजे आईचे उदाहरण घेत असतात. ज्ञानदेव सुध्दा ममत्वाची, प्रेमाची, मुर्ती असल्याने सर्व भक्त त्यांना स्त्रीलिंगी शब्दाने हाक मारताना माऊली असे म्हणतात.

भगवंत अर्जुनाला ज्ञानी माणसाबद्यल बोलत आहेत. ज्ञानी माणूस जीवनभर किंवा मृत्यूसमयीसुध्दा द्वैत पाळत नाही. मी आणि संपूर्ण विश्व ब्रम्ह आहे असे तो मानतो. जिवंतपणी ज्या शरीरात मी शिल्लक नाही, तेथे मृत्यू समयी शरीराचा मोह निर्माण होण्याचे कारणच नाही. मृत्यूसमयी ज्ञानी व्यक्तिला अजिबात दु:ख वाटत नाही. अथांग पाण्यात घट (मडके) बुडाला, तर तो आतून-बाहेरुन पाण्याने भरला जातो आणि योगायोगाने तो पाण्यातच फुटला तर त्यातील पाणी फुटण्याचे कारण नाही. कारण आत बाहेर फक्त पाणीच असते. अगदी ज्ञानी व्यक्ति स्वत:ला विश्वरुप समजत असल्याने त्याला आपण कोणीतरी वेगळे आहोत याची जाणच नसते. त्याच्यावजळ आप-पर हा भेदच शिल्लक नसतो. मनुष्य जागेपणी ज्या गोष्टीचे सतत चिंतन करतो, तीच गोष्ट त्याला स्वप्नात दिसते. त्या प्रमाणे ज्ञानी रांत्रदिन संपूर्ण विश्व व आपण केवळ ब्रम्हच असल्याचे पाहत असल्याने तो ब्रम्हरुपच होऊन जातो. त्याला मृत्यूचे भय राहत नाही. म्हणून अर्जुना तू ज्ञानी होऊन हे युध्दाचे निष्काम कर्म कर. हया निष्काम कर्मामुळे तुला आप-पर काही दिसणार नाही. नितिनियमाला अनुसरुन तु हे धर्मयुध्द केले तर कोण मरणार ? कोण कोणाला मारणार ? असे प्रश्न तुझ्या समोर उभे राहणार नाहीत. देहाची आसक्ती बाळगल्याने तुला आप-पर दिसत आहे, म्हणून ही आसक्ती तू सोड आणि केवळ कर्तव्य म्हणून हे धर्मयुध्द कर. मी या युध्दाचा कर्ता आहे, असे अजिबात मनात विचार आणू नकोस, असे भगवंत अर्जुनाला समजावत आहेत आजच्या ओविच्या अनुषंगाने आपणही सर्वत्र सम पाहण्याचा मन:पुर्वक प्रयत्न करु या.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : गुरुवार** | **दिनविशेष-** |
| **दि. २४ जुलै २०२५** | **दर्शअमावस्या, दीपपूजन** |
| **विक्रम संवत् २०८१** | **गुरुपुष्यामृत.** |
| **शके - १९४७** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - विश्वावसु** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - आषाढ** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **कृ. अमावस्या (२४.६०)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वर्षा** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - पुनर्वसु (१६.४३)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - हर्षण (०९.५०)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - चतुष्पाद (१३.३१)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष** : आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील.

**वृषभ :** जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते. निरर्थक कामात आज आपला वेळ जाणार आहे. स्थावर मालमत्तेबाबत अडचण येण्याची शक्यता आहे.

**मिथुन** : आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल. रोजगारात प्रगती राहील. मुलांच्या कामाबल संशय निर्माण होईल.

**कर्क** : केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. व्यापारत नवीन योजनेची सुरूवात कराल.

**सिंह** : महत्वपूर्ण व्यक्तिंचा संपर्क येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**कन्या** : आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक समस्या सुटल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या व्यसनांना आवर घाला.

**तुळ** : जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे.

**वृश्चिक** : आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे. आपआपसातील वाद समझदारीने मिटवा. प्रवास करू नका.

**धनु** : आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका. सुखकर प्रवास होईल.

**मकर** : मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

**कुंभ** : चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल. आरोग्याची काळजी घ्या.

**मीन** : उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# घरफोडी करणाऱ्यास अटक; १५ लाखांचा मुद्देमाल जप्त

## आठ घरफोड्या उघडकीस :९६ ग्रॅम सोने; ३५० ग्रॅम चांदी, ११ मोबाईल जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिस दलातील स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घरफोडी करणाऱ्या टोळीतील अट्टल गुन्हेगारास अटक करून त्यांच्याकडून घरफोडीचे ८ गुन्हे उघडकीस आले. या कारवाईत ९६ ग्रॅम वजनाचे सोने, ३५० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने आणि ११ मोबाईल असा १४ लाख ९३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अटक करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे इतर साथीदार हे अद्याप फरार आहेत.

मंगेश उर्फ मनशा तरंगफुले काळे (वय ४२, रा. भाटनिमगाव, ता. इंदापूर, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे तर राम काळुराम भोसले आणि श्याम काळुराम भोसले (रा. पिटकेश्वर, ता. इंदापूर, जि. पुणे) हे दोघे अद्याप फरार आहेत.

टेंभुर्णी ते अकलूज जाणाऱ्या रोडवरील टेंभुर्णी येथील अकलूज चौकात फिरणाऱ्या मंगेश काळे या रेकॉर्डवरील गुन्हेगारास ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली. त्यावेळी मंगेश काळे याने आपले साथीदार राम भोसले व श्याम भोसले यांच्यासोबत मोहोळ, टेंभुर्णी, कुर्डूवाडी, माळशिरस, अकलूज, पंढरपूर आदी ठिकाणी गेल्या काही महिन्यांमध्ये घरफोडीचे गुन्हे केले असल्याचे सांगितले. पोलिसांनी मंगेश काळे याच्याकडून चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी ४ लाख ६ हजार ३०० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने व १ लाख ८३ हजार रुपये किंमतीचे मोबाईल हॅन्डसेट असा ५ लाख ८९ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल ज्याची चालू बाजारभावाप्रमाणे १४ लाख ९३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केले. ही कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली पोलिस उपनिरीक्षक सूरज निंबाळकर, हवालदार सलीम बागवान, हरिदास पांढरे, विजयकुमार भरले, शशिकांत कोळेकर, अन्वर अत्तार, यश देवकते, समर्थ गाजरे, योगेश जाधव, दिलीप थोरात, महिला कर्मचारी अश्विनी गोटे, पल्लवी इंगळे, दिपाली जाधव, सुनंदा झळके, सायबर पोलिस ठाण्याकडील व्यंकटेश मोरे यांनी केली.

**तिन्ही आरोपी हे सराईत गुन्हेगार**

स्थानिक गुन्हे शाखेने अटक केलेला मंगेश काळे व फरार असलेले रामा भोसले व श्याम भोसले हे गुन्हेगार सराईत असून त्यांच्याविरुध्द सांगोला, परांडा, बारामती, इंदापूर या ठिकाणी घरफोडीचे ७, मारामारीचे ३ असे १० गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. या टोळीकडून सोलापूर तालुका, मोहोळ, माळशिरस, अकलूज, कुर्डूवाडी, टेंभुर्णी, पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यातील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.



## पारस ॲकॅडमीचे अबॅकस स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

इंटरनॅशनल अबॅकस वर्ल्ड कप चार (आय.ए.डब्ल्यू सी) जयपुर यांच्या अंतर्गत इंटरनॅशनल अबॅकस ऑनलाईन स्पर्धेत येथील पारस अकॅडमीचे १५ विद्यार्थ्यांपैकी दहा विद्यार्थ्यांनी चॅम्पियन ऑफ चॅम्पियन ठरले. तीन विद्यार्थ्यांनी चॅम्पियन तर दोन विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी प्राप्त केली. या स्पर्धेसाठी दोन हजार हून अधिक मुलांनी सहभाग नोंदवला होता. या परीक्षेत दहा मिनिटात दीडशे गणिते सोडवायची होते. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पारस अकॅडमीच्या संचालिका दीपा संगवे व संतोष संगवे यांचे मार्गदर्शन मिळाले.

**यशस्वी विद्यार्थी असे**

**चॅम्पियन ऑफ चॅम्पियन :** वैष्णवी सागर सावंत (झिरो लेवल), मीर जमीर शेख (दुसरी लेवल), मीत जमीर शेख (दुसरी लेवल), माहिरा मोहम्मद हबीब मुजावर (झिरो लेवल), श्रीनिवास नागराज पत्तार (अजमेर कर्नाटक), श्रेया नागराज पत्तार (अलमेर कर्नाटक, दुसरी लेवल), शिवम सचिन गुंड (पहिली लेवल), अथर्व श्रीकांत वळसंगकर दुसरी लेवल), अदिती रमेश जवळगी (जिरो लेवल), राजवीर नितेश भोसले (लेवल पहिली).

**चॅम्पियन :** शुभम सुनील केसकर (झिरो लेवल), श्रेयस कालेश्वर (अलमेर कर्नाटक, लेवल पहिली), इकरा अल्लाबक्ष शेख (लेवल पहिली), श्लोक ज्ञानेश्वर सुरवसे (झिरो लेवल प्रथम श्रेणी), सौम्या संतोष संगवे (लेवल चौथी प्रथम श्रेणी).

## करुणाशील समितीतर्फे उद्या चंद्रप्रकाशी अमृतयात्री जीवनगौरव सन्मान सोहळा

### ॲड. धनंजय माने यांच्यासह १५ जणांचा होणार गौरव

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

करुणाशील समितीच्यावतीने चंद्रप्रकाशी अमृतयात्री जीवन गौरव सन्मान सोहळा शुक्रवार, दि. २५ जुलै रोजी सकाळी ११.१५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडके सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.



सन्मान समारंभास विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १५ मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण समारंभ माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. या सोहळ्यात ज्येष्ठ कामगार व ओबीसी नेते रामभाऊ गणाचार्य, ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड, ज्येष्ठ परिवर्तनवादी शाहिरी कलावंत प्रा. डॉ. अजिज नदाफ, दयानंद महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य तथा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य प्रा. डॉ. वसंतराव बनसुडे, माजी आमदार, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते सुभान बनसोडे, संगमेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य नरेश बदनोरे, ज्येष्ठ समाजसेवक मल्लिकार्जुन पाटील, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. धनंजय माने, निवृत्त उपजिल्हाधिकारी राजकुमार खरटमल, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. जे. जे. कुलकर्णी, ज्येष्ठ साहित्यिक जोहडकार सुरेखा शहा, ज्येष्ठ विचारवंत डॉ. नसीम पठाण, ज्येष्ठ नाट्यलेखिका तथा अभिनेत्री प्रा. विद्या काळे आणि ज्येष्ठ चित्रपट व नाट्य अभिनेत्री सुशीला व्हनसाळे यांचा गौरव करण्यात येणार आहे. या सोहळ्यास सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजक आशुतोष नाटकर यांनी केले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाच्या कार्याध्यक्षपदी शत्रुघ्न कांबळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सामाजिक न्याय विभाग सोलापूर जिल्हा शहर कार्याध्यक्षपदी शत्रुघ्न कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.



मागील दीड वर्षापासून ते राष्ट्रवादी पक्षाचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहात होते. श्रीयुत कांबळे यांचा जनसंपर्क विविध क्षेत्रातील काम व पक्षावरील एकनिष्ठतेची पक्षाचे दखल घेवून त्यांना एक प्रकारे बढती देवून कार्याध्यक्ष पदाचा मान दिला आहे. सार्वजनिक ग्रंथालय बालसंगोपन योजना तसेच राज्य स्तरावर निरिक्षणगृह / बालगृह कर्मचारी संघानेचे ही ते काम करतात.

## डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम पुण्यतिथीनिमित्त उद्यापासून प्रेरणा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

भारतरत्न, माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त ड्रीम फाऊंडेशनतर्फेदि. २५ ते २९ जुलैदरम्यान विविध सामाजिक व प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या उपक्रमाची सुरुवात शुक्रवार दि. २५ जुलै रोजी सकाळी १० वाजता जुळे सोलापुरातील मॅक्स अॅकॅडमी सभागृह येथे शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी कार्यक्रमाने होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. एस. एम. हनीफ, डॉ. शशिकांत हिप्परगी यांचे मार्गदर्शन होणार आहे. शनिवार दि. २६ जुलै रोजी अक्कलकोट येथील मंगरुळे प्रशाला येथे सकाळी ९ वाजता विद्यार्थ्यांना डॉ. कलाम संदेश यावर मार्गदर्शन होणार आहे.

रविवार दि. २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता द्वारकाधीश मंदिर, जलाराम नगर येथे विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, वैज्ञानिक डॉ. अशोक नगरकर, म्हाडाचे वित्त नियंत्रक अजयसिंह पवार, प्रा. व्यंकटेश गंभीर, प्रकाश राठोड, एम. के. फाऊंडेशनचे संस्थापक महादेव कोगनुरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, प्रमोद तम्मानावार, शरणमठ संकुल अक्कलकोट, महारुद्र माडेकर, डॉ. कपिल कोरके, विजय पवार, विकास भोईर, डॉ. शितल गांधी, अरुण तळीखेडे, शशिकांत आकडवाडे, इंद्रजीत पाटील, केरबा पाटील, प्रबुद्धचंद्र झपके, किशोर जाधव यांचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. सायंकाळी ५ वाजता सुंदर मल्टीपर्पज हॉल, नेहरूनगर येथे स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सोमवार दि. २८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता श्री. संगमेश्वर मंदिर, हत्तरसंग कुंडल येथे महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. मंगळवार दि. २९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता ड्रीम फाउंडेशन सभागृह येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेस सचिन धुमकनाळ, दीपा भुजबळ, वैभव सोनटक्के आदी उपस्थित होते.

## आणीबाणीच्या बंदीवासातील व्यक्तींच्या मानधनात वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

२५ जून १९७५ ते दिनांक ३१ मार्च १९७७ या कालावधीत घोषित करण्यात आलेल्या आणीबाणीच्या कालावधीत ज्या व्यक्तींना बंदिवास/कारावास सोसावा लागला, अशा व्यक्तींचा सन्मान करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे. यानुसार त्यांच्या मानधनातही वाढ करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील संबंधित व्यक्ती किंवा त्यांच्या पश्चात हयात असलेल्या त्यांच्या पती/पत्नी त्यांनी या सुधारित शासन निर्णयाप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. शासन निर्णय ३ जुलै २०१८ अन्वये विहित केलेल्या धोरणातील अट क्र.२ आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या व्यक्तींनी (ती व्यक्ती हयात नसल्यास त्याच्या हयात जोडीदाराने) शपथपत्र अर्जासोबत जोडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे, अशी सुधारित करण्यात येतआहे. त्यानुसार, आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती २ जानेवारी २०१८ पूर्वी हयात नसल्यास त्याच्या पश्चात हयात जोडीदार पती/पत्नी केवळ अशा व्यक्तींनी अनुज्ञेय असलेले मानधन मिळण्याकरिता १५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या शासन पुरक पत्रासोबतच्या परिशिष्ट ब मधील शपथपत्र अर्जासोबत जोडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे. अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक २५ सप्टेंबर पर्यंत स्वीकारण्यात येतील. शासन निर्णय दि.२५ मे २०२३ मधील अट क्र.०४ - सदर योजनेंतर्गत मानधनासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे वय अटकेच्या वेळी किमान १८ वर्षे असणे आवश्यक राहील ही अट रद्द करण्यात येत आहे.

**याप्रमाणे मिळेल मानधन**

एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेले - मासिक रु.२० हजार व पश्चात त्यांच्या पत्नीस / पतीस रु.१० हजार. एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेले - मासिक रु. दहा हजार व पश्चत त्यांच्या पत्नीस/ पतीस रु.५ हजार

## ठेकेदार भांडी संचची विक्री करीत असल्याची तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**

महाराष्ट्र शासन व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने, बांधकाम इमारत कामगारांना गृह उपयोगी भांडी संच मोफत देण्याची योजना आहे. परंतु सोलापुरातील ठेकेदारांचे प्रतिनिधी कामगारांकडून एक हजार ते पंधराशे रुपये घेऊन भांडी विक्री करीत असल्याची तक्रार सरकारी कामगार अधिकारी सोलापूर व लाचलुचपत प्रतिबंधक विभागीय आयुक्तांकडे संघर्ष समितीचे अध्यक्ष विष्णू कारमपुरी यांनी केली आहे.

या तक्रारीचे निवेदन सरकारी कामगार अधिकारी सूर्यकांत डोबरीयाल व लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे उपायुक्त प्रशांत चौगुले यांनाही देण्यात आले. यावेळी अंगद जाधव, सोहेल शेख, गणेश बोटू, वैशाली बनसोडे, रेखा आडकी, यांच्यासह समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. भांडी वाटप ठिकाणी लाच लुचपत प्रतिबंध विभागाचे बॅनर लावून लाच लुचपत विभागात तक्रार दाखल करून, संबंधितांवर गुन्हे नोंद करण्यात यावे अशी मागणी यावेळी निवेदनाद्वारे करण्यात आली. मागणीची पूर्तता दोन दिवसामध्ये न झाल्यास गुरुवार २४ जुलै रोजी गृह उपयोगी संच वाटपा ठिकाणी धरणे आंदोलन केले जाईल.



## लोकमान्य टिळक यांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**


महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक मनीष बांगर, भगवान मुंडे, सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, तरगिणी कोंडा, महेश वालावलकर, सारंगा अंजीखाने, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, ताहीर बिराजदार, रियाज अत्तार, अविनाश शिंदे, अमोल गायकवाड, जाकीर सय्यद, भालचंद्र साखरे, सायली ढोले आदी उपस्थित होते.

## काव्यवाचन राज्य स्पर्धेत अशफाक सातखेड यांचा चौथा क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**


डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम उर्दू स्कूल सोलापूरचे मुख्याध्यापक अशफाक सातखेड यांना सेकंडरी स्कूल्स एम्प्लॉईज को ऑप सोसायटी मुंबईचा अमृत महोत्सव निमित्त आयोजित राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत चौथा क्रमांक मिळाले आहेत या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्य़ातील जिल्हा पातळीवर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या शिक्षका मध्ये स्पर्धा शारदाश्रम विद्यालय, दादर मुंबई येथे घेण्यात आली. या स्पर्धेत प्रशिक्षक म्हणून मराठीचे जेष्ठ कवी व लेखक अभय पैर आणि श्रीमती माधुरी बागडे-अलई हे होते. १ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अमृत महोत्सव कार्यक्रमात पारितोषिक वितरण करण्यात येणार आहेत. तथापि संस्थेचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. या यशाबद्दल शाळेचे चेअरमन महेबूब जैनोदिन तांबोळी यांनी शुभेच्छा दिल्या.



## सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये करिअर मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या संगणक अभियांत्रिकी आणि इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन विभागातील विद्यार्थ्यांसाठी करिअर तयारी सत्र: अंतिम वर्षाच्या बी-टेक विद्यार्थ्यांसाठी संज्ञानात्मक प्लेसमेंट इनसाइट्स या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.



या सत्रासाठी शाजिया दलवाले (प्रोग्रामर विश्लेषक प्रशिक्षणार्थी कॉग्निझंट) यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शाजिया यांच्याशी थेट संवाद साधला व त्यांच्या अनुभवातून प्रेरणा घेतली. त्यांच्या सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला व करिअरची दिशा स्पष्ट झाली. उद्योगातील ट्रेंड, नोकरी बाजारातील मागण्या आणि आवश्यक कौशल्यांबद्दल अपडेट राहण्याचा सल्ला दिला. शिकण्यासाठी मोकळेपणा दाखवा, नवीन कामाच्या वातावरणाशी जुळवून घ्या आणि सतत कौशल्य विकास करण्याचे आवाहन केले.

हा कार्यक्रम कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली आणि प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. प्लेसमेंट ऑफिसर प्रा. विकास मराठे प्रा. सूरज धनवे, प्रा. विनायक पालमूर, प्रा. सुनील शाखापुरे, लॅब असिस्टंट ओंकार दिवटे यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम संगणक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता व याचे समन्वयक म्हणून प्रा.सूरज धनवे सर यांनी काम पाहिले. विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरलेल्या या सत्रामुळे प्लेसमेंटसंदर्भातील दिशादर्शन प्रभावीपणे साध्य झाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तेजा शेवाळे आणि वैष्णवी पाटील यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कृषी समृध्दी योजनेद्वारे शेतकरी संकटमुक्त होईल

**तभा वृत्तसेवा । गुरुराज कुलकर्णी,**
**वाळूज,दि २३ जुलै -**

कृषी क्षेत्राला बळकटी देणे आणि हवामान बदलाच्या संकटातून शेतकऱ्यांना मुक्त करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वाकांक्षी २५ हजार कोटी रुपयांची कृषी समृद्धी योजना जाहीर झाली आहे.



यातून पुढील पाच वर्षांत २५ हजार कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक केली जाईल. या योजनेची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाईल आणि त्याची अंमलबजावणी यंदापासून सुरू होणार आहे. हवामान बदल, नैसर्गिक आपत्ती आणि घटत्या उत्पादकतेसारख्या समस्यांमुळे अडचणींना तोंड देणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी परियोजनेच्या धर्तीवर ही नवीन आणि अधिक व्यापक योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढवणे, पीक पद्धती बदलणे आणि हवामान-संवेदनशील शेतीला प्रोत्साहन देणे आहे. योजनेसाठी दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे, या योजनेत आधुनिक तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करताना पाणी व्यवस्थापन आणि सूक्ष्म सिंचन, मृदा आरोग्य व्यवस्थापन आणि जमीन संसाधन विकास, हवामान अनुकूल बहुपीक पद्धतीचा वापर, मूल्य साखळी विकास आणि काढणी पश्चात पायाभूत सुविधा, उपजीविका विविधीकरण आणि संलग्न उपक्रम, संस्थात्मक बळकटीकरण, ज्ञान, संशोधन आणि प्रात्यक्षिक गोदामे, कोल्ड स्टोरेज आणि पॅक हाऊस उभारणीसाठी अनुदान दिले जाईल. डिजिटल शेती, कृषी यांत्रिकीकरण आणि मजबूत मूल्य साखळी तयार करण्यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. **प्राधान्य :** या योजनेत, लहान आणि सीमांत जमीनधारक, महिला शेतकरी, अनुसूचित जाती आणि जमाती आणि अपंग शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. यासोबतच, शेतकरी गट आणि उत्पादक कंपन्यांना देखील प्रोत्साहन दिले जाईल.

**ॲग्रीस्टॅक नोंदणी आवश्यक :** या योजनेचा लाभ घेण्यासाठी, सर्व शेतकऱ्यांकडे 'ॲग्रीस्टॅक' नोंदणी क्रमांक असणे अनिवार्य असेल.

### अनुदानाची तरतूद काय?

'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य ': या योजनेअंतर्गत लाभ 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर वितरित केले जातील. या योजनेंतर्गत भांडवली गुंतवणूक, सिंचन, यांत्रिकीकरण, संरक्षित शेती (शेडनेट, पॉलीहाऊस, मल्चिंग पेपर, क्रॉप कव्हर प्रक्रिया मल्चिंग ,आणि प्रिसिजन फार्मिंग (अचूक शेती) यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश आहे. व मूल्यसाखळी विकास यासाठी अनुदानाची तरतूद केली आहे. विमा संरक्षणासाठी शेतकऱ्यांकडून २ टक्के, १.५ टक्के, ५ टक्के प्रीमियम आकारले जाते, बाकी किंमत शासनाकडून भरली जाते. पिकांच्या क्लस्टर लिस्टमध्ये सहभागी शेती गटांना प्रमुख प्राधान्य मिळणार आहे.

**देखरेख:**
कृषी समृद्धी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीची प्रमुख जबाबदारी योजनेचे स्वरूप ठरवणे, सकारात्मक परिणामांचे मूल्यांकन करणे, जिल्हा स्तरावर उद्दिष्ट्ये निश्चित करणे, निधीचा आराखडा तयार करणे आणि शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासंबंधी तांत्रिक बाबी निश्चित करणे आहे.

शासनाची कृषी समृद्धी योजना ही शेतीच्या पायाभूत सुविधेशी निगडित आहे. यात सूक्ष्म सिंचन, कृषी अवजारे बँक, यांत्रिकीकरण, अन्न प्रक्रिया इत्यादींचा समावेश असेल.यामध्ये हवामान बदल, भांडवली गुंतवणूक, पायाभूत सुविधा, आणि नव्या तंत्रज्ञानाचा प्रसार या माध्यमातून शेतकऱ्यांना सक्षम करणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. यामुळे शेतकऱ्यांना निश्चित सक्षमीकरणासाठी फायदा होणार आहे

**- शुक्राचार्य भोसले,**
**जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी, सोलापूर**

## महत्वाचे...



### मुख्यमंत्री फडणवीस वाढदिनानिमित्त टेंभुर्णीतील शिबीरात १४२ जणांचे रक्तदान

**टेंभुर्णी, दि.२३ जुलै-**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त टेंभूर्णीत भारतीय जनता पार्टीच्या संपर्क कार्यालयात झालेल्या शिबिरात १४२ जणांनी रक्तदान केले. शिबिरात ओ पॉझिटिव्ह, ए, बी व एबी या विविध रक्तगटांचे रक्त संकलित करण्यात आले. या उपक्रमामुळे गरजू रुग्णांसाठी अमूल्य असा रक्तसाठा उपलब्ध झाला आहे. या उपक्रमाचे आयोजन भाजपाचे तालुकाध्यक्ष व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य योगेश बोबडे यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, जयवंत पोळ, नागनाथ वाघे, सतीश नेवसे, औदुंबर भागवत, बाळासाहेब ढगे, अक्षय ढवळे, बंकट देशमुख, नागेश कल्याणी, गौतम कांबळे, शांतीलाल कुटे, सोमनाथ तांबे, संपत मोहिते, अविनाश देशमुख उपस्थित होते.



### वीटच्या काकडे यांना राज्यस्तरीय वृक्ष मित्र पुरस्कार

**करमाळा दि.२३ जुलै-**
वीट तालुका करमाळा येथील दादाश्री फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष काका काकडे यांना राज्यस्तरीय वृक्षमित्र पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार कडा तालुक्यातील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ यांच्यावतीने आयोजित शेतकरी मेळाव्यात प्रदान करण्यात आला. यावेळी लोकप्रिय हवामान अभ्यासक पंजाबराव डक हे उपस्थित होते. काका काकडे हे करमाळा तालुक्यात वृक्ष मित्र म्हणून सर्वपरिचित आहेत त्यांनी आजवर अनेक वृक्षांची लागवड व त्यांचे संवर्धन केले आहे वृक्ष लागवडीचे महत्त्व व काळाची गरज या विषयावर त्यांनी विविध शैक्षणिक संस्थांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांमध्ये जागृती केली आहे.



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त वाशिंबे येथे रक्तदान शिबिर

**करमाळा दि.२३ जुलै-**
वाशिंबे चौफुला (ता. करमाळा) येथे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस वाढदिवसानिमित्त प्रा. रामदास झोळ फाउंडेशन करमाळा यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी वृक्षारोपण करून रक्तदानाची सुरुवात करण्यात आली.या रक्तदानासाठी करमाळा तालुक्यातील विविध गावातील रक्तदाते उपस्थित होते. यावेळी प्रा.रामदास झोळ सरांसह ११० रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिरासाठी तालुक्यातून वाशिंबे, राजुरी, हिंगणी, दिवेगव्हाण, सोगाव, पोथरे घारगाव,पोटेगाव, पाडळी, केम,उमरड जिंती, मांजरगाव, करंजे इत्यादी गावातील लोकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून रक्तदान केले. शिबिरासाठी मेडिकेअर ब्लड सेंटरच्या स्टाफने परिश्रम घेतले.



### लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटीचा पदग्रहण सोहळा

**सोलापूर, दि. २३ जुलै-**
लायन्स इंन्टरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटीचा पदग्रहण सोहळा संपन्न झाला. सुरुवातीस लायन मोहन भूमकर यांनी घंटानाद केले. व्यासपीठावर प्रांताचे लायन एम. के. पाटील (मल्टिपल व्हाईस चेअरमन), रिजन चेअरमन लायन श्रीनिवास कटकुर, झोन चेअरमन लायन मल्लिकार्जुन मसुती, जेष्ठ लायन माजी अध्यक्ष गोविंद लाहोटी माजी अध्यक्ष लायन गंगाप्रसाद बंडेवार उपस्थित होते. सचिवांचा अहवाल सचिव यांनी सादर केले. लायन राजेंद्र शालगर, लायन चन्नबसु माळगे, सचिव राहुल भूमकर याची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ध्वजवंदन लायन राहुल भुमकर यांनी केले. सर्व मान्यवरांचे अध्यक्ष लायन मोहन भुमकर यांनी स्वागत करुन सत्कार केले. सचिवांचा अहवाल लायन राहुल भुमकर यांनी सादर केले. पदग्रहण अधिकारी लायन मल्लिनाथ पाटील यांनी नूतन अध्यक्ष, सचिव, खजिनदार आणि सर्व लायन सदस्यांना गोपनीयतेची शपथ देण्यात आली. डिस्ट्रिक्ट प्रांतपाल लायन डॉ. विरेंद्र चिखले, उपप्रांतपाल लायन राजेंद्र शहा कासवा, माजी प्रांतपाल गण, डिस्ट्रिक्टचे रिजन १, झोन ५ झोन चेअरमन लायन सोमशेखर भोगडे या सर्वाचा संदेश वाचून दाखवण्यात आला.रिजन चेअरमन एम जे एफ लायन श्रीनिवास कटकुर, झोन चेअरमन लायन मल्लिकार्जुन मसुती यांनी आपल्या मनोगतात अध्यक्ष, सचिव, खजिनदार आणि संचालक मंडळास पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिले. तसेच यावेळी सीए अमता चारहजारी व सीए. सचिन हबीब यांना गौरविण्यात आला. नूतन अध्यक्ष लायन मोहन भूमकर यांनी मान्यवरांना भेट वस्तू प्रदान करून अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. आभार सचिव लायन राहुल भुमकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. दिलीप घारे यांना अस्तित्व रंगसाधक पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**
दि. २७ जुलै रविवार रोजी हुतात्मा स्मृती मंदिर सोलापूर येथे अस्तित्व मेकर फाउंडेशनच्या वतीने प्रायोजिक रंगभूमीवर सातत्याने आणि समर्पणाने कार्य करणाऱ्या प्रतिभावान काम करण्यऱ्या व ज्यांनी उत्तम अभिनय, संवादलेखन, दिग्दर्शन आणि नाट्य संवेदनशीलतेच्या प्रत्येक क्षेत्रात ज्यांनी आपली स्वतंत्र छाप सोडली आहे. अशा डॉ. दिलीप घारे यांना यावर्षीचा रंगसाधक पुरस्कार जाहीर झाला आहे, असे अस्तित्व मेकरचे सचिव किरण लोंढे यांनी कळविले आहे



याप्रसंगी पुरस्कार महोत्सवाचे अध्यक्ष संजय सावंत, प्रमुख पाहूणे म्हणून हास्य जत्राचे दिग्दर्शक सचिन गोस्वामी, सिने अभिनेते सचिन गावडे, प्रवीण डाळिंबकर, प्रमुख संयोजक ॲड. मा.बसवराज सलगर, उपनगरीय नाटय परिषदे चे अध्यक्ष मा. विजय सांळूखे, अस्तित्व मेकरफाउंडेशनचे सचिव किरण लोंढे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या पुरस्काराचे हे आठवे वर्ष असून याचे स्वरूप ११००० रू रोख रक्कम, सन्मान चिन्ह, मानपत्र व सोलापूरी वस्तूचे बकेट असे असणार आहे. हा रंगसाधक पुरस्कार निवडण्यासाठी सोलापुरातील ज्येष्ठ रंगकर्मी सुमित फुलमामडी, गोवर्धन कमटम व बसवराज सलगर यांनी निवड समिती सदस्य म्हणून काम पाहिले आहे. उत्तम अभिनय, संवादलेखन, दिग्दर्शन आणि नाट्य संवेदनशीलतेच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपली स्वतंत्र आणि लक्षवेधी छाप पाडली आहे.त्यांची गाजराची पुंगी, ( ७५० प्रयोग), वाजली रे वाजली (५० प्रयोग) ही नाट्यकृती विशेष गाजली. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी चार सिनेनाट्य अभिनेते उपस्थित राहणार असल्याने सोलापुरातील जास्तीत जास्त नाट्यप्रेमीनी उपस्थित राहण्याचे आवाहन महोत्सवाचे अध्यक्ष मा. संजय सावंत, प्रमुख संयोजक बसवराज सलगर व आस्तित्व मेकर फाउंडेशनचे सचिव किरण लोंढे यांनी केले आहे.

## श्रावणमासानिमित्त विरक्त मठ येथे विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ जुलै-**
विरक्तमठ अक्कलकोट येथे श्रावण मासनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण महिना कर्तु बसवलिंगेश्वर समाधीस भक्तांच्या वतीने महारुद्राभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे . या सेवेत विरशैव बांधवांनी सहभागी होऊन सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन म. नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी यांनी केले.



विरशैव लिंगात ट्रस्टी यांच्या माध्यमातून विरक्त मठाचे कार्य सामाजिक हित जोपासून धर्माचा प्रसार करण्याकरिता चालू असते. आध्यात्मिक दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून या मठाची वाटचाल चालू आहे. श्रावण मासनिमित्त कर्तु बसवलिंगेश्वर समाधीस महारुद्राभिषेकासह दररोज सकाळी आठ ते नऊ या वेळेत गुरुपाद पूजा देखील ठेवण्यात आलेली आहे. या सोहळ्यासाठी ट्रस्टी दत्तकुमार साखरे, राजशेखर हिप्परगी, प्रमोद पाटील, आनंद गंदगे, विठ्ठल तेली, शरणू कापसे, बाबुराव रामदे, गौरीशंकर चनशेट्टी यांचे योगदान लाभत आहे.




## विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास धरावी : अभियंता धनशेट्टी


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**
विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान जाणून घेण्याची जिज्ञासा हवी. विद्यार्थ्यांनी नेहमी प्रयोगशील राहिले पाहिजे. का, कसे, कधी आणि कोठे असे त्यांना प्रश्न पडले पाहिजेत. विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास धरावी. विज्ञाननिष्ठ विद्यार्थी हे नवे निर्माण करू शकतात, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी केले.

वालचंद कॉलेज आर्ट ॲन्ड सायन्स येथे दोन दिवसीय ज्ञानवारी कार्यशाळा झाली. कार्यशाळेचे उद्घाटन श्री. धनशेट्टी यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मराठी विज्ञान परिषद विभाग सोलापूर अध्यक्ष व्यंकटेश गंभीर, मनोज क्षिरसागर, वालचंद कॉलेजचे उपप्राचार्य हिप्परगी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी प्रशिक्षक प्रकाश मोडक, अभय यावलकर, सुचिता भिडे, अनघा वक्टे, शुभदा वक्टे, केतन शेलार यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवस प्रशिक्षण दिले. मराठी विज्ञान परिषद कार्यवाह क्रांतीवीर महिंद्रकर यांनी हायड्रोजन वायू तयार करण्याची पद्धत दाखवली. सोडियम हायड्रॉक्साइड व अल्युमिनियम फाईल एकत्र करून हायड्रोजन वायू कसा तयार होतो याचे प्रात्यक्षिक स्फोट करून दाखवले. कार्यशाळेत १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन योगीन गुजर यांनी केले.कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी लॅब असिस्टंट साळुंके, मोरे, कदम यांनी परिश्रम घेतले. सर्व नियोजन हे प्रा. डॉ. एंजल यांनी केले होते.

## हत्तुरे नगर येथे शुक्रवारपासून चरित्रकथेचे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**
हत्तुरेनगर येथील ग्रामदैवत श्री महालक्ष्मी मंदिर येथे श्रावण मासानिमित्त शुक्रवार दि. २५ ते २४ जुलै दरम्यान एक महिनाभर दररोज सायंकाळी साडेपाच ते सात या वेळेत चरित्रकथेचे आयोजन करण्यान आले आहे. श्री महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक श्रीशैल हत्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रावण महिन्यात पुराणाचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. यावर्षी श्री श्रो. ब्र. परमपूज्य पूर्णानंद स्वामीजी सिद्धारूढ मठ बिदर यांच्या रसाळ वाणीतून 'श्री सिद्धारूढ महास्वामीजी यांचे चरित्र ऐकावयास मिळणार आहे. संपूर्ण कर्नाटकात स्वामीजींच्या पुरुणाचे आयोजन होत असते. हत्तुरे नगराच्या पंचक्रोशीतील नागरीकानी श्रवणाचा लाभ घेण्याचे आवाहन समस्त हत्तुरे परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे. पुराणाची वेळ सायंकाळी ५.३० ते ७ वाजेपर्यंत असून श्री महालक्ष्मी मंदिराच्या जवळ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व भक्तगणांनी उपस्थित रहावे. श्रावणमासानिमित्त महिनाभर दरोरज ही कथा होणार आहे.



## पंढरपुरात व्यापारी महासंघाची नवीन रेल्वेगाड्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ जुलै-**
मध्य रेल्वेचे उपमहाव्यवस्थापक प्रतिक गोस्वामी हे बुधवारी (ता.२३) पंढरपूर रेल्वे स्थानकाची पाहणी करण्यासाठी आले असता येथील पंढरपूर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सत्यविजय मोहोळकर यांनी नवीन रेल्वे गाड्या सुरू करण्याची त्यांच्याकडे मागणी केली.या संदर्भात मागणीचे निवेदन देखील व्यापारी महासंघाचे अध्यक्ष मोहोळकर यांनी उपमहाव्यवस्थापक गोस्वामी यांना दिले. यावेळी मोहोळकर यांनी उप महाव्यवस्थापकांना सांगितले की, पंढरपूर रेल्वे स्टेशन वरून दुपारी २.३० नंतर मिरज येथे जाण्यासाठी एकही ट्रेन नाही, रात्री ९.०० ची मिरज रेल्वे गाडी बंद करण्यात आलेली आहे. आठवड्यातून तीन दिवस असणारी पंढरपूर- शिर्डी साईनगर ही ट्रेन देखील बंद करण्यात आली असल्याचेश्री.गोस्वामी यांच्या निदर्शनास आणून दिले. वास्तविक पाहता प्रवाशांचा भरघोस प्रतिसाद असतानाही या ट्रेन बंद केल्याचे सांगून पंढरपूर- मुंबई ही आठवड्यातून तीन दिवस चालणारी ट्रेन पुर्ण सात दिवस चालवावी,तसेच दररोजसकाळी पंढरपूर- पुणे ही नवीन रेल्वेगाडी देखील सुरू करण्याची मागणी त्यांनी यावेळी उप महाव्यवस्थापकांकडे केली.



या बरोबरच पंढरपूर रेल्वे स्टेशनवर वारकरी भाविकांसाठी फ्रुट स्टॉल(विविध फळे) व विश्राम गृह सुरू करण्याची मागणी केली,या मागण्यांची नोंद घेऊन या बाबत लवकरच योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन यावेळी उप महाव्यवस्थापकांनी दिल्याची माहिती व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सत्यविजय मोहोळकर यांनी दिली. यावेळी रेल्वेचे जिल्हा प्रबंधक जोशी, वाणिज्य व्यवस्थापक पाटील,पंढरपूर रेल्वे स्टेशनचे स्टेशन मास्तर कुशाल कुमार मिश्रा आदींसह रेल्वेचे अधिकारी व कर्मचारी देखील उपस्थित होते.



## दिशा व विराज शिंदे यांची जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेस निवड

**सोलापूर, दि.२३ जुलै-**
पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयती शताब्दी निमित्त तालुका स्तरीय निबंध स्पर्धेत गगनगिरी विद्यालय सांगवी तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर येथील विद्यार्थी दिशा विलास शिंदे हिने १७ वर्षाखालील वयोगटात पंढरपूर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विराज विलास शिंदे १४ वर्षाखालील वयोगटात द्वितीय क्रमांक पटकावून यश संपादन करत जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेस निवड करण्यात आली आहे. मुख्याध्यापक अनिल रणदिवे, तालुकास्तरीय स्पर्धेचे आयोजक केंद्रप्रमुख मोरे आणि गटशिक्षणाधिकारी लिगाडे, मार्गदर्शक आदिनाथ ढेकळे आणि सुनील पाखरे, संस्थापक सचिव संभाजी नाना सत्रे आणि सर्व प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## साहित्य आम्हाला अस्वस्थ करणारं हवं : डॉ.वडगबाळकर

### 'मेघदूत' पुरस्कार वितरण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२३ जुलै**
काळ वेगाने बदलतोय. संयम हरवलेली पिढी अनुभवताना साहित्य आणि साहित्यिकांवर मोठी जबाबदारी आहे. कवीने असत्याच्या विरोधात सत्याच्या बाजूने उभे राहण्याचे आवाहन जेष्ठ साहित्यिका डॉ.श्रुती वडगबाळकर यांनी केले.

कवी कालिदास मंडळ बार्शी आयोजित ३३ व्या कालिदास महोत्सवात मेघदूत पुरस्कार वितरण प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. कवयित्री कांचन सावंत यांना 'रंध्रात भिनावा छंद' या संग्रहासाठी, कवयित्री शुभांगी काळे यांना 'प्राजक्त अक्षरांचा' या संग्रहासाठी 'मेघदूत' पुरस्कार व सामाजिक कार्यासाठी वृक्षसंवर्धन समितीस सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह देऊन अतिथींच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रम अध्यक्ष शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी पुरस्कार प्राप्त कवयित्री सावंत, कवयित्री काळे, श्री. काळे, मसापचे अध्यक्ष पां.न. निपाणीकर, नाट्य परिषद अध्यक्ष सोमेश्वर घाणेगावकर, मेघदूतचे परीक्षक डॉ. रविराज फुरडे, सुमन चंद्रशेखर यांनी मनोगत मांडले. यावेळी प्राप्त काव्यसंग्रह बार्शीतील सार्वजनिक वाचनालयांना देण्यात आले. प्रास्ताविक अध्यक्ष रामचंद्र इकारे, सूत्रसंचालन अर्चना देशपांडे-पोळ तर आभार आबासाहेब घावटे यांनी मानले. प्रकाश गव्हाणे, दत्ता गोसावी, शिवानंद चंद्रशेखर, जयसिंग रजपूत, मुकुंदराज कुलकर्णी, शारदा पानगावकर, संतोष जोशी, गिरीश सोनार, सागर कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले.




यावेळी डॉ. चंद्रकांत मोरे, प्रा. प्रमिला देशमुख, डॉ. रजनी जोशी, हरिश्चंद्र पाटील,अतुल सोनिग्रा, बी.आर.देशमुख आदींसह अनेक साहित्य रसिक उपस्थित होते.

## उक्कडगावात बिबट्याचा वासरांवर हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जुलै-**
बार्शी तालुक्यातील उक्कडगाव येथे काल, मंगळवारी दुपारी साडेतीन ते चार वाजण्याच्या सुमारास एका बिबट्याने वासरांवर हल्ला केल्याची घटना घडली आहे. सुरुवातीला हा वाघ असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता, मात्र वन विभागाने हा प्राणी बिबट्या असल्याचे स्पष्ट केले आहे. शेतकरी बिभीषण दराडे यांच्या शेतात ही घटना घडली. दराडे हे आपल्या शेतात गेले असता त्यांना बिबट्याने वासरांवर हल्ला केल्याचे दिसले. इतर जनावरांनी आरडाओरडा केल्याने बिबट्या तिथून पळून गेला, अशी माहिती दराडे यांनी दिली. दराडे यांनी झाडामागे लपून बिबट्याला परतवण्याचा प्रयत्न केल्याचेही सांगितले. या घटनेनंतर ग्रामीण रुग्णालयातील डॉ. बंडगर यांनी घटनास्थळी येऊन वासरांवर प्रथमोपचार केले. तसेच वन विभागाला या घटनेची माहिती देण्यात आली. या घटनेमुळे उक्कडगाव आणि परिसरात पुन्हा एकदा बिबट्याच्या दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



पंढरपूर येथे श्री.संत शिरोमणी नामदेव महाराज व संत जनाबाई यांचा ६७५ वा. संजीवन समाधी सोहळा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आ. प्रशांत परिचारक, मंदिर समितीचे सह अध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर, संत नामदेवांचे वंशज हभप नामदास महाराज आदी उपस्थित होते.



## महत्वाचे...



### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त माढ्यात वृक्षारोपण

**माढा, दि. २३ जुलै-**

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त माढा शहर महिला राष्ट्रवादी काँग्रेस, महात्मा फुले प्रतिष्ठान माढा, प्रियदर्शनी महिला विकास मंडळ आणि सन्मती कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या वतीने माढेश्वरी मंदिर श्री गणेश मंदिर या ठिकाणी १२५ झाडांचे रोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला. माढा नगराध्यक्षा ॲड मीनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, माढा शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा अर्चना राऊत, महात्मा फुले प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक आजिनाथ आप्पा माळी यांच्या हस्ते हे वृक्षारोपण करण्यात आले. माढा नगरपंचायतीच्या वतीने माढेश्वरी मंदिराच्या परिसरात पेविंग ब्लॉक करून परिसर सुशोभीकरण करण्यात आलेला आहे. या परिसरातील प्रमुख मार्गाच्या लगत १५ फूट उंचीचे पाम ट्री, छोटे पाम ट्री, शोभेची झाडे, स्मशानभूमीमध्ये आणि मातंगाई मंदिराच्या परिसरात वड, पिंपळ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर पुजारी, जगदाळे फाऊंडेशनचे अध्यक्ष शिवाजी अण्णा जगदाळे, महात्मा फुले प्रतिष्ठानचे सचिव लक्ष्मण राऊत, नगरसेवक नितीननाना साठे, वादळ ग्रुपचे सचिन साबळे, सन्मती कला क्रीडा मंडळाचे अध्यक्ष महेश गुंड, सावली उद्योग समूहाचे विकास माळी, नगरसेविका सुनिता राऊत, आशा माळी महात्मा फुले युथ फाऊंडेशनचे संग्राम राऊत, सुरज देवकर, सुनीता क्षीरसागर उपस्थित होते.



### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त फळे वाटप

**बार्शी, दि. २३ जुलै-**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बार्शीत सामाजिक उपक्रम राबवून आगळ्या वेगळ्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रम बार्शीतील ग्रामीण रुग्णालय या ठिकाणी पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बार्शी विधानसभा अध्यक्ष सुनील झालटे-पाटील यांच्या विचाराने तर राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस शिरीष ताटे यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सुनिल झालटे-पाटील व शिरीष ताटे हे शहर व तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन कायम अग्रेसर असतात. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवक शहराध्यक्ष मुज्जमिल पठाण, शहर कार्याध्यक्ष सुर्या मस्के, युवक तालुका उपाध्यक्ष समाधान बोबडे, युवक संघटक फैजान सौदागर, रिहान पिंजारी, हुसेन सौदागर, काका गोसावी, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आकाश शिंदे, युवक जिल्हा सरचिटणीस नवाज मुलानी, युवक जिल्हा उपाध्यक्ष समाधान पवार, आकाश वैद्य, सागर पाडुळे, सायरा मुल्ला, बापू चोबे यांनी परिश्रम घेतले.



### महात्मा फुले विद्यालयात लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी

**टेंभुर्णी, दि. २३ जुलै-**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती महात्मा फुले विद्यालयात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि टिळकांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी गौरी नवले, आर्या लोकरे, यशवर्धन खटके, संस्कार देवकर या विद्यार्थ्यांनी टिळकांविषयी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख गगन गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सूत्रसंचालन गोडसे यांनी केले, तर आभार नागनाथ सुक्रे यांनी केले. कार्यक्रमास मुख्याध्यापक शोएब बागवान, उपमुख्याध्यापक शरद सातव, सोहम व्यवहारे, अश्विनी कांबळे,मनीषा शिंदे, वंदना क्षीरसागर, सायली गिरमे, पल्लवी आरकिले, मंगल नाईकनवरे उपस्थित होते.

### पैशाची बॅग, पोलिसांनी दोन तासात शोधली

**बार्शी, दि. २३ जुलै-**

तालुक्यातील वैराग पोलिसांनी हरवलेल्या सुमारे एक लाख रुपये रोख रकमेची बॅग आणि दुकानाच्या चाव्या अवघ्या दोन तासांत शोधून काढून, नागरिकांकडून कौतुकाची थाप मिळवली आहे. वैराग येथील मोहोळ चौकातील व्यावसायिक निरंजन नवीनचंद गांधी यांना ही बॅग परत मिळाली असून, वैराग पोलिसांच्या जलद कामाबद्दल त्यांचे कौतुक होत आहे १९ जुलै रोजी रात्री अकराच्या सुमारास निरंजन गांधी त्यांचे सिमेंटचे दुकान बंद करुन, दुकानातील एक लाख रुपये रोख रक्कम असलेली बॅग आणि दुकानाच्या चाव्या घेऊन त्यांचे मित्र अमोल कासार, अमजद शेख आणि अरुण साखरे यांच्यासोबत त्यांच्या जनावरांच्या गोठ्यात चारा-पाण्याची सोय करण्यासाठी बसले होते.

## राज्यातील पहिल्या 'व्हीआर' दर्शन सुविधेचे उद्घाटन

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ; गॉगलद्वारे दिसणार देवाची रूपे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ जुलै -**

येथील विठ्ठलाची महापूजा आणि विविध रुपे सर्वसामान्य भाविकांना अल्प दरात पाहता यावीत यासाठी विठ्ठल मंदिरात व्हिआर गॉगलद्वारे देवाची विविध रूपे आता देशभरातील भाविकांना पाहायला मिळणार आहेत. राज्यात पहिल्यांदाच श्री विठ्ठल मंदिरात या सुविधेचा शुभारंभ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी विठ्ठल मंदिरात करण्यात आला.



यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, अध्यात्मिक आघाडीचे तुषार भोसले, मंदिर समिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मंदिर समिती सदस्य माधवीताई निगडे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, संभाजी राजे शिंदे, शकुंतला नडगिरे आदी मान्यवर उपस्थित होते. यापूर्वी देवाचे श्री सिक्सटी डिग्री मधील आभासी दर्शन व्यवस्था देशातील उज्जैन आणि काशी विश्वेश्वर या नामवंत मंदिरात सुरू आहे.



महाराष्ट्रात पहिल्यांदाच ही सुविधा सुरू करण्याचा मान विठ्ठल मंदिराने मिळविला असून मंदिर समिती आणि व्हर्च्युअल वर्ल्ड यांच्या संयुक्त विद्यमाने ही सुविधा आता मंदिर समितीचे भक्तनिवास व शहरात इतर ठिकाणी देशभरातील भाविकांना पाहता येणार आहे. विठुरायाच्या महापूजा करण्याची इच्छा हजारो भाविकांना असते मात्र अत्यंत मर्यादित पूजा संख्या असल्याने दरवर्षी या भाविकांना नाराज व्हावे लागते. मात्र आता या व्हीआर दर्शन माध्यमातून डोळ्यावर व्हीआर गॉगल घातलेल्या प्रत्येक भाविकाला अगदी विठ्ठल मंदिराच्या गाभाऱ्यात उभारून पूजा पाहण्याचा आभासी अनुभव घेता येणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या सुविधेचा बुधवारी शुभारंभ केला असून आता भाविकांसाठी हे दर्शन अत्यल्प दरात खुले झाले आहे. यासाठी या दर्शनाचा अनुभव घेणाऱ्या भाविकाला प्रत्येकी दोनशे रुपयांमध्ये ही विठुरायाची महापूजा आभासी पद्धतीने पाहता येणार आहे. हजारो भाविकांना विठ्ठलाच्या महापूजेसाठी प्रयत्न करूनही पूजेचा नंबर लागत नाही.त्यामुळे आता या भाविकांना पुजेचा हा आनंद घेता येणार असल्याचे मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.

## बार्शीत भाजपा शिबिरात १ हजार जणांचे रक्तदान

**बार्शीत विक्रमी रक्तदान करून राष्ट्रभक्तीचा संदेश**

**मुख्यमंत्री फडणवीस यांचा वाढदिवस साजरा**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी बार्शी शहर व तालुका यांच्यावतीने आयोजित महासंकल्प रक्तदान शिबिरात विक्रमी १०१५ रक्तदात्यांनी रक्तदान करुन रक्तातून राष्ट्रभक्ती अशा अनोख्या संकल्पनेतून मुख्यमंत्र्यांना शुभेच्छा दिल्या.

शिबिराचे उद्घाटन मा. आमदार राजाभाऊ राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष आसिफ तांबोळी, रमेश पाटील, प्रशांत कथले, विलास रेणके,अरुण कापसे, सुधीर बारबोले, दशरथ जगताप, विजय राऊत, कुंडलिक गायकवाड, कौरव माने, कुमार डमरे, बाळासाहेब मोरे, रावसाहेब मनगिरे, विजय



गरड, ॲड. राजश्री डमरे, भाजपचे शहराध्यक्ष महावीर कदम, रणवीर राऊत उपस्थित होते.

या महासंकल्प शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रचंड प्रतिसाद दिला. शिबिरास भाजपा सोलापूर पश्चिम जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत व भाजपा सोलापूर शहर अध्यक्षा रोहिणीताई तडवळकर यांनी सदिच्छा भेट दिली.

महासंकल्प रक्तदान शिबिरामध्ये एकूण १०१५ रक्तदात्यांनी विक्रमी असा सहभाग नोंदवला. महासंकल्प रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पार्टी बार्शी शहर व तालुक्याचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व भगवंत रक्त पेढीच्या स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.

## सोने, पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जुलै -**

सोने, पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह सहा जणांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रियंका राजू बनसोडे (वय २३, रा. कन्ना नगर, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती राजू, सासरे केशव, सासू संगिता, दीर विशाल, नणंद लक्ष्मण सोनकांबळे (सर्व रा. ६३, संगिता निवास, लेन नं. ३, लोहगाव, पुणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ जानेवारी २०20 ते २८ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रियंका या पती राजू याच्यासोबत सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती



राजू व त्याच्या घरातील लोकांनी प्रियंका हिस घरातील लहान सहान कारणावरून टोमणे मारून, शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच माहेरून पैसे व सोने घेऊन ये नाही तर तुला घटस्फोट देऊन राजूचे दुसरे लग्न करून देऊ असे म्हणून दमदाटी करून प्रियंकाचा शारीरीक व मानसिक छह करून वैवाहिक जीवन धोक्यात आणले आहे. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार वाघमारे पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेत पादचारी जखमी

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

घरासमोर पायी चालताना दुचाकीस्वाराने धडक दिल्याने पादचारी जखमी झाला. हा अपघात मंद्रुप (ता. दक्षिण सोलापूर) येथे २० जुलैच्या रात्री दहाच्या सुमारास घडला. सोम शंकर इरण्णा नंदुरे (वय ३६, रा. मंद्रुप) असे जखमीचे नाव आहे. सोमशंकर हा मंद्रुप येथील त्याच्या घराच्या समोर फिरत होता. त्यावेळी अचानक दुचाकीस्वाराने त्याला धडक दिली. यात डोक्याला आणि पायाला मुकामार लागल्याने २२ जुलै रोजी शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## सोलापूर शहर-जिल्ह्यात सर्वदूर संततधार


**खरिपाच्या पिकाला अमृतसंजीवनी**

**जिल्ह्यात 'मे' च्या १५ दिवसात २३० मि.मी.**

**'जून-जुलै'ला अवघा ६५ मि.मी. पाऊस!**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

राज्यात सध्या जोरदार पाऊस सुरु आहे. मुंबई उपनगरात संततधार तर विदर्भात ढगफुटीसारखा पाऊस पडत आहे. यामुळे अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली असून, रस्ते बंद झाले आहेत आणि काही भागात जीवितहानी झाली आहे. दरम्यान, २ दिवसांपासून सोलापूर शहर-जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे शेतीला दिलासा मिळाला आहे. खरिपातील पिकांनी अक्षरश: माना टाकल्या



होत्या; अशा पिकांना हा पाऊस अमृतसंजीवनीच ठरला असून, शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मे महिन्याच्या अवघ्या १५ दिवसात जिल्ह्यात २३० मिमी असा ऐतिहासिक पाऊस झाला तर जून-जुलै महिन्यात अवघ्या ६५ मिमीची नोंद झाली, हे विशेषच आहे.

राज्यात सध्या पावसाचा हाहा:कार पाहायला मिळत आहे. सध्या संपूर्ण राज्यात मान्सून सक्रिय झाला आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सोलापूर शहरातही आज दिवसभर पावसाची रिपरिप असल्याने संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले. शालेय विद्यार्थी अन् चाकरमान्यांचेही हाल झाले. तर वाहनधारकांना वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागली. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात मंगळवारी रात्रीपासून अधूनमधून पाऊस पडत आहे. यामुळे शहरातील सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. सध्या काळ्या ढगांनी आकाश भरून आले असून, आजही पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, पावसाच्या अनियमिततेमुळे राज्यातील बळीराजा मात्र कमालीचा अडचणीत येत आहे.

### आजतागायत तालुकानिहाय पाऊस

उत्तर सोलापूर तालुक्यात ६६.१ मिमी, दक्षिण सोलापूर ९०.७, बार्शी ७७.५, अक्कलकोट ७४.९, मोहोळ ५६.०, माढा ५२.५, करमाळा ४३.८, पंढरपूर ३५.५, सांगोला ६६.९, माळशिरस ७५.१ आणि मंगळवेढा तालुक्यात ७९.८ मिलीमीटर पाऊस नोंदला गेला आहे. तर जिल्ह्यातील सरासरी पाऊस ६४.९ मिमी इतका नोंदला आहे. पुणे विभागात सरासरी पाऊस २२१.२ मिमी इतका पडला आहे. गतवर्षी सोलापूर जिल्ह्यात या दोन महिन्यात २२७.८ मिमी इतका नोंदला होता; त्या तुलनेत यंदाचा या दोन महिन्यातला पाऊस कमीच आहे.

## पंढरीतून विठ्ठलाची पालखी आली अरणच्या मळ्यात

**संत सावता माळी यांचा ७30 वा संजीवन समाधी सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २३ जुलै-**

कर्तव्य आणि कर्म करीत राहणे हीच खरी ईश्वरसेवा अशी प्रवृत्तिमार्गी शिकवण देणारे संत सावता माळी यांचा ७३० वा पुण्यतिथी सोहळा बुधवारी (दि. २३) रोजी श्री क्षेत्र अरण (ता. माढा) येथे झाला. संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त महापूजा व महाआरती पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सपत्नीक झाली. पहाटे आ. अभिजित पाटील यांच्या हस्ते समाधी अभिषेक पार पडला. सकाळी दहा ते बारा श्रीसंत तुकाराम महाराजांचे वंशज श्रीगुरू बाळासाहेब महाराज देहूकर यांचे समाधी सोहळ्याचे कीर्तन होऊन पुष्पवृष्टी सोहळा पार पडला.

यावेळी आ. योगेश टिळेकर उपस्थित होते. श्री विठ्ठल हेच त्यांचे परम दैवत होते. कधीही पंढरपूरला गेले नव्हते. प्रत्यक्ष विठ्ठल-रुक्मिणी स्वतः संत सावता माळी यांना भेटण्यासाठी येतात, अशी पुण्यतिथी



सोहळ्याची आख्यायिका आहे. श्री विठ्ठल आणि संत सावता महाराज यांच्या पालखीची भेट संजीवन समाधी मंदिरात बुधवारी झाली. पुष्पवृष्टी नंतर महाआरती झाली. मंगळवारी सायंकाळी श्री विठ्ठल पालखीचे अरण शिवारात वाजत गाजत स्वागत झाले. संत सावता महाराजांच्या मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली. पालखी भेटीनंतर दुपारी समाधी सोहळा झाला. पुष्पवृष्टी सोहळा पाहण्ययाकरिता एलईडी स्क्रीन लावण्यात आली होती. त्यानंतर आज श्रीफळ हंडी सोहळा होणार आहे. उद्या शुक्रवार (दि.२५) जुलै रोजी ग्रामप्रदक्षिणा होईल, तर शनिवार (दि. २६) पालखीचा परतीचा प्रवासाला निघेल.



### आज श्रीफळ हंडी सोहळा

पंढरपूर येथून काशी कापडी समाजाच्या मठातून श्री विठ्ठलाच्या पालखीचे अरणकडे सोहळ्याने प्रस्थान केले होते. तीन दिवस विठ्ठलाची पालखी अरणमध्ये मुक्कामी असते. पुण्यतिथी सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी मंदिराच्या समोर श्रीफळ हंडी वाढवण्यात येते. गुरुवारी (दि. २४) सायंकाळी सहा वाजता देहूकर महाराजांच्या हस्ते श्रीफळ हंडी वाढवण्यात येईल.

आषाढी सोहळ्यानिमित्त सर्व संतांच्या पालख्या पंढरपूरला जातात. मात्र स्वतः पांडुरंग अरण (ता. माढा) येथील संत शिरोमणी सावता महाराज यांच्या भेटीस येतात आणि तीन दिवस मुक्कामी असतात, अशी आख्यायिका आहे. यामध्ये संत सावता महाराज यांची पालखी पुढे व श्री पांडुरंगाची पालखी पाठीमागे, यात संत सावता महाराज श्री विठ्ठलाला भक्तीचा मळा दाखवितात, अशी आख्यायिका आहे. महाराष्ट्रातून शेकडो दिंड्या, पालख्यांचा वैष्णव मेळावा पंढरपुरात आषाढीला हजेरी लावतात. परंतु कर्मयोगी सावता महाराजांच्या समाधी सोहळ्याला प्रत्यक्ष परमात्मा विठ्ठल धावून आल्याने सावता महाराजांनी पेरलेला भक्तीचा मळा भाविकांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही फुलून गेला होता. मंदिरात सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्याची सांगता उद्या गुरूवारी श्रीफळहंडीने होणार आहे.

### पालकमंत्री गोरे, आ. पाटील, आ. टिळेकर यांची उपस्थिती

संत सावता महाराज संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त शासकीय पूजा पहाटे अभिषेक आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते तर सकाळी १० वाजता महाआरती सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार गोरे व सौ. सोनियाताई गोरे यांच्या हस्ते पार पडली. दुपारी समाधी मंदिरात कीर्तन व पुष्पवृष्टी झाली. या वेळी संत सावता क्रांती परिषदेचे अध्यक्ष योगेश टिळेकर, सावतेबुवा महाराज देवस्थानचे अध्यक्ष ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल गाजरे, सचिव ॲड. विजय शिंदे, भारत शिंदे, शिवाजी कांबळे, सावता महाराज वसेकर उपस्थित होते.

महत्त्वाचे

### लॉईड, इंजिनीअर यांचा सन्मान




ओल्ड ट्रॅफर्ड येथे आपल्या नावाच्या स्टॅण्डसमोर उभे असताना फारुख इंजिनिअर, क्लाईव्ह लॉईड, अँण्डी अँसन व अन्य

**मॅन्चेस्टर** : लॅंकेशायर क्लबने बुधवारी सकाळी एमिरेट्स ओल्ड ट्रॅफर्ड येथे जुन्या बी स्टॅण्डचे नाव बदलून दोन दिग्गज क्लाईव्ह लॉईड आणि फारुख इंजिनियर यांचे नाव देऊन त्यांच्या योगदानाचा गौरव केला. आम्ही आमच्या भूतकाळाचा अधिक चांगल्या प्रकारे सन्मान करण्यासाठी आणि साजरा करण्यासाठी सतत मार्ग शोधत असतो आणि सर क्लाईव्ह लॉईड व फारुख इंजिनिअर या दोघांसाठीही त्यांच्या नावाने एमिरेट्स ओल्ड ट्रॅफर्ड येथे स्टॅण्ड असणे योग्य आहे असे आम्हाला वाटले, असे. लॅंकेशायरचे अध्यक्ष अँण्डी अँसन म्हणाले. मी क्लब पाहत असताना हे दोन्ही खेळाडू माझे क्रिकेटचे हिरो होते. मला आठवते की ते दोघेही १९७१ मध्ये ओल्ड ट्रॅफर्डला माझ्या पहिल्या सामन्यात खेळले होते. १९७० च्या दशकात, एका प्रचंड यशस्वी लॅंकेशायर संघाचे प्रमुख भाग म्हणून सर क्लाईव्ह आणि फारुख यांच्या माझ्या अविश्वसनीय आठवणी आहेत, असे ते म्हणाले.

# भारताची दमदार सुरुवात

## यशस्वी जयस्वालचे अर्धशतक



यशस्वी जयस्वाल : चेंडू १०७, चौकार १०, षट्कार १

◆ **मॅन्चेस्टर, २३ जुलै**

ओल्ड ट्रॅफर्डवर बुधवारपासून इंग्लंडविरुद्ध खेळल्या जात असलेल्या अॅण्डरसन-तेंडुलकर चषक कसटी मालिकेतील चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताने आपल्या डावाची झकास सुरुवात केली. सलामीवीर यशस्वी जयस्वालचे (५८) अर्धशतक व त्याने केएल राहुलसोबत केलेल्या ९४ धावांच्या दमदार भागीदारीच्या बळावर भारताने चहापानापर्यंत ५२ षटकांत ३ बाद १४९ धावांपर्यंत मजल मारली. खेळ थांबला तेव्हा साई सुदर्शन नाबाद २६ धावांवर तर ऋषभ पंत नाबाद ३ धावांवर खेळ होते.

सध्या मालिकेत १-२ ने पिछाडीवर असलेल्या भारताने डावाची सुरुवात चांगली केली. जयस्वाल व केएल राहुलने इंग्लंडच्या गोलंदाजांना संयमाने प्रत्युत्तर देत उपहारापर्यंत भारताला २६ षटकांत बिनबाद ७८ धावांवर पोहोचवले, त्यावेळी जयस्वाल (३६) व राहुल (४०) दोघेही अर्धशतकाच्या मार्गावर होते. भारताने ३३.३ षटकांत १०० धावांचा टप्पा गाठला.

राहुल ख्रिस वोक्सच्या गोलंदाजीला बळी पडला. राहुलने क्रॉलीच्या हातात झेल सोपवला. केएल राहुलने ९८ चेंडूंचा सामना करत ४ चौकारांच्या मदतीने ४६ धावांचे योगदान दिले, त्याचे केवळ चार धावांनी अर्धशतक हुकले. यशस्वी जयस्वालने ९६ चेंडूंत ९ चौकार व एका षट्काराच्य मदतीने आपल्या ५० धावा पूर्ण केल्या. हे त्याचे ११ वे कसोटी अर्धशतक ठरले.डावसनच्या चेंडूवर बचावात्मक खेळण्याच्या प्रयत्नात जयस्वालचा स्लीपमध्ये झेल उडाला व ते हॅरी ब्रुकने सहजपणे पकडला. यशस्वी जयस्वालने १०७ चेंडूंत १० चौकार व एका षट्कारसह ५८ धावांची खेळी केली.

पुढे साई सुदर्शन व कर्णधार शुभमन गिल या जोडीकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती, मात्र इंग्लंडच्या बेन स्टोक्सने गिलला हेरले. कर्णधार स्टोक्सने भारतीय कर्णधार शुभमन गिलला पायचित करून तंबूत परत पाठविले. गिलने २३ चेंडूंत केवळ १२ धावांची भर घातली. साई सुदर्शनला साथ देण्यास दुखापतीतून सावरलेल ऋषभ पंत मैदानावर आला. या दोघांनी चहापानापर्यंत भारताला ५२ षटकांत ३ बाद १४९ धावांचा टप्पा गाठून दिला. चहापानापर्यंत इंग्लंडकडून ख्रिस वोक्स, बेन स्टोक्स व लियाम डावसनने प्रत्येकी १ बळी टिपला.

**अंशुल कंबोजचे कसोटी पदार्पण**

इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने सलग चौथ्या सामन्यात नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. भारताने आपल्या अंतिम एकादशमध्ये तीन बदल केले, त्यापैकी दोन सक्तीने केले आणि हरयाणा व चेन्नई सुपर किंग्जचा वेगवान गोलंदाज अंशुल कंबोजला कसोटी पदार्पणाची संधी दिली.

पहिल्या तीन कसोटींमध्ये ४० धावा पार करण्यात अपयशी ठरल्यानंतर करुण नायरची जागा साई सुदर्शनने तिसऱ्या क्रमांकावर घेतली आहे, तर जखमी नितीश कुमार रेड्डी व आकाश दीपच्या जागी अनुक्रमे शार्दुल ठाकूर व अंशुल कंबोजला स्थान देण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

# भारतीय महिलांचा इंग्लंडवर मालिका विजय

## सामनावीर व मालिकावीर हरमनप्रीत कौर




वन-डे मालिका विजयाच्या चषकासह आनंद साजरा करताना भारतीय महिला क्रिकेटपटू

◆ **चेस्टर-ले-स्ट्रीट, २३ जुलै**

कर्णधार हरमनप्रीत कौरने पुन्हा एकदा झळकावलेल्या शानदार शतकाच्या जोरावर भारताने इंग्लंडविरुद्धचा तिसरा महिला एकदिवसीय सामना १३ धावांनी जिंकला आणि वन-डे मालिका २-१ अशी जिंकली.

हरमनप्रीतच्या ८४ चेंडूत १०२ धावा व जेमिमाह रॉड्रिग्जच्या (४५ चेंडूंत ५० धावा)) वेगवान अर्धशतकाच्या आधारावर भारतीय महिला संघाने ५ बाद ३१८ धावांची आव्हानात्मक धावसंख्या उभारली, त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी संपूर्ण इंग्लंड संघाला ४९.५ षटकांत ३०५ धावांत गुंडाळले.

आपला केवळ चौथा वन-डे सामना खेळणारी तरुण गोलंदाज क्रांती गौडने ५२ धावांत ६ बळी टिपण्याची किमया केली, तर डावखुरी फिरकी गोलंदाज श्री चरणीने ६८ धावांत २ बळी टिपण्यात यश मिळविले. शतकवीर हरमनप्रीत कौर सामनावीर पुरस्काराची मानकरी ठरली.

या मालिका विजयाबरोबरच भारतीय महिला संघाचा एक संस्मरणीय दौरा आटोपला. यापूर्वी भारताने पाच सामन्यांची टी-२० मालिका ३-२ अशी जिंकली.

३६ वर्षीय भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने पहिल्या दोन सामन्यात जास्त धावा केल्या नाहीत, पण व-डे क्रिकेटमध्ये तिने आपले सातवे शतक पूर्ण केले. हा सामना देखील विशेष होता, कारण तिने आपल्या १४९ व्या महिला एकदिवसीय सामन्यांत ४००० धावा पूर्ण केल्या. या खेळीमुळे भारताला इंग्लंडविरुद्धचा दुसरा सर्वोच्च एकदिवसीय धावसंख्या उभारता आली, परंतु सप्टेंबर २०२२ मध्ये कॅन्टरबरी येथे नोंदवलेला या प्रतिस्पर्ध्याविरुद्धचा त्यांचा सर्वोच्च ५ बाद ३३३ धावसंख्या कोणत्याही टप्प्यावर धोक्यात आला नाही. त्या सामन्यातही हरमनप्रीतने शतक झळकावले होते. स्मृती मंधाना व प्रतीका रावल यांच्यात ६४ धावांची मजबूत सलामी भागीदारी होती. मंधानाने ५४ चेंडूत ५ चौकारांसह ४५ धावा केल्या. ◂(वृत्तसंस्था)

# संयुक्त सचिव बलजित सेखोन निलंबित

## जागतिक विद्यापीठ क्रीडा घोटाळा प्रकरण

◆ **नवी दिल्ली, २३ जुलै**

भारतीय विद्यापीठ संघटनेने (एयूआय) आपले संयुक्त सचिव बलजित सिंग सेखोनला निलंबित केले आहे. जर्मनीतील राइन-रुहर येथे सुरू असलेल्या जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत निवड झालेल्या १२ पैकी ६ भारतीय बॅडमिंटनपटूंचे अर्ज योग्यरीत्या न भरल्यामुळे त्यांना स्पर्धेतून बाहेर काढण्यात आले. त्यामुळे पदक जिंकू शकणारे सहा खेळाडू स्पर्धेपासून वंचित राहिले. निवडक खेळाडूंना सहभागी न होण्याच्या 'गैरव्यवस्थापन' ची चौकशी करण्यासाठी तीन सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.

१६ जुलै रोजी व्यवस्थापकांच्या बैठकीत भारतीय अधिकाऱ्यांनी सर्व नावे योग्यरित्या सादर न केल्याने निवडलेल्या १२ खेळाडूंपैकी सहा खेळाडूंना सहभागी होण्यापासून रोखण्यात आल्याचे उघडकीस आल्यानंतर कांस्यपदक विजेत्या भारतीय बॅडमिंटन संघ वादात सापडला. तथापि, (विद्यापीठ क्रीडा आंतरराष्ट्रीय संस्था) सोबतच्या वाटाघाटींनंतर आंतरराष्ट्रीय विद्यापीठ क्रीडा महासंघाने सांगितले की, संघातील सर्व १२ सदस्यांना पदके आणि प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

रोहन कुमार, दर्शन पुजारी, अदिती भट्ट, अभिनाश मोहंती, विराज कुवळे आणि अलिशा खान हे १२ सदस्यीय संघाचा भाग होते, परंतु त्यांना खेळण्याची संधी मिळाली नाही.

अधिकाऱ्यांनी पुष्टीकरण यादी सादर करण्यात उशिरा बदल केल्यामुळे तिचे नाव गायब झाले, म्हणून मी स्पर्धा करू शकली नाही, असा आरोप देवयानीने केला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# एमसीए ड संघाच्या ६ बाद ८३ धावा

## २३ वर्षाखालील मुलांचे राज्य संघ निवड चाचणी क्रिकेट सामने

### दुसऱ्या दिवशी पावसामुळे दोन्ही सामन्यात केवळ २९ षटकांचा खेळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेच्या सौजन्याने येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम आणि दयानंद कॉलेज मैदानावर राज्यातील २३ वर्षाखालील मुलांसाठीच्या संघ निवडीसाठी ३ दिवसीय क्रिकेट साम न्यांच्या दुसऱ्या फेरीत दुसऱ्या दिवशी आदल्या रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे दोन्ही सामन्यात केवळ २९ षटकांचा खेळ झाला. पार्क स्टेडियमवर पावसाचे पाणी निघून जाण्याची उत्तम सोय असल्याने तसेच ग्राउंड स्टाफ चे मोलाचे प्रयत्न मुळे सकाळी १०:१५ सामने चालू झाल्यावर सुद्धा मध्ये मध्ये आलेल्या पावसाने खेळात अडथळा आणल्याने केवळ २९ षटके चाच खेळ झाला.



दयानंद कॉलेज मैदानावर तर केवळ १ षटक च झाले असता पुन्हा पाऊस आल्याने दिवसाचा खेळ रद्द करावा लागला तर पार्क स्टेडियमवर कालच्या १ षटक नजर पुढे खेळताना ड संघाने जेवणाला खेळ थांबला तेव्हा ५ बाद ७५ धावा केल्या होत्या. त्यानंतर पाऊस आला आणि पुन्हा खेळ सुरु झाला व ६ षटके झाल्यावर पुन्हा पावसाला सुरुवात झाली तेंव्हा ६ बाद ८३ झाल्या होत्या, ड संघ अद्यापि ३२२ धावांनी पिछाडीवर असून उद्या तिसऱ्या सकाळी लवकर खेळ चालू होणार आहे.

पंच म्हणून नंदकुमार टेळे पृथ्वीराज गांगजी नवीन माने चिराग शहा हे तर गुणलेखक म्हणून मिलिंद गोरे, प्रसाद शावंतुल हे काम पाहत आहेत.

**संक्षिप्त धावफलक :**

**✻ इंदिरा गांधी पार्क स्टेडियम**

एमसीए बी (१) : ४०५/१० (७४.२)
एमसीए डी(१) : ८३/६ (२८.४)
अभिषेक जोशी २७, ओम भाभड २५, अशकान काझी ११
श्रेयस चव्हाण प्रथमेश गावडे प्रत्येकी २ बळी,
अथर्व चौधरी सोहन जमाले प्रत्येकी १ बळी.

**✻ दयानंद कॉलेज ग्राउंड**

एमसीए ए(१) : ५२/२ (१६)

# अण्णा इलेव्हन विजेता; देवेंद्र चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

देवेंद्र चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत अण्णा इलेव्हन संघाने विजेतेपद पटकाविले. जी. एस. हराळवाडी संघाने उपविजेतेपद तर लेजंड एलेव्हन संघाने तृतीय स्थान मिळविले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दीपक सुरवसे यांनी कर्णिकनगर येथील स्वर्गीय लिंगराज वल्याळ क्रीडांगणावर आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये आठ संघामध्ये लीग पद्धतीने सामने आले. अंतिम सामना अण्णा इलेव्हन विरुद्ध जी एस हराळवाडी या संघात झाला. प्रथम फलंदाजी करताना जी एस हराळवाडी संघाने ७ षटकात ७ बाद १११ धावा केल्या. यात प्रथमेश राठोडने ६५, विवेक चव्हाण ३१ धावा केल्या. गोलंदाजीमध्ये अण्णा इलेव्हनकडून कृष्णा गवळीने ३ तर अतुल चौधरी २ गडी बाद केले. धावसंख्येचा पाठलाग करताना अण्णा इलेव्हन क्रिकेट संघाने ४.१ शतकात ३ बाद ४८ धावा केल्यानंतर मैदानावर जोरदार पाऊस झाला. त्यानंतर बॉल आऊटची स्पर्धेतही बरोबरी झाली. अखेर नाणेफेकीच्या कौलावर अण्णा इलेव्हन क्रिकेट बाजी मारली. बक्षीस वितरण दीपक सुरवसे, नागेश कोकरे, जानराव, शैलेश लोंढे, राजू शिंदे, सुनील शिंदे, जफर शेख, सोन्याबापू भोसले आदींच्या उपस्थितीत झाले. विजेत्या, उपविजेत्या व तृतीय संघास अनुक्रमे ५१, २१ व ११ हजार एकशे ११ रुपयांचे पारितोषिक व करंडक देण्यात आले.



**वैयक्तिक पारितोषिके**

फलंदाज : प्रथमेश राठोड १४५ धावा, गोलंदाज : सनी पोळ ९ गडी, मालिकावीर : प्रथमेश राठोड १४५ धावा व ३ बळी, अंतिम सामनावीर : सौरभ सिद्धे नाबाद ३२ धावा

स्पर्धा समिती म्हणून शैलेश लोंढे राजू शिंदे सुनील शिंदे रवी बंदपट्टे विकास धोत्रे जफर शेख साथी यांनी काम पाहिले. स्पर्धेचे पंच म्हणून मोहसीन मुल्ला, राधे, वरुण बुर्ला स्वप्निल इंगळे व गुणलेखक म्हणून गुणलेखक व स्कोरर साईराज पवार, समालोचक शंकर पवार यांनी काम पाहिले.

# अजितदादा चषक जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेस उस्फूर्त प्रतिसाद



### ईच्छा भगवंताची परिवार आयोजित स्पर्धेत ७०० पुरुष तर २०० महिला खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

अजितदादा चषक जिल्हा अजिंक्यपद मॅटवरील कबड्डी स्पर्धेस उस्फूर्त प्रतिसाद मिळाला असून यात ७०० पुरुष व २०० महिला खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. ही स्पर्धा पाच दिवस चालणार असून सर्व सामने व अंतिम सामना शंकर भवन उदय विकास प्रशाला शेजारी भूषणनगर लिमयेवाडी येथे होणार आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त इच्छा भगवंताची सामाजिक बहुउद्देशीय संस्था व नगरसेवक तथा प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ही स्पर्धा आयोजित केली आहे. रामवाडी परिसरातील शासकीय गोदाम जवळील जांबवीर तरुण मंडळ क्रीडांगण येथे या स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत दायमा, माजी नगरसेवक तौफिक शेख, देवेंद्र भंडारे, अल्पसंख्याक आयोग सदस्य वसीम बुरहान, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव इरफान शेख, मोची समाजाचे अध्यक्ष करेप्पा जंगम, सिद्राम कामाटे, राष्ट्रवादी सोशल मीडिया अध्यक्ष वैभव गंगणे, नवयोग तरुण मंडळाचे अध्यक्ष अर्जुन साळवे, लक्ष्मण सरवदे राजू आसादे, महादेव हुच्चे, मारुती दिवटे, कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह मदन गायकवाड, संतोष जाधव, कबड्डी निरीक्षक गिरीश जाधव मेंबर, स्वाती पुंजाळ आदींच्या उपस्थितीत झाले. कबड्डी खेळाला गतवैभव प्राप्त व्हावे या उद्देशाने सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यस्तरीय आंतरराष्ट्रीयस्तरीय खेळाडू तयार व्हावेत या दृष्टीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे किसन जाधव यांनी सांगितले.

# हम्पी-दिव्याची उपांत्य फेरीतील सलामी लढत बरोबरीत

### फिडे महिला विश्वचषक

**बटुमी, २३ जुलै-**

भारतीय बुद्धिबळ स्टार कोनेरू हम्पी आणि दिव्या देशमुखने फिडे महिला विश्वचषक २०२५ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत चांगली सुरुवात केली. या दोघांनी उपांत्य फेरीतील पहिल्या सामन्यात आपापल्या चीनच्या प्रतिस्पर्ध्यांना बरोबरीत रोखले.



काळ्या तुकड्यांसह खेळणाऱ्या हम्पीने चीनच्या टिंगजी लेईला आरामात बरोबरीत रोखले, तर दिव्याने तिच्या भक्कम बचावाने माजी विश्वविजेत्या झोंगी टॅनला निराश केले. या सामन्याच्या रिटर्न लेगमध्ये आता दोन्ही भारतीयांना पांढऱ्या तुकड्यांसह खेळण्याचा फायदा मिळेल. दुसरा उपांत्य सामना बुधवारी होणार आहे. जर दोन शास्त्रीय सामन्यांनंतर गुणांची बरोबरी राहिली, तर उपांत्य फेरीतील खेळाडू जलद टाय-ब्रेक सामन्यां ध्ये जातील, जे एक दिवसानंतर होतील. या स्पर्धेतील विजेत्याला ४३ लाख रुपयांहून अधिक रोख बक्षीस मिळणार आहे, तर उपविजेत्या आणि तिसऱ्या क्रमांकाच्या खेळाडूला अनुक्रमे ३० लाख रुपये व २१ लाख रुपये रोख पुरस्कार मिळणार आहे. अव्वल तीन खेळाडू २०२६ च्या महिला कॅण्डिडेट्स स्पर्धेसाठी देखील पात्र ठरतील.

# अमेरिकेत ट्रान्सजेंडर महिलांना ऑलिम्पिक महिला खेळ खेळण्यास बंदी

**कोलोराडो स्प्रिंग्ज, २३ जुलै**

अमेरिकन ऑलिम्पिक व पॅरालिम्पिक समितीने ट्रान्सजेंडर महिलांना ऑलिम्पिक महिला खेळांध्ये भाग घेण्यास प्रभावीपणे बंदी घातली आहे. जलतरण, अॅथ्लेटिक्स व इतर खेळांवर देखरेख करणाऱ्या म हासंघांना राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जारी केलेल्या कार्यकारी आदेशाचे 'पालन करणे बंधनकारक' असल्याचे सांगितले आहे. सोवारी अेरिकेचे हे नवीन क्रीडा धोरण जाहीर करण्यात आले असून हे क्रीडा धोरण यूएस ओपीसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. हे नवीन क्रीडा धोरण या वर्षाच्या सुरुवातीला एनसीएएने उचललेल्या अशाच एका पावलाचे अनुसरण करते. मात्र ट्रम्प सरकारच्या या नवीन क्रीडा धोरणावर अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. या नवीन क्रीडा धोरणात अॅथ्लिट सुरक्षा धोरणाच्या आदेशात, इतर गोष्टींबरोबर महिला खेळां ध्ये ट्रान्सजेंडर खेळाडूंना सहभाग घेण्यास परवानगी देणाऱ्या संस्थांकडून 'सर्व निधी रद्द' करण्याचा इशारा देण्यात आला आहे. अमेरिकेच्या ऑलिम्पिक अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय प्रशासकीय संस्थांना सांगितले की, त्यांना आमचे अनुकरण करावे लागेल, ट्रम्प यांनी आदेशावर स्वाक्षरी केल्यापासून यूएसओपीसीने संघीय अधिकाऱ्यांशी आदरयुक्त व रचनात्मक चर्चा सुरू केली आहे.

# दयानंद शिक्षण संस्थेत हॅंडबॉल दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

दयानंद शिक्षण संस्थेत सेमिनार हॉलमध्ये हॅंडबॉल दिनाचा कार्यक्रम थाटात पार पडला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांच्या हस्ते हॅंडबॉल मैदानच्या प्रतिकृतीचा केक कापण्यात आला. कोणत्याही क्रीडा क्षेत्रात आपले नाव लौकिक करा, असे डॉ. लकडे यांनी खेळाडूंना आवाहन केले. यावेळी आंतरराष्ट्रीय खेळाडू आदित्य प्रधान तसेच मागील वर्षी राज्यस्तरीय विभागीय स्पर्धेत चम कलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. दयानंद शिक्षण संस्था स्थानिक सचिव डॉ. महेशजी चोप्रा यांनी एक्स्प्लोकेशन ऑफ स्पिरिचुकअल एलिमेंट्स इन सर एरोबिक्स सोनटस या विषयांमध्ये ८८ व्या वर्षी डॉक्टर ही पदवी प्राप्त झाली, तसेच दयानंद काशिनाथ असावा प्रशालेचे नूतन मुख्याध्यापक संतोष हंपे यांचा सत्कार क्रीडाविभागा तर्फे करण्यात आला.



याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे माजी क्रीडा शिक्षक प्रकाश भोसले, दयानंद शिक्षण संस्थेचे माजी खेळाडू प्रफुल्ल दळवी हे उपस्थित होते. प्रा. डॉ. किरण चोकाककर व प्रमोद कुनगुलवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन श्री नवनाथ हराळे यांनी केले. डॉ. समर्थ मनुकार यांनी आभार मानले.

## महत्वाचे...



### छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजमध्ये करिअर संसदेची स्थापना

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजमध्ये करिअर संसदेची स्थापना करण्यात आली. या संसदेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण मित्रगोत्री यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयात स्थापन करण्यात आलेल्या करियर संसदेमध्ये मुख्यमंत्री- प्रदीप सुरवसे, नियोजन मंत्री- दिनेश घोडके, कायदे व शिस्तपालन मंत्री- ऋतुजा महापुरे, माहिती व प्रसारणमंत्री- ज्योती मद्रासी, महिला व बालकल्याण मंत्री- पूजा माडेकर, सामान्य प्रशासनमंत्री- प्राजक्ता भोसले, उद्योजकता विकास मंत्री- श्रेया मैकलवार, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री- सुनील शर्मा, कौशल्य विकासमंत्री- आदित्य गायकवाड, संसदीय कामकाजमंत्री- रोहित मेंढे, सदस्य- सरस्वती क्षीरसागर इत्यादींना पद आणि गोपनीयतेची शपथ मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आली. शपथविधीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इतिहास विभागप्रमुख डॉ. अरुण सोनकांबळे, प्रा. संतोष गवळी, डॉ. अभिमन्यू ओहोळ,आयक्यूएसी चेअरमन डॉ. राणी मोटे, प्रोफेसर नागेश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. युवराज सुरवसे, डॉ. वर्षाराणी शिंदे, प्रा. नवनाथ कुचेकर, प्रा. भुसे, प्रा. काळे, भानुदास घंदुरे, शहाजी जाधव, महेश डेंगळे, ओंकार काकडे, संतोष अलकुंटे, संजय थिटे, केशव लोंढे इत्यादींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा महापुरे यांनी केले. प्रास्ताविक करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक डॉ. वाल्मिक कीर्तीकर यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ. युवराज सुरवसे यांनी केले.



### ब्रिलियंट ग्रुपच्या वतीने पुरस्कार सोहळा

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

ब्रिलियंट ग्रुप वतीने गुरुपौर्णिमा निमित्त १५ मान्यवरांचा शिक्षणक्षेत्रास विशेष योगदन दिलेल्यांना पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार सोहळा इंडियन मेडीकल असोसिएशन, डफरिन चौक येथे संपन्न झाला.कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. ऋत्विक जयकर, व्ही.एम. मेडिकल कॉलेजचे डिन उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आसिफ इकबाल शेख, प्रा. भोजराज पवार, नुरोद्दीन मुल्ला सामाजिक कार्यकर्ते, अनिल वाघमोडे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पाडला. यावेळी मल्लिनाथ रूपनुर, मंगल वाघमारे, मनिषा कांबळे, हरून बंदुकवाले, जब्बार कासीम शिकलगार, डी.एस. एम शिक्षक, निजामुद्दीन आतार, गौतम कांबळे, मुख्याध्यापक कन्नड शाळा तडवळ, अखलाख शेख, मुख्याध्यापक आळगे, राजेंद्र चव्हाण, कराटे, सुहास जोशी, विश्वास कांबळे, विवेक डोलारे, सोहेल शेख, सोमनाथ व्हटकर, नुरजाहाबी पठाण यांना सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन इमतियाज अक्कलकोटकर यांनी केले. आभार प्रणाली रासे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड. विश्वास जाधव, एम. ए. शेख, एजाज शेख, दिपक मठ, जी.एम. नदाफ, प्रभाकर कुंभार, शफी शेख, विवेक कन्ना, मल्लिकार्जून हेगडे, राजेंद्र शिरकुल, रहिमबक्ष बागवान (बिलाल), सुनिल रोडगे, रशिद पठाण, संतोष जत्ती, संजय कोडल, मेजर सुरेश लोखंडे, बसवराज वाघमारे, सुनील खांडेकर, नूर शेख यांनी परिश्रम घेतले.



### श्रीवास्तव नाभिक समाजातर्फे शैक्षणिक साहित्य वाटप

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

श्रीवास्तव नाभिक समाजाच्या वतीने आयोजित जेष्ठ नागरिक, गुणवंत विद्यार्थी, सेवानिवृत्त, उच्चपदस्थ आणि विशेष गुणवंत सत्कार सोहळा सोलापूर येथील इरण्णा उपलप मंगल कार्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज अध्यक्ष सिद्राम रुद्रार हे होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सेवाप्रतिष्ठानचे अध्यक्ष हिंदुराव गोरे, जेष्ठ समाजसेवक निलकंठ हल्लाळीकर, सोलापूर शहर नाभिक दुकानदार संघटनेचे विश्वस्त अध्यक्ष आनंद सिंगराल, विदयमान अध्यक्ष अभयकुमार कांती, श्रीवास्तव नाभिक समाजाचे जेष्ठ संचालक प्रकाश सद्गुरे, सुधीर वड्डेपल्ली, नंदकिशोर सद्गुरे, संस्थेचे उपाध्यक्ष राजू शुक्लवार, सचिव प्रकाश जोगीपेठकर, खजिनदार विजय शुक्लवार, सहसचिव महेश श्रीमंगले, संचालक परशुराम श्रीमंगले, गोवर्धन कोडपाक, विठ्ठल मालतुमकर, विनायक वड्डेपल्ली आणि विजय सुरपुरे उपस्थित होते. यावेळी समाजातील उच्च पदस्थ, सेवाभरती झालेले ब्रम्हदेव श्रीमंगले आणि निखिल सद्गुरे यांचा तर सुनिल वड्डेपल्ली यांचा सेवानिवृत्तीमुळे सन्मानपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

### पैशाच्या कारणातून एकास मारहाण

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील दर्गनहळ्ळी येथे बुधवारी सकाळी ८.५० च्या सुमारास पैशाच्या कारणातून तिघांनी मारहाण करून एकास जखमी केले. मल्लिनाथ महादेव व्हनमारे (वय ४९, रा. दर्गनहळ्ळी ता द सोलापूर) असे मारहाणीत जखमी झालेल्याचे नाव आहे. बुधवारी सकाळी आठच्या सुमारास मल्लिनाथ हा गावातील घराजवळ थांबला होता. त्यावेळी संजय बिराजदार व राजू बिराजदार तसेच इतर एक यांनी पैशाच्या कारणातून मल्लिनाथ यास लाकडाने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने मित्र रविंद्र कांबळे याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# बोगस ९६ बांधकाम परवाना प्रकरण; अनधिकृत, अनियमित भाग पाडून घेण्याच्या ७० जणांना नोटीसा

### १५ दिवसांची दिली मुदत अन्यथा महापालिका करणार पाडकाम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

शहरातील बहुचर्चित खळबळ जनक अशा त्या ९६ बांधकाम प्रकरणातील १४ प्रकरणे कोणत्याही स्थितीत नियमित करता येणार नाहीत. तर ७० बांधकाम धारकांना त्यांनी बांधकाम परवानगी व्यतिरिक्त बांधलेला अनाधिकृत आणि अनियमित भाग पाडून घ्यावा लागणार आहे. याबाबत संबंधितांना नोटीसा बजावण्यात आले असून पंधरा दिवसांची मुदत दिली आहे. त्यानंतर मात्र महापालिका पुढील कारवाई करणार आहे.

सोलापूर महापालिकेत सन २०२१ ते २०२३ दरम्यान बांधकाम परवानगी देण्याची समांतर प्रक्रिया राबवून शहरातील विविध भागात असलेल्या अनेकांना बांधकाम परवाने देण्यात आल्याची गंभीर बाब उघड झाली. या प्रकरणात महापालिका प्रशासनाकडून अंतर्गत आणि पोलीस कारवाई देखील करण्यात आली. या प्रकरणात पुन्हा महापालिका प्रशासनाकडून संबंधित सर्वांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. दोन महिन्यापूर्वी महापालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून त्याचा सविस्तर अहवाल नगररचना विभागाने सादर केला.

यानंतर आता पुढील अंतिम कार्यवाही देखील सुरू करण्यात आली आहे. बोगस बांधकाम परवाना प्रकरणाचा अखेर संपूर्ण अहवाल पालिका प्रशासनाकडे सादर झाला आहे. महापालिकेचे नगररचना उपसंचालक मनीष भीष्णूरकर यांनी दिलेल्या अहवालानुसार शहरातील या ९६ बांधकाम प्रकरणातील १४ प्रकरणे कोणत्याही स्थितीत नियमित करता येणार नाहीत. तर ७० बांधकाम धारकांना त्यांनी बांधकाम परवानगी व्यतिरिक्त बांधलेला अनाधिकृत आणि अनियमित भाग पाडून घेण्यासंदर्भात नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. सोलापूर शहरातील या ९६ बोगस प्रकरणात संबंधितांना नोटीस बजावून घेण्यात आलेल्या



**कलम ५३ अन्वये पाडकामाची पुढील कारवाई**

९६ मधील ७० बांधकाम धारकांना त्यांनी केलेले अनधिकृत– बेकायदेशीर बांधकाम हे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पुढील १५ दिवसात काढून घ्यावे अन्यथा महाराष्ट्र महापालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना १९६६ मधील कलम ५३ अन्वये पाडकामाची कारवाई करण्यात येईल अशी नोटीस बजावण्यात आली आहे. दोन आठवड्यानंतर याची कारवाई सुरू करण्यात येणार आहे.

सुनावणीनंतर केलेल्या कार्यवाहीसह त्यावर शेरा मारून पुढील कार्यवाही आणि काहींवरील कारवाई बाबतचा अहवाल महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे यांच्याकडे सादर झाला आहे. या प्रकरणातील काहींनी न्यायालयात धाव घेतली आहे. पण या प्रकरणातील केवळ एकाला स्थगितीचे आदेश मिळाले असल्याने त्यावरील पुढील कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात आली आहे. तर या प्रकरणातील ४ बांधकाम धारकांना मंजूर नकाशाप्रमाणे जागेवर नियमानुसार बांधकाम परवानगी सादर करून बांधकाम करणे बंधनकारक ठरविण्यात आले आहे. अन्य ४ प्रकरणांमध्ये जागेवर बांधकामाच नसल्याने त्या बांधकाम धारकांना नव्याने अर्ज दाखल करून परवानगी घेण्यासंदर्भात कळविण्यात आले आहे शिवाय उर्वरित बांधकाम धारकांना जागेवर केलेल्या बांधकामात सामासिक अंतरे सोडून केल्याची पुष्टी ही देण्यात आली आहे. प्रस्ताव आणि अहवालाच्या अनुषंगाने दुसरी सुनावणी या प्रकरणात घेण्यात आली. अंतिम आदेश आणि विविध प्रकारचा शेरा देखील या प्रकरणांमध्ये चौकशी अधिकारी नगररचना विभागाचे उपसंचालक मनीष भिष्णुरकर यांनी दिला आहे. यामधील काहींना नियमानुसार बांधकाम परवानगी, सुधारित बांधकाम परवानगी बीपीएमएस प्रणाली मधून देण्यात आली आहे तर काहींना वापर परवाना देखील देण्यात आला आहे.



## हिराचंद नेमचंद कॉलेजमध्ये अकरावी नवप्रवेशितांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जुलै**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील इयत्ता अकरावीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर येथे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. या स्वागत समारंभास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास शिक्षण उपनिरीक्षक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग, सोलापूर शिक्षण उपनिरीक्षक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग स्मिता नडिमेटला, अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वेळापूर डॉ. प्रभाकर बुधाराम, पोलीस निरीक्षक जेलरोड पोलीस स्टेशन शिवाजी राऊत, पोलीस उपनिरीक्षक, अशोक चौक पोलीस चौकी मनोज मोरे, वालचंद आर्ट्स अँड सायन्स महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक जिवराज कस्तुरे आदि उपस्थित होते. या कार्यक्रमाला प्रा. डि.ए. गोरनाळे, प्रा. कॅप्टन संदीप पाटील, प्रा. अमोल कस्तुरे, प्रा. रश्मी शहा, डॉ. मीनल पांढरे, स्मिता मगदूम, ऋजुता शहा, प्रा. प्रशांत खोत, प्रा. अमोल क्षीरसागर, प्रा. प्रमोद वाडकर आदी प्राध्यापक उपस्थित होते. या प्रसंगी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच नैतिक मूल्ये आत्मसात करण्याचे तसेच शिस्तप्रिय व सकारात्मक दृष्टिकोन बाळगण्याचे आवाहन केले. या वेळी पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे समन्वयक प्रा.अजित देवसाळे यांनी केले.

### उपचारास दाखल रुग्णांनी काढला पळ

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी येथे मारहाण झालेले दोघे उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल झाले. परंतु उपचारादरम्यान त्या रुग्णांनी तेथून पळ काढल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. सरदारनी साहेबलाल मुल्ला (वय ४०) व रहिमान साहेबलाल मुल्ला (वय २५, दोघे रा. होटगी) अशी मारहाणीनंतर रुग्णालयातून पळून गेलेल्या रुग्णांची नावे आहेत.

मंगळवार २२ जुलै रोजी रात्री ११ च्या सुमारास होटगी शिवारातील राहत्या घरी असताना, त्यांना मेहबूब रमजान नदाफ व सिमरण नबीलाल मुल्ला या दोघांनी अज्ञात कारणाने लाकडाने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. सरदारनी यांच्या सर्वांगास तर रहिमान यांच्या उजव्या हाताला जखम झाली. बुधवारी रात्री १२.३० वाजता मुलगा रहिमान याने उपचारास दाखल केले. परंतु रात्री दीडच्या सुमारास ते पळून गेल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## शिक्षकच राष्ट्राचे शिल्पकार : डॉ. मेतन

▸ सेवानिवृत्त शिक्षक सन्मान व गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण सोहळा





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

शिक्षकच राष्ट्राचे शिल्पकार असून आदर्श नागरिक घडविण्याचे मोलाचे कार्य शिक्षकच करत आहे. त्यांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. प्रवासातून अनेक प्रकारची माहिती मिळत असल्याने शिक्षकांनी प्रवास ही भरपूर करावा तसेच विद्यार्थ्यांनी अशा पुरस्काराने प्रेरित होऊन गरुड झेप घ्यावी, असे प्रतिपादन डॉ. मेतन यांनी यावेळी व्यक्त केले.

सोलापूर जिल्हा खाजगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर सेवक सहकारी पतसंस्था आणि महाराष्ट्र राज्य मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर महासंघ शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सेवानिवृत्त शिक्षक सन्मान आणि गुणवंत विदयार्थी पारितोषिक वितरण प्रसलंगी ते बोलत होते. नुमवि प्राथमिक शाळा डफरीन चौक येथील शिशु सभागृहात हा सोहळा झाला.

सुरवातीस मान्यराच्या हस्ते कै चं.का. कोळशेटटी सरांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी डॉ. जिल्हा कोषागार अधिकारी वैभव राऊत, वेतनपथक वरिष्ठ लिपिक सोनल केत, जिल्हा सचिव शिक्षक महासंघ धाराशिव कवीराज रेड्डी, जिल्हा उपाध्यक्ष धाराशिव शिवराज औसेकर, पतसंस्थेचे चेअरमन कल्लप्पा फुलारी, सचिव महादेव होमकर, संचालक विश्वजीत माणिकशेट्टी, कृष्णा हिरेमठ, रमेश बेडगे, शरद शिंदे, विदया शिंपी, संगीता सक्करगी, शोभा चव्हाण, आरती गायकवाड, महासंघाचे राजश्री तडकासे, संगीता शिवपूजे, राजूदास पवार आदी उपस्थित होते.

चौथी, पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत तसेच दहावी, बारावी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह,पेन,रोख रक्कम, मानाचा फेटा आणि गुलाब पुष्प तर सेवानिवृत्त शिक्षक शिक्षिका यांना पूर्ण आहेर बुके मानाचा फेटा बांधून प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. चेअरमन फुलारी यांनी प्रास्ताविक केले. शोभा चव्हाण यांनी सूत्रसंचलन केले. महादेव होमकर यांनी आभार मानले

**इच्छा शक्ती असेल तर ध्येय निश्चित साध्य करता येईल...**

डॉ. राऊत यांनी इच्छा शक्ती असेल तर ध्येय निश्चित साध्य करता येईल यासाठी स्वतःचे आणि स्पर्धा परीक्षा देऊन यश संपादन केलेल्या अधिकाऱ्याचे अनेक उदाहरण देऊन शिक्षक आणि विद्यार्थी यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

## माणसाला माणूस बनवणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण : प्रा.डॉ. वाघमारे

### सामाजिक शास्त्रे संकुलात ब्रिज कोर्सचे उद्‌घाटन




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसते, तर ते मानवी मूल्ये, चारित्र्य, आणि समाजाची जबाबदारी यांना आकार देण्याचे सशक्त साधन आहे. त्यामुळे माणसाला माणूस बनवणारी प्रक्रिया म्हणजेच खरे शिक्षण होय, असे प्रतिपादन वालचंद महाविद्यालयातील समाजकार्य विभागाच्या प्राध्यापिका डॉ. निशा वाघमारे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे संकुल अणि पीएम- उषा यांच्या संयुक्त विद्यामाने समाजशास्त्राचा पाया: यशाचा सेतू या विषयावर ब्रिज कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. या ब्रिज कोर्सच्या उद्धाटन प्रसंगी डॉ. निशा वाघमारे बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास व पुरातत्त्वशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. प्रा. डॉ.वाघमारे यांनी नवीन शैक्षणिक धोरण याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. एनईपी हे फक्त अभ्यासक्रमातील बदल नाही, तर शिक्षणाच्या संपूर्ण दृष्टिकोनात आमूलाग्र परिवर्तन घडवणारी रचना आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचे कौशल्य, विचारशक्ती आणि मूल्याधारित शिक्षण याला प्राधान्य दिलं गेलं आहे.

हे धोरण विद्यार्थ्यांमध्ये स्व-शिक्षणाची वृत्ती, बहुआयामी कौशल्य विकास आणि संपूर्ण विकास साध्य करण्यासाठी आहे, असे त्या म्हणाल्या. त्यांनी एनइपी च्या माध्यमातून संकल्पनात्मक स्पष्टता, रोजगारक्षम शिक्षण, आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षणाची स्पर्धात्मकता यावर भर दिला असल्याचेही स्पष्ट केले. आपले भाषण एकतर्फी न ठेवता त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यावर भर दिला.

डॉ. कांबळे म्हणाले, विद्यार्थी हा संकुलाचा केंद्रबिंदू आहे, आणि संकुलात राबवली जाणारी प्रत्येक उपक्रमाची आखणी ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच असते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. ज्ञानेश्वरी हजारे यांनी केले. ब्रिज कोर्सच्या कार्यक्रमाला विद्यार्थी आणि प्राध्यापक यांची उपस्थिती होती.



**जेष्ठ नागरीकांच्या समस्या जाणण्यासाठी आयुक्त केबिनच्या बाहेर...**

**सोलापूर :** पोलिस आयुक्त एम. राजकुमार हे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आयुक्तालयातील स्वतःच्या केबिन बाहेर आले होते. या सुखद अनुभवाची घटना शिवसेना उबाठा गटाचे महेश धाराशिवकरांनी मोबाईलमध्ये छायाचित्राच्या माध्यमातून जतन केली.

### झाडाची फांदी अंगावर पडून दोन महिला जखमी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

झाडाखाली बसलेल्या दोन महिला फांदी अंगावर पडून जखमी झाली. ही घटना शासकीय रुग्णालयातील बि बिल्डींगजवळ बुधवारी सकाळी ११.३० वाजता घडली. लक्ष्मी सदानंद गुमटे (वय ५०, रा. डोंबरजवळगे ता अ.कोट) व सत्यभामा अशोक इंगळे (वय ५०, रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव) अशी जखमी महिलांची नावे आहेत. लक्ष्मी आणि सत्यभामा या सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात बुधवारी सकाळी आल्या होत्या. बी बिल्डींगजवळील झाडाखाली त्या बसल्या असता, अचानक झाडाची फांदी तुटून त्यांच्या अंगावर पडली. यात त्यांच्या उजव्या हाताला जखम झाली तसेच डोक्याला मुकामार लागला. तसेच सत्यभामा यांच्या डोक्याला जखम झाली. त्या स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## मेहता प्रशालेचे सुजय हजारे, अनुष्का गायकवाड प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

इंट्याक सोलापूरच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी इंट्याक इंडिया जिल्हा प्रश्नमंजुषा स्पर्धा शिक्षण प्रसारक मंडळीच्या इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये संपन्न झाली. १६ शाळांमधील सातवी ते दहावी इयत्तेच्या सुमारे ७० विद्यार्थी गटांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यात वि. मो. मेहता प्रशालेचे सुजय हजारे व अनुष्का गायकवाड यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. हे दोघे राज्य स्पर्धेत प्रतिनिधित्व करतील. याचे उद्‌घाटन व पारितोषिके के.एल.ई. स्कूलच्या शिक्षिका माधुरी गायकवाड व असावा प्रशाला मुख्याध्यापक संतोष हंपे, इंट्याक समन्वयक प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर हे व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी गायकवाड यांनी वाचन- एक छंद या विषयी व्यक्त होताना वाचनाची आवड व जलद वाचन याबाबत उपस्थितांना संबोधन केले. या प्रश्नमंजुषाची पहिली फेरी ही भारतीय संस्कृती, विशेष व ऐतिहासिक व्यक्तिमत्व, महाराष्ट्र राज्य, सोलापूर जिल्हा, इंट्याक संस्था आदी विषयाबाबत प्रश्न त्यामध्ये समाविष्ट होते. प्राथमिक फेरीमधून चार जोडी गटांची दुसऱ्या फेरीसाठी निवड करण्यात आली.



इंट्याक इंडिया जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा

याप्रसंगी इंट्याक सोलापूरच्या वतीने पूर्वी संपन्न झालेल्या सेलिब्रेटिंग इंडिया २०२५ या चित्र-निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय विजेता ऋतुराज जोशी, विभाग विजेते श्रेया अधटराव व स्थानिक विजेते आदित्य खिलारे, संस्कार जाधव, गायत्री मोरे, आर्या सुरवसे, रूमाना शिकलगार, आर्या पाटील, रिधिषा बेले, सृष्टी कोनाडे, तनिष्का बल्ला, कनक जकनायक, दिपाली भुरले आदींना पारितोषिके प्रदान करण्यात आली. प्रास्ताविक सहसमन्वयक आर्कि. श्वेता कोठावळे यांनी केले. पारितोषिकांचे नियमावली व विजेत्यांचे यादी वाचन हे आर्कि. पुष्पांजली काटीकर यांनी केले.

**पहिल्या फेरीचे अंतिम निकाल**

प्रथम- सुजय हजारे, अनुष्का गायकवाड ( वि.मो. मेहता), द्वितीय- हर्षवर्धन चव्हाण, तनय राऊत (दिगंबर जैन गुरुकुल), तृतीय - स्वराज हिरेमठ धवलचंद्र धामणस्कर (वि. मो. मेहता), चतुर्थ- अथर्व शीरसी, आयुष राऊत (दिगंबर जैन गुरुकुल).

## महत्वाचे...

### बार्शीचे प्रा.डॉ. पालके 'नेट' परीक्षा उत्तीर्ण

**बार्शी, दि. २२ जुलै**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विषयात सहाय्यक पदावर कार्यरत असणारे डॉ. राहुल भगवान पालके हे विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत जून २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत तुलनात्मक साहित्य व भाषाशास्त्र या विषयात नेट परीक्षेत (राष्ट्रीय पात्रता चाचणी) उत्तीर्ण झालेले आहेत. विशेष म्हणजे ते नेट/ सेट ही परीक्षा यावेळेस १९व्यांदा उत्तीर्ण झालेले आहेत. अगोदर ते या परीक्षा इंग्रजीत ११ वेळा, मराठीत २ वेळा, हिंदीत २ वेळा,वुमेन स्टडीज तसेच अर्थशास्त्र या विषयांत प्रत्येकी १ वेळा उत्तीर्ण झालेले आहेत. त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार विजेते अमिताव घोष यांच्या कांदबरी लेखनावरील अभ्यासासाठी पीएच.डी. ही पदवी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून प्राप्त झालेली आहे. ते गेली १० वर्षे श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथे सहाय्यक प्राध्यापक अध्यापन करीत आहेत. एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांची ओळख आहे. या नेट परीक्षेत त्यांना तुलनात्मक साहित्य या विषयात एकूण १४८ गुण प्राप्त झाले असून पर्सेंटाईल स्कोर ८०.३६ असा आहे तर भाषाशास्त्र या विषयात एकूण १७६ गुण तर पर्सेंटाईल स्कोर ७१.६४ इतका आहे. त्यांच्या या यशात यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती ग्रंथालयाचा सिंहाचा वाटा आहे असे ते सांगतात. त्यांच्या या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.वाय.यादव, उपाध्यक्ष नंदनजी जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, उपसचिव ए.पी.देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, महाराष्ट्र डिजिटल मिडियाचे प्रमुख राजा माने, प्राचार्य डॉ. ए.बी. शेख, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. समाधान पवार, प्राचार्य डॉ. अशोक कदम, डॉ. अनिल कट्टे, डॉ. कल्याण साठे, डॉ. सदाशिव माने, डॉ. सोमनाथ यादव आदींनी अभिनंदन केले.



सात विषयात तब्बल १९व्यांदा उत्तीर्ण होण्याचा अनोखा विक्रम

### अक्कलकोटमध्ये सलग दोन दिवस पाऊस; पिकांना जीवदान

**अक्कलकोट, दि. २३ जुलै-**

अक्कलकोट शहर व परिसरात सोमवारी रात्री व मंगळवारी रात्रभर पावसाने दमदार हजेरी लावली गेली पंधरा दिवसा पेक्षा अधिक काळ दडी मारलेला पाऊस पुन्हा परतल्याने शेतकरी वर्गाच्या जीवात जीव आला. पाऊस नसल्याने खरीप पिके तूर, मूग, उडीद, सूर्यफूल बाजरी मका ही पिके करपायला आली होती ही सर्व पीकांना या पावसामुळे जीवदान लाभले आहे. सोमवारी सायंकाळी सातच्या दरम्यान पावसाला सुरवात झाली सोमवारी रात्रभर प्राऊस झाला मंगळवारी सकाळी पाऊस थाबला होता. मंगळवारी रात्री ७ पासून पुन्हा पावसाने जोर धरला. मंगळवारी रात्रभर पावसाची रिपरिप चालूच होती. या पावसाने खरीप पिकाना जीवदान लाभले आहे.

### जात पडताळणी प्रमाणपत्र वेळेवर द्या; अन्यथा कार्यालयाला कुलुप ठोकण्यात येईल : मडिखांबे

**अक्कलकोट, दि. २३ जुलै-**

सोलापूर जिल्ह्यातिल विद्यार्थी, नौकरदार,पदोन्नती साठी व नविन नौकरभरतीसाठी लागणारे जात पडताळणी प्रमाणपत्र वेळेवर द्यावे अन्यथा अक्कलकोट रिपाइं कडून जात पडताळणी कार्यालयास कुलुप ठोकण्याचा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) अक्कलकोट च्या तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी दिला आहे. सामाजिक न्याय भवन सोलापूर यांच्या कार्यालया मार्फत देण्यात येणाऱ्या जात पडताळणी प्रमाणपत्र मुद्दाम आडवले जात असून त्या दाखले एजंटा मार्फत मोठ्या आर्थिक व्यवहारांने केली जात आहे. यामुळे अनेक विध्यार्थी,नौकर वर्ग,नवीन नौकर भरती,पदोन्नतीसाठी लागणारे जात पडताळणी प्रमाणपत्र मुद्दाम अडवणूक करुन संबंधीत एजंटा मार्फत लाभार्थ्याकडून,आर्थिक लूट करुन त्यांच्या मानसीक,आणी आर्थिक छळ केली जात आहे.तरी हे सगळे धंदा बंद केली पाहिजे.आणी वेळेवर लाभार्थ्यांना एक पैसाही न घेता दाखला दिले पाहिजे,अन्यथा अक्कलकोट रिपाइं कडून भ्रष्ट कर्मचाऱ्यांना व अधिकारी समिती अध्यक्ष सचिव सहा कार्यालयास कुलुप ठोकण्याचा इशारा मडिखांबे यांनी दिला आहे.

### वाकड्या नजरेने बघितल्याच्या कारणातून चिनळेत मारहाण

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

वाकड्या नजरेने बघितल्याच्या कारणातून सांगोला तालुक्यातील चिनळे येथे सोमवारी तरुणाला मारहाण करण्यात आली. या प्रकरणी सिव्हील पोलीस चौकीत तक्रार दाखल झाली आहे. केशव बाळासाहेब शितोळे (वय ३५, रा. चिनळे ता. सांगोला) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोमवारी केशव हा गावात थांबला होता. त्यावेळी तेथे दिपक व धनाजी पवार हे आले. त्यांनी केशव यास तु मला वाकडया नजरेने का बघत आहेस, असे म्हणून लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने सांगोला सरकारी रुग्णालयात उपचार करून भाऊ नामदेव याने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः सोलापूर शहर व सोलापूर जिल्ह्यातील तमाम नागरिकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णनः-** डि।। व सब डि।। सोलापूर, ता. उत्तर सोलापूर, शहर सोलापूर पैकी महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील लिमयेवाडी येथील कै. मेजर परशुराम जाधव व्यायमशाळा पाठीमागे भैरुवस्ती झोपडपट्टी या नावाने ओळखले जाणारे झोपडपट्टीतील झोपडी घर नंबर २८/ए याचे हद्द पूर्वपश्चिम १०५ फुट व दक्षिणोत्तर ५० फुट असे एकूण क्षेत्र ५२५० चौ. फूटाची जागा त्यातील बांधकामासह. यांसी चतुःसिमा :- पूर्वेस - घर नं. २८, शिवानंद शांतय्या स्वामी, पश्चिमेस - घर नं.२३/बी महादुकर ल. गायकवाड व इतर, दक्षिणेस - रस्ता, उत्तरेस - घर नं.२७/बी, असिफ बा. शेख व घर नं.२९ राहुल जाधव

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत आतील सर्व तदंगभूत वस्तुसह व इजमेंट, मालकी हक्क व कब्जासह ही श्रीमती आशाबाई दगडू जाधव रा. २८ अ, भैरु वस्ती, परशुराम जिमजवळ, सोलापूर यांचे मालकीची व कब्जे वहिवाटीची असून, ती त्यांनी आमचे अशिलांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरवून त्यासाठी आमचे अशिलांकडून इसारा पोटी रक्कमही स्विकारली आहे. तसेच सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री त्यांनी आमचे अशिलास दिलेली आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचीही जप्ती, दान, गहाण, टाच, लिज, लीन, बोजा, कोर्टाची जप्ती, पोटगी, बक्षीसपत्र, वित्तीय संस्थेचा बोजा, अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध हिस्सा, करार मदार, खरेदी विक्री, तबदिली वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०८ दिवसाचे आत आमचे खालील नमुद पत्त्यावर लेखी हरकत देऊन जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी आमचे अशिलाची खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती वा तक्रारी या सदर मिळकतीवर व आमचे अशिलाचे हक्कावर बंधनकारक राहणारे नाही, याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. तारीख २४/०७/२०२५

सही/-
ॲड. मीरा कैलास प्रसाद
फ्लॅट नं. १०२, नरीमन गॅलॅक्सी अपार्टमेंट,
चौडेश्वरी मंदिरजवळ, महालक्ष्मी नगर,
नवीन आरटीओ रोड, सोलापूर-४१३००४
मो. ९०२८८३२४५५


# आणीबाणीच्या विरोधात लोकशाहीवादी जनता एकवटली होती

## जेष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा

## बार्शीत आणीबाणीच्या विरोधात लढणाऱ्या कार्यकर्त्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२३ जुलै-**

देशामध्ये लोकशाहीच्या विरोधात जाहीर केलेल्या आणीबाणीला तोंड देण्यासाठी जागरुक नागरिक एकवटले होते .आणीबाणीच्या विरोधात लोकशाहीवादी सर्वपक्षीय कार्यकर्ते एकत्र झाले होते. आणीबाणीचा लढा लोकशाहीच्या रक्षणासाठी होता, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा यांनी केले.

येथील स्व.यशवंतराव चव्हाण सभागृहात बार्शी नगरपालिकेने आणीबाणीच्या विरोधात लढलेल्या कार्यकर्त्यांच्या सत्काराचे आयोजन केले होते. यावेळी व्यासपीठावर श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी वाय.यादव, माजी आमदार राजेंद्र राऊत, शिवशक्ती बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे, सोलापूर भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, भाजपा जिल्हाध्यक्ष केदार-सावंत, नगरपालिकेचे मुख्य अधिकारी बाळासाहेब चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी माजी आमदार राऊत म्हणाले, आणीबाणीच्या विरोधात लढणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान झाला ही कौतुकास्पद बाब असून माझे वडील सुद्धा या विचारांमा धूनच पुढे आले होते. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा प्रबोधन मंच प्रमुख सुरेश हालमे, दामोदर गौरकर, हरिभाऊ मुळे, डॉ. दिलीप कदम, अतुल दीक्षित, आनंद गलगली, कृष्णाजीकर यांचा तसेच स्व. बाबुराव पवार, स्व. रामभाऊ मोहोळकर, स्व. तात्यासाहेब देशमुख, स्व.बिपिन नाईकवाडी, स्व. सुरेश संघवी, स्व. आप्पाजी देवकर यांच्या वारसदारांचा सत्कार करण्यात आला. सुरेश हालमे, डॉ. कदम यांनी मनोगत व्यक्त केले. बार्शी नगरपालिकेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, इतर अधिकारी व कर्मचारी यांनी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. आभार मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनी मानले.

### सांगोला महाविद्यालयात बापूसाहेब झपके यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २३ जुलै-**

सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाची स्थापना करणारे गुरुवर्य कै.बापूसाहेब झपके यांच्या १०३ वी जयंती निमित्त सांगोला महाविद्यालयात प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण केला.

यावेळी डॉ. सुरेश भोसले यांनी मनोगतात सांगोला तालुक्यात उच्च शिक्षणाचा प्रसार करण्यामध्ये बापूसाहेब झपके यांचे महत्वाचे योगदान आहे.

महाविद्यालयातील विविध विद्यार्थ्यांच्या यशामध्ये त्यांचे कार्य कारणीभूत आहे. ते थोर गांधीवादी, स्वातंत्र्यसेनानी व शिक्षणमहर्षी होते असे मत व्यक्त केले. तसेच बापूसाहेब झपके यांच्या जीवन कार्याविषयीची माहिती प्रा.गणेश पैलवान यांनी दिली. कार्यक्रमाचे नियोजन डॉ.सदाशिव देवकर व बाबासो इंगोले यांनी केले.




### माजी सैनिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२३ जुलै-**

स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा सांगोला व कडलास येथे माजी सैनिकांसाठी त्यांच्या अडीअडचणी सोडवणे तसेच बँकेचे नवीन काही आलेले योजना याची माहिती देण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी सैनिकांना येत असलेल्या अडचणी याविषयी प्रश्नोत्तर स्वरूपात मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच पेन्शन लोन, कार लोन, होम लोन या योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. सदर बैठकीसाठी शाखा सांगोला येथे चीप मॅनेजर उत्तम गावडे, सर्व्हिस मॅनेजर मनीषा पाटील, लोन डिपार्टमेंटच्या शितल शिंदे, कडलास शाखा येथे शाखाधिकारी दीपक शेटे, सीबीओ रिनूल धजेकर, सिनियर असोसिएट प्रकाश पाटील, असोसिएट अमोल जगधने आणि पेन्शनर उपस्थित होते. असेच प्रत्येक दोन तीन महिन्याला पेन्शन धारकांना वेळोवेळी येणाऱ्या योजनांची माहिती देण्याविषयी बैठक घेण्यात येईल. सुसंवाद नेहमीच होत राहील, असे उत्तम गावडे यांनी यावेळी सांगितले.

## ओंकार साखर कारखान्याचा इथेनॉल प्रकल्प कार्यान्वित

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि २३ जुलै-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याचा महत्वकांशी इथेनॉल प्रकल्प १५० लाख केएलपीडीचा प्रकल्प सुरू झाला. प्रथम बाहेर पडणाऱ्या इथेनॉलचे पूजन संचालक प्रशांतराव बोत्रे-पाटील, चांदापुरीचे सरपंच जयवंत सुळ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील, संचालिका रेखा बोत्रे-पाटील, संचालक ओमराजे बोत्रे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपपदार्थ प्रकल्प हाती घेतले असुन कारखान्याची प्रतिदिन गाळप क्षमतेत वाढ करण्यात आली असून ते प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या परिसरातील संपूर्ण ऊसाचे गाळप होणार व ऊस दराबाबत उपेक्षा उंचाविल्या आहेत. कार्यक्रमासाठी जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे, डिसलरी मॅनेजर पी डी पाटील ,केन मॅनेजर शरद देवकर, धनाजी पवार, संजय देशमुख, एकनाथ मोहरे, मेजर मोहन घोडके, रमेश आवताडे, नितीन जाधव, रामभाऊ मगर, शांतीलाल काटकर उपस्थित होते.



### संत सावता माळी महाराज पुण्यतिथी सोहळा भक्तिभावात

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२३ जुलै-**

येथे संत शिरोमणी सावता माळी महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा श्रीराम मंदिरात भक्तिमय वातावरणात पार पडला. मंदिर परिसर आकर्षक फुलांनी, पताकानी सुशोभित करण्यात आला होता. यानंतर ह.भ.प. चंद्रहार जाधव यांचे प्रभावी आणि भावस्पर्शी कीर्तनातून संत सावता महाराज यांच्या समाजप्रबोधन, कीर्तनात संतांची जीवनगाथा, भक्तीची परंपरा आणि आधुनिक जीवनातील संतविचारांचे महत्त्व यावर प्रकाश टाकण्यात आला. दुपारी बारा वाजता पुष्पवृष्टी त्यानंतर महाआरती करण्यात आली. यावेळी जयंत समुद्र, कैलास तोडकरी, बाबुराव सुर्वे, वारकरी संप्रदाय तालुकाध्यक्ष सारंग सुरवसे, बाबुराव माळी आदी उपस्थित होते.


NOTICE O.S.NO.8/2024

**IN THE COURT OF THE II ADDITIONAL DISTRICT JUDGE. ADONI**

Between
**Samudrala Nagaraju and another - Plaintiffs**
Vs
**Devendra and others - Defendants**

Defendant No2 Mohan s/o Pedda Laxmaiah A Wing 102 Idrapuram behind bank of India Pune is here by informed that the above suit is filed for partition of lands of Mandigiri village in Adoni Mandal bearing Sy no340/1, 341/3, 340/1D&341-3B Measuring Ac 2.50 cents and the suit is posted to 20/08/2025 for your appearance at 10.30 Am if you fail to appear before the court personally or through an advocate you will be set exparte.

**Second Additional District Judge Adoni**
**G.V. Desai, Advocate Adoni**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे दहिटणे, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील गांवच्या लोकांना कळिवण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** डि. व सब डि. सोलापूर पैकी ता. बार्शी पैकी मौजे दहिटणे हद्दीतील शेतजमीन याचा गट नं. १२३ चे एकूण क्षेत्र ०२ हे. २२ आर पो.ख. ० हे. ०० आर, आकार ५ रु.२३ पैसे, यापैकी मधील बाजूची दक्षिण-उत्तर गटालगतची नंदा बाबासाहेब लोखंडे यांचे क्षेत्र ० हे. ६८ आर आकार १ रु. ६० पैसे पैकी ० हे ३० आर आणि बाबासाहेब डोलाप्पा लोखंडे यांचे १० हे ८० आर आकार १ रु ८९ पैसे पैकी ० हे ३० आर यासी **चतुःसिमा :-** पुर्वेस - गट नं. १२४ ची जमीन, दक्षिणेस - गट नं. १२१ ची जमीन, पश्चिमेस - तडवळे गावची शिव व कॅनल, उत्तरेस : गट नंबर १२९ ची जमीन व कॅनल येणेप्रमाणे चतुःसिमेची शेतजमिन आतील सर्व झाडझुडूपे वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीन ही बाबासाहेब डोलाप्पा लोखंडे आणि सौ. नंदा बाबासाहेब लोखंडे यांच्या स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची होती व आहे व आजरोजी प्रत्यक्ष मालकी हक्कात व कब्जेवहिवाटीत आहे. विद्यमान मालकांनी सदरची शेतजमीन त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर शेतजमीन मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्या दरम्यान सदर शेतजमीन मिळकत खरेदी घेणेबाबत बोलणे झालेले असून खरेदी देणाऱ्यांनी आमचे अशिलाकडून इसार म्हणून काही रक्कमेचा मोबदला स्वीकार केलेला आहे. सदर शेतजमीन मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा शेतजमीन मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद शेतजमीनीवर कोणाचा हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास सदर शेतजमीन संदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर शेतजमीनवर कोणाचा बोजा हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर शेतजमीन निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता. २२/०७/२०२५

सही/-
प्रविणकुमार कल्लाप्पा बुध्देहाळकर
(बी.ए.एलएल.बी.) ॲडव्होकेट
मो.नं. ७७२०९९२७०६ / ९०९६२२९१६१
मु.पो. डोणज, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर.
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### जाहीर प्रकटन

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सहकारी पत संस्था नियमित नं १ सोलापूर या संस्थेच्या सर्व पात्र सभासदांना कळविण्यात येते की संस्थेच्या संचालक मंडळ सन २०२३-२४ ते २०२८-२९ मधिल सर्वसाधारण प्रवर्गातील नैमित्तीक रिक्त झालेली (०१) जागा भरण्यासाठी दि. ३१/०७/२०२५ रोजी सायंकाळी ६.१५ वाजता संस्थेच्या कार्यालयामध्ये सभेचे आयोजन केलेले आहे. नैमित्तीक रिक्त जागा भरण्याचा सविस्तर कार्यकम संस्थेच्या नोटिस वोर्डावर ठकविण्यात आलेला आहे. तरी सर्व पात्र सभासदांनी याची नोंद घ्यावी ही विनंती.

सही/-
सचिव
जिल्हा परिषद कर्मचारी
सहकारी पत संस्था नि नं. १ सोलापूर

### कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी-४१३४०१

Email ID :- am_barshi@msamb.com फोन-०२१८४-२२२९७६
जा.क्र. दि. २३/०७/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरण**

कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी, मुख्य बाजार आवारामध्ये असलेला ६० मे. टनी वजन काटा (वे ब्रीज) शेतकऱ्यांच्या व व्यापाऱ्यांच्या शेतमालाचे वजन करण्यासाठी १ वर्षासाठी भाडेतत्वावर देणे करीता दरपत्रक मागवण्यात येत आहेत. त्यासाठीचे अर्ज व सविस्तर माहिती, विवरण पत्रक सर्व नियम व अटीसह बाजार समितीच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत रु. ५००/- रोखीने / डी.डी.ने जमा करुन उपलब्ध होईल. तरी इच्छुकांनी त्यासाठी आपले अर्ज व दरपत्रक दि. ३०/०७/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत बाजार समितीच्या मुख्य कार्यालयामध्ये सादर करावे. याबाबतच्या सर्व अटी व शर्ती कार्यालयात पहावयास मिळतील. कोणतीही किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारणे किंवा नाकारणे बाबतचे सर्व अधिकार मा. सभापती व सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती यांना राहतील.

सही/-
सचिव
कृ.उ.बा.स. बार्शी

### जाहीर प्रकटन

वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज
दि.कि. अर्ज नं. ८८/२०२५ नि. ५

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात**
**मे. एच.यु.यु. पाटील कोर्ट**

१) **श्री. ओमकार अशोक भड,**
उ. वय - २६ वर्षे, धंदा - शेती/व्यवसाय,
रा. गौडगांव ता. बार्शी जि. सोलापूर
२) **श्रीमती संगीता अशोक भड,**
उ.वय - ५३ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर
३) **श्री. नरेंद्र अशोक भड,**
उ.वय - ३३ वर्षे, धंदा - शेती/नोकरी, रा. सदर
४) **सौ. अश्विनी प्रितीश पाटील,**
उ.वय - ३२ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. फ्लॅट नं. एफ-६०३, पुराणीक,
अल्डीया, इस्पेनोला फेज ६, म्हाळुंगे, पुणे- ४११०४५ — अर्जदार

विरुध्द
**कोणी नाही - सामनेवाला**

**अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ अन्वये यात अर्जदार कळवितो ते खालीलप्रमाणे**

यातील अर्जदार नं. १, ३, ४ यांचे वडिल व अर्जदार नं. २ चे पती अशोक बाबासाहेब भड यांचा मृत्यु दि. २५/०८/२०२१ रोजी फुलचुर, ता. जि. गोंदीया येथे झालेला आहे. मयत कै. अशोक बाबासाहेब भड यांचे अर्जदार नं. १ ते ४ हे वारस असल्याने त्यांचा सांभाळ व मृत्युनंतर अंत्यविधी वगैरे सर्वकाही अर्जदाराने केले आहे. मयत कै. अशोक बाबासाहेब भड यांना अर्जदार नं. १ ते ४ शिवाय इतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी, वर नमुद अर्जदार यांचे शिवाय मयत कै. अशोक बाबासाहेब भड यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. २६/०८/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगरहरकत द्यावी अथवा कोणाचे हीकाही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील कै. अशोक बाबासाहेब भड याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रकटन दिला. ता. २३/०७/२०२५

सही/- क. लिपिक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी

Truhome FINANCE

### ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनीः** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

**परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात**) सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि २९.०८.२०२५ सकाळी ११.३० ते दुपारी १२.३०** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवणाऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|
| **१) श्री धनाजी हरी बनसोडे (कर्जदार) २) श्रीमती सविता धनाजी बनसोडे (सह-कर्जदार), तवशी, पंढरपूर शिंगण वस्ती, पंढरपूर, महाराष्ट्र -४१३३०४ तसेच येथे: फ्लॅट क्रमांक ०७, शिवाजी अपार्टमेंट गॅट ८०/१/बी/१/ए, प्लॉट क्रमांक ०९, चौथा मजला, प्रशांत प्रियकर नगर, पंढरपूर, महाराष्ट्र-४१३३०४. वडगाव कोल्हाटी, वाळूज, गंगापूर, जिल्हा- औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१. कर्ज खाते क्र. SHLHSOLR0000342** **ताबा दिनांक व ताबा प्रकार:** **२१ जून, २०२५ भौतिक ताबा** **ज्ञात अधिभार:** ज्ञात नाही | मागणी सूचना तारीख: १०/०९/२०२४ दिनांक ०६-०९-२०२४ रोजी कर्ज खाते क्र. SHLHSOLR0000342 अंतर्गत रु. १३,६३,५३३/- (रुपये तेरा लाख त्रेसष्ट हजार पाचशे तेहतीस फक्त) सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत करारानुसार व्याजदराने पुढील व्याजासह . | रु.२२,७१,५००/- (रुपये बावीस लाख एकहत्तर हजार पाचशे फक्त) **बोली वाढविणे :** रु. १०,०००/- आणि त्यापटीने **बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )** रु. २,२७,१५०/- (रुपये दोन लाख सत्तावीस हजार एकशे पन्नास फक्त) **ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : २८ ऑगस्ट २०२५ वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.** | **२९ ऑगस्ट २०२५ वेळ. सकाळी ११.३० ते दुपारी १२.३०** | **अश्फाक पत्का- ९८१९४ १५४७७. सुनील मानेकर ८९९९३४४८९७ मयूर भोजने ८८९८५२७०७६ सचिन लकुळे ९८९०५१९९९७ निरीक्षण तारीख: १३.०८.२०२५ वेळ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत.** |

**संपत्तीचे विवरण**

गट ८०/१/बी/१/ए चा तो सर्व तुकडा आणि पार्सल, लेआउट प्लॅन-प्लॉट क्रमांक ०९, प्रशासकीय २७८.८१ चौ.मी., फ्लॅट क्रमांक ०७ मध्ये, "शिवाजी अपार्टमेंट" इमारतीवर बांधलेले, चौथा मजला, ६०.३९ चौ.मी. इसबावी, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-413304 येथे स्थित खालीलप्रमाणे सीमा: पूर्व: बाजूचा कडा, पश्चिम: फ्लॅट क्रमांक ०८दक्षिण: बाजूचा कडा, उत्तर: बाजूचा कडा

**०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**
**०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- ॲक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी ०००0२३० येथे जमा करावी:**

ठिकाण - पंढरपूर
दिनांक - २४-०७-२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

## महत्वाचे...

### सिद्धारुढ मठात शुक्रवारपासून श्रावणमासानिमित्त सुशांता देवी यांचे प्रवचन

**सोलापूर, दि. २३ जुलै-**



श्रावण मासानिमित्त शुक्रवार २५ जुलैपासून जुळे सोलापुरातील श्री सिद्धारूढ मठाच्या ओंकार आश्रमात पूज्य मातोश्री सुशांता देवी यांचे प्रवचन आयोजित केले आहे. हे प्रवचन दररोज रात्री ६ ते ७.३० दरम्यान होणार आहे. श्री गुरुनाथरुढ महात्मे हा त्यांच्या प्रवचनाचा विषय आहे. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून यामध्ये भजन, श्रीचा तुलाभार आणि महामंगल आरती आदींचा समावेश आहे. तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान मठाच्या संयोजन समितीने केले आले आहे.



### एसव्हीएस शाळेच्या विद्यार्थ्यांना एक हजार वह्यांचे वाटप; सह्याद्री फाऊंडेशनचा उपक्रम

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

उळे गावचे उपसरपंच तथा सह्याद्री फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष नेताजी खंडागळे यांच्या ५४ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने १००० पेक्षा जास्त वह्यांचे वाटप करण्यात आले. खंडागळे हे सह्याद्री फॉउंडेशनच्या माध्यमातून अनेक सामाजिक, शैक्षणिक कार्य करत आहेत. शेतकरी कुटुंबात जन्मलेले व एक उद्योजक म्हणून यशस्वी राजकारणी म्हणून त्यांची ओळख आहे. यावेळी पूज्य श्री वीरतपस्वी आणि तपोरत्नम योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या प्रतिमेचे पूजन खंडागळे, सरपंच राज साळुंखे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक केदार विभुते, सोसायटी चेअरमन वजीर मुजावर, तंटामुक्ती अध्यक्ष रफिक मुजावर, केंद्र प्रमुख व्हनमाने, जि. प. प्रा. शाळा मुख्याध्यापक बणजगोळे, वैभव हलसगे, आकाश माशाळे, सैफन फुलारी, सुभाष भोसले, शिवराज विभुते, प्रकाश आवटे आदि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. त्यानंतर सत्कार मूर्ती व वही भेट देणारे खंडागळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रविण कुंभार यांनी केले.

### नवीन पीक विमा धोरणाचा काँग्रेसने केला निषेध

**सोलापूर :** सरकारच्या वतीने शेती पिकांना दिली जाणारी एक रुपयात दिली जाणारी पीक विमा योजना बंद केली असून यंदापासून नवीन पीक विमा योजना जाहीर केली आहे. शेतकऱ्यांकरीता लागू करण्यात आलेल्या नवीन पिक विमा धोरणामधील जाचक अटी रद्द करून पूर्वीप्रमाणे पिक विमा योजना राबविण्यात यावा यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने काँग्रेस पक्षाच्या सर्व तालुका अध्यक्षांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयास निवेदन दिले.

# पंचप्पा कल्याणशेट्टी यांचे योगदान वंदनीय : मुकुंद पत्की

**पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२३ जुलै-**



पंचप्पा कल्याणशेट्टी यांनी बहुजन समाजाच्या झोपडीपर्यंत ज्ञानगंगा पोहोचविली. त्यासाठी महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेची स्थापना केली. संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक व सामाजिक परिवर्तन व्हावे म्हणून वंचित, उपेक्षित व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून हन्नूर व अक्कलकोट या ठिकाणी शिक्षणाची सोय केली. शेतकऱ्यांसाठी पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्य केले.

शेतकरी शेतमजूर यांना माफक दरात कर्ज मिळावे म्हणून शासन दरबारी प्रयत्न करून त्यांच्या विकासात योगदान दिले. म्हणूनच त्यांचे कार्य वंदनीय असल्याचे प्रतिपादन संस्थेचे संचालक मुकुंद पत्की यांनी केले. महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्थेच्या वतीने संस्थेचे संस्थापक कै.पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या दहाव्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर मल्लिनाथ कल्याणशेट्टी, भीमराव साठे, राचप्पा वागदरे, संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर एक पेड मा के नाम, स्वच्छता अभियान स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना पारितोषिक देण्यात आली. प्रास्ताविक सूर्यकांत रूगे यांनी केले. सूत्रसंचालन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार निशिगंधा कोळी यांनी मानले. या कार्यक्रमास बापूजी निंबाळकर, खिरप्पा गवंडी, शिवानंद पुजारी, खंडेराव घाटगे, अ. करीम मुल्ला, सेमी विभागाचे दिगंबर जगताप आदी उपस्थित होते.

**मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातही अभिवादन**

पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या पुण्यतिथीनिमित्त वरिष्ठ महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी- विद्यार्थिनी सहभागी झाले होते. संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## पवित्रोत्सवम पूजेच्या मानकरी निवडीसाठी लकी ड्रॉ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**



पविस्त्रोस्तवंम् कार्यक्रम श्री तिरुमला तिरुपती देवस्थानम वेधपाठशाळा पांचरात्र आगम पंडित चिलकापाटी तिरुमलाचार्यलु स्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ९ ऑगस्ट ते दि. १३ ऑगस्ट दरम्यान साजरा होणार आहे.

सालाबादप्रमाणे यंदाच्या श्रावणमास मध्ये पवित्रोवस्तम कार्यक्रम आयोजित केला आहे. दि १८ जुलै पर्यंत जे भक्त १५१/- पूजेसाठी वर्गणी भरून पवित्रोस्थामं कार्यक्रमांमध्ये भाग घेतले.त्याची लकी ड्रॉ दि. १९ जुलै रोजी मंदिर मध्ये संध्याकाळी ८ वा देवस्थानचे अध्यक्ष रायलिंग आडम, संचालक वेंकटेश चिलका, गोविंद बुरा, श्रीनिवास गाली, राजू येमूल भक्त मधून लक्ष्मीकांत दंडी, श्रीधर दंडी, मंदिरचे पवन पुजारी यांचे हस्ते ड्रॉ काढण्यात आले.त्यावेळी श्रीनिवास गुर्रम, श्रीनिवास बोगा व अनेक भक्त उपस्थित होते. जवळजवळ चार हजार भक्तांनी पूजा कूपन घेतले.त्यामध्ये १३६७ कूपन ड्रॉ मधून काढले. सदर ड्रॉ मध्ये ज्यांचे नाव निघाले त्या भक्ताना दि. ९ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या पवित्रीवस्थंम पूजेला बसता येतो.

बाकी राहिलेले भक्ताना श्री उत्सवमूर्तीचे अभिषेक पूजेचे मान व प्रसाद २६ जुलै ते ८ ऑगस्टपर्यंत व १४ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत पवित्रीवस्थंम् कार्यक्रम दिवस सोडून मिळणार आहे.

## कै. पंचप्पा कल्याणशेट्टी स्मृतिप्रित्यर्थ हन्नूर प्रशालेत विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२३ जुलै-**



महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै पंचप्पा कल्याणशेट्टी यांचा १० वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम माजी प्राचार्य सिद्धेश्वर कल्याणशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पुजन करून अभिवादन करण्यात आले. स्मृतिदिनाच्या निमित्ताने वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. दोन्ही गटात प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या शिवानी बाळशंकर, दिव्या निकम या विद्यार्थीनींची भाषणे झाली. लहान व मोठ्या गटातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरवण्यात आले. यानंतर हन्नूर प्रशालेचे माजी मुख्याध्यापक बसवराज बंडगर व. सुरेखा कल्याणशेट्टी, माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य चंद्रकांत व्हनमाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला.

प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारवड सिद्धेश्वर कल्याणशेट्टी व डोंबरजवळगेचे पालक आप्पाशा पाटील यांच्या हस्ते प्रशालेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सुरेखा कल्याणशेट्टी, माजी प्राचार्य अशोक दंतकाळे, अनंत चैतन्य प्रशालेचे माजी मुख्याध्यापक विलास बिराजदार, सेवानिवृत्त शिक्षक विश्वनाथ चव्हाण, प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक साखरे, पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे, जेष्ठ शिक्षिका मृदुलादेवी स्वामी, समस्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक व सुत्रसंचालन सांस्कृतिक सहाय्यिका स्वप्नाली जमदाडे यांनी तर आभार मल्लमा चप्पळगाव यांनी मानले.



## राष्ट्रपती मुर्मूंशी मोहोळची कन्या राजश्री काळेंचा थेट संवाद

- राष्ट्रपतींचा इरकल साडीचोळी देऊन केला सत्कार
- पारधी समाजोन्नतीचे दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२३ जुलै-**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली पण पारधी समाज अजूनही मुख्य प्रवाहात आला नाही. हा समाज पोलीस आणि प्रशासनाच्या अत्याचाराचे लक्ष्य होत आहे. राष्ट्रपती निर्देशित राज्यसभा सदस्यत्व किंवा राज्यपाल निर्देशित विधानपरिषदेचे सदस्यत्व देण्यात आलेले नाही असे का? असा स्पष्ट आणि लिखित सवाल पुण्यातील भाजपच्या माजी आणि पारधी समाजातील पहिल्या महिला नगरसेविका राजश्री काळे यांनी राष्ट्रपतींच्या भेटीत केला.

आदिवासींसाठी राबविण्यात येणाऱ्या ध्येयधोरणाबाबत चर्चा करण्यासाठी सोमवार (दि.२१) रोजी दिल्ली येथे राष्ट्रपती भवनातील बैठकीसाठी पुण्यातील भाजपच्या माजी नगरसेविका काळे यांना निमंत्रण होते. पारधी समाजासाठी काळे यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना निमंत्रण होते. राष्ट्रपती भवनात विविध क्षेत्रांतील प्रख्यात आदिवासी व्यक्तींशी संवाद साधला आणि आदिवासी समुदायांबाबत अधिक प्रभावी धोरणे आणि उपक्रम यावर राष्ट्रपतींनी चर्चा केली. यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध अशी रेशमी इरकल साडी आणि चोळीचा खण श्रीमती काळे यांनी महामहीम राष्ट्रपती मुर्मू यांना भेट दिली. याचे खास कौतुक राष्ट्रपती महोदयांनी केले. अजूनही पारधी समाजाला खोट्या गुन्ह्यात अडकविणे, कुठेही गुन्हा घडला तर त्रास देणे असे प्रकार पोलिसांकडून होतात. अजूनही या समाजाला राहायला देशात घर, जमीन मिळणे मुश्कील आहे. ते राहतात तिथेच तीच त्यांना जमीन करून खाण्यासाठी देण्यात यावी आणि शेती करू द्यावी तसेच शैक्षणिक सुविधा पुरवून या समाजाला मुख्य प्रवाहात आणावे अशी मागणी यावेळी काळे यांनी केली.

यावेळी केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जे.एल.उराव, राज्यमंत्री दुर्गादासजी उईके, भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. समीर उराव, अनुसूचित जमाती मोर्चाचे महाराष्ट्राचे संघटन मंत्री ॲड. किशोर काळकर, महामंत्री सुदर्शन शिंदे आदि उपस्थित होते.श्रीमती काळे यांना ही संधी मिळाल्याबद्दल पश्चिम महाराष्ट्राचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले, विजया भोसले, श्रीमती काळे यांच्या मातोश्री कुसुम भोसले यांच्यासह समाज बांधवांनी एकत्र येऊन आनंद साजरा केला.



## चोपडी येथे संत नामदेव महाराज समाधी संजीवन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २३ जुलै-**

संत शिरोमणी नामदेव महाराज समाधी संजीवनी सोहळा चोपडी, ता.सांगोला येथे विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. दि.१६ जुलैपासून कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये बाळासाहेब पिसे, महेश महाराज सूर्यवंशी, दादा महाराज नरळे, माऊली महाराज टेंबुकर, माऊली महाराज हेटकळे, मच्छिंद्र कावडे महाराज व कृष्णाजी महाराज यांनी कीर्तनाच्या माध्यमातून जागर करत समाज परिवर्तनाचे विचार मांडले. तसेच बुधवार दि.२३ जुलै रोजी दु.१२ वा. कृष्णाजी महाराज ढालगावकर यांचे फुलाचे व काल्याचे कीर्तन संपन्न झाले. त्यानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाची सोय होती. सायं.५ वा. नामदेव महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली.

यामध्ये विविध अभंग व संतवचनांच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचे बोल उपस्थितांसाठी ऐकवण्यात आले. सदर संत शिरोमणी नामदेव महाराज समाधी संजीवन सोहळा यशस्वी करण्यासाठी चोपडी गावातील डोंगरे, चांडवले, जवंजाळ परिवाराने व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. तसेच नाझरा येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये राऊत महाराज बलवडीकर यांच्या कीर्तनाने नामदेव महाराज संजीवन सोहळा संपन्न झाला. यावेळी दु.१२ वा. संत नामदेव महाराजांच्या मूर्ती वरती पुष्पवृष्टी करण्यात आली.

**रोजगार मेळाव्यांनी साजरा झाला मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस**

## राज्यात विक्रमी १०२ रोजगार मेळावे

**५७ हजार नोंदणी; २७ हजार युवकांना एकाच दिवशी रोजगार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ जुलै-**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत कौशल्य, रोजगार व नाविन्यता विभागाने आयोजित केलेल्या महाराष्ट्रव्यापी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात विक्रमी ५७ हजार तरुणांनी नोंदणी केली तर २७ हजार तरुणांना एकच दिवशी रोजगार मिळाला आहे.

राज्यातल्या तरुणांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस अविस्मरणीय ठरावा, त्यांच्या करिअर मध्ये नवा अध्याय सुरु व्हावा, या उद्देशाने कौशल्य विभागाने हा अभिनव उपक्रम राबवला असल्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्पष्ट केले. मुंबईतील गावदेवी इथल्या शारदा मंदिर हायस्कूलमध्ये आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्यात ते बोलत होते. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई शहर व शारदा मंदिर हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आला असून महाराष्ट्र भरात शंभर मेळावे आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्रात विविध ठिकाणी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यातून हजारो तरुणांना खाजगी तसेच शासकीय महामंडळात काम करण्याची संधी उपलब्ध होत आहे. औद्योगिक, माहिती तंत्रज्ञान, विमा, लॉजीस्टिक, व्यवस्थापन आणि सेवा क्षेत्रात रोजगाराची संधी उपलब्ध होत आहेत. मुंबईतील गावदेवी इथल्या शारदा मंदिर हायस्कूल मध्ये आयोजित करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यात एकूण २५ आस्थापनांनी सहभाग घेतला. यात पाच शासकीय महामंडळाचाही सहभाग होता. तसेच पाचशे युवक युवतींनी या मेळाव्यात नोंदणी केली.

# ई-निविदा तसेच वासराच्या मृत्यूप्रकरणी समिती गठीत

- सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर; आठ दिवसांत अहवाल देणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ जुलै-**



दर्शनरांगेतील बॅरिकेटींग कामाच्या ई-निविदे संदर्भात प्राप्त तक्रारी व गोशाळेतील नवजात वासराच्या मृत्यू प्रकरणी चौकशीसाठी ॲड. माधवी निगडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून, सदर समिती पुढील आठ दिवसात चौकशी अहवाल देणार आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंदिर समितीच्या सभेत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील कार्यालयात बुधवारी (दि.२३ जुलै ) सह अध्यक्ष औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस सदस्या शकुंतलानडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ड माधवी निगडे, हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, हभप प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, हभप शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व लेखा अधिकारी मुकेश अनेचा उपस्थित होते. दर्शनरांगेतील बॅरिकेटींग कामाच्या ई-निविदे संदर्भात प्राप्त तक्रारी व गोशाळेतील नवजात वासराच्या मृत्यू प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याच्या दृष्टीने मंदिर समितीच्या सदस्या ॲड. माधवी निगडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. त्यामध्ये शकुंतला नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर यांचा सदस्य पदावर समावेश करण्यात आला आहे. सदरची समिती पुढील आठ दिवसात चौकशी करून मुख्य समितीसमोर अहवाल सादर करणार आहे. ही चौकशी पूर्ण होऊन पुढील निर्णय होईपर्यंत व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला आहे.




दर्शनरांगेतील बॅरिकेटिंग कामाच्या ई निविदे संदर्भात पुरुषोत्तम सग्गम, सोलापूर यांनी आर्थिक फसवणूक झाल्याच्या तक्रारी संदर्भात समाज माध्यमांत बातमी प्रसिध्द झाली होती व काही ऑडीओ क्लिप व्हायरल झाल्या होत्या. त्या अनुषंगाने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना नोटीस बजावून खुलासा घेण्यात आला होता. तसेच गोशाळेतील नवजात वासराच्या मृत्यूबाबत देखील बातमी व व्हिडीओ समाजमाध्यमांत प्रसिध्द झाला होता. त्या अनुषंगाने देखील योगेश पाठक व तानाजी जाधव यांच्यावर पंढरपूर शहर पोलीस ठाणेमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पशुवैद्यकीय अधिकारी व तत्कालिन विभाग प्रमुख डॉ. प्रशांत सर्वगोड व सध्याचे विभाग प्रमुख पांडूरंग बुरांडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. सदरच्या दोन्ही घटना मंदिर समितीने गांभीर्याने घेतल्या असून, या दोन्ही घटनांची सखोल चौकशी करुन दोषी असणा-या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)